मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
९०२५
. सं. ठाणे
आ
१३२८

॥ श्री ॥

# लोकमान्य टिळक यांचा
# पोवाडा



REFBK-0002852
REFBK-0002852

… जन्मसिद्ध हक्क आहे

॥ श्री ॥

# लोकमान्य टिळक

यांचा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# पोवाडा.

REFBK-0002852

REFBK-0002852

लेखक,

श्री० रंगनाथ विष्णु खानविलकर.

मुद्रक व प्रकाशक,

दामोदर लक्ष्मण लेले.

मोदवृत्त प्रेस, वाई, मधली आळी घ. नं. ३४३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्र 20201 वि. 3109
क्रमांक ... नों. दि. 2010

शके १८४६.

किंमत दहा आणे.

# प्रस्तावना.

श्री. रंगनाथ विष्णु खानविलकर यांनीं लो० टिळकांचा हा पवाडा रचला. त्याला प्रस्तावना लिहावी अशी विनंति मला करण्यांत आली. स्वतः टिळकांच्या चरित्राचा एक खंड मीं लिहून प्रसिद्ध केला आहे, व या पवाड्यास आधारभूत ह्मणून घेतलेली हकीकत पहिल्या भागापुरती माझ्या या पुस्तकावरून घेतली आहे, असें मला कळविण्यांत आलें आहे. यामुळें त्याला प्रस्तावना लिहिणें मला नाकारतां येईना. सदर पोवाडा वाचून व ऐकून लोक त्याविषयीं आपलें मत बनवितीलच. ह्मणून त्यासंबंधानें मला कोणताहि अभिप्राय देण्याचें कारण नाहीं. तथापि पवाड्याचें स्वरूप जवळ जवळ तुकडे पाडलेल्या सयमक गद्यासारखें आहे असें वाटणारास एकच गोष्ट सांगावयाची आहे ती ही कीं, त्याच्या अनेक चौकांत जुन्या नामांकित पोवाड्यांच्या अनेक चाली घातल्या असल्यामुळें, तो ठेकेदार पद्धतीनें गाइल्यास अंतरंगांत तो असावा तितका काव्यमय नसल्याची उणीव भरून निघण्यासारखी आहे.

प्रस्तुत पवाड्यांत चरित्रविषयाचा वृत्तांत शक्य तितका विश्वसनीय आहे, असें ह्मणण्यांत माझ्या चरित्रग्रंथाला मीं स्वतंत्र नसतें महत्व देतों असें वाटण्याचें कारण नाहीं. पोवाडा झाला तरी त्यांतील मुख्य वृत्तांत साधार व विश्वसनीय असावा हें बरें. जुन्या मराठी पोवाड्यांत काव्यस्फूर्ति सरस व भाषापद्धति जोरदार असली तरी ऐतिहासिकदृष्ट्या अविश्वसनीय असा शेरा त्यांतील कित्येकांवर

सहज माहिती येईल. अलीकडच्या काळांतील उमाजी नाईकाचा पोवाडा ऐकूनहीं अविश्वसनीयतेचा संशय मला आला होता. पण मला स्वतःला उमाजीच्या चरित्राची कांहीं स्वतंत्र माहिती नव्हती यामुळें मला उलट माझ्या आक्षेपाविषयींच शंका येई. पण तीन वर्षांपूर्वीं पुण्याजवळील एका गोंधळ्यानें रचलेला पोवाडा त्यानें स्वतः मला म्हणून दाखविला तेव्हां त्यांतील असंबद्धता पाहून मला हंसूं आवरेना व जुन्या पोवाड्यापैकीं असे कित्ता तरी असतील अशी शंका दृढ होऊन एक प्रकारें वाईट वाटलें. असो, सदर गोंधळ्याला त्याच्या पोवाड्यांतील हा दोष मीं दाखविला व त्या वेळीं माझा चरित्रखंड तयार नव्हता म्हणून कै० गुरुजींनीं लिहिलेल्या टिळक चरित्राची एक प्रत मिळवून मीं त्याला दिलीहि. पण फिरून जेव्हां त्यानें पोवाड्याचें पुढचे चौक रचून आणून मला म्हणून दाखविले तेव्हां फिरून तोच दोष घडलेला पाहून मीं या शाहिराला विश्वसनीयतेच्या मार्गावर आणण्याचा नाद सोडून दिला. कारण त्याचें मतच जवळ जवळ मला असें दिसलें कीं, मनाला सुचेल व रुचेल तें न लिहावें तर पोवाडा लिहावाच कशाला? असो. वरील हकीकत सांगण्याचें कारण इतकेंच कीं, सदर पोवाड्यांत उपरिनिर्दिष्ट दोष जवळ जवळ नाहीं हें पाहून मला समाधान झालें.

टिळकांचें एक चरित्र पूर्वीं ओवीबद्ध असें झालें आहे व दुसरें हें पोवाड्याच्या स्वरूपाचें. यावरून मला असें वाटतें कीं, या

चरित्रविषयांतील अशा कांहीं गुणांचा असावा कीं, त्याचें आकलन व चिंतन करण्यांत, पद्याचा अवलंब केल्याशिवाय, मनोभावनांच्या उत्कटतेला पूर्ण वाव मिळणें, शक्य नाहीं. मीं लिहिलेल्या पुस्तकावर तें असावें तितकें उत्कट भावनोद्दीपक नाहीं अशी टीका कित्येक सहृदय वाचकांकडून झालेली माझ्या कानावर आलेली आहे. सुशिक्षित भक्तवृंदांची ही स्थिति, मग अशिक्षित म्हणून अधिक भावनामय असणाऱ्या मनांचें समाधान माझ्या पुस्तकानें कसें होणार ? याहि दृष्टीनें ओवीबद्ध टिळक चरित्राप्रमाणेंच प्रस्तुत पोवाड्याचेंहि मी मनःपूर्वक स्वागत करून ही प्रस्तावना पुरी करितों.

दिल्ली ता. २०
माहे जानेवारी सन १९२५ } न. चिं. केळकर.

# शाहीराचे बोल.

लोकमान्य टिळकांच्या आयुष्यांतील प्रत्येक क्षण अत्यंत कर्तब-गारीचा आहे. त्यांच्या चरित्रावर पुष्कळ पोवाडे होतील असें, त्यांचें चरित्र मोठें आणि अद्वितीय आहे. थोड्या वेळांत म्हटला जाईल अशा लहानशा आटोपशीर पोवाड्यांत लोकमान्यांचें साद्यंत चरित्र ग्रथित करणें कठीण आहे. तथापि या पोवाड्यांत मीं शक्य तितकें साद्य चरित्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. पोवाड्यासारख्या काव्यातील काव्यप्रसाद, ओजस्विता, हृदयंगमता वगैरे गुण पोवाडा नुसता वाचल्यानें जितके कळतील त्यापेक्षां तो म्हणतांना ऐकल्यानें खास अधिक कळतील असें मला वाटतें. असो.

सदर पोवाडा रचण्याचे कामीं श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं केलेल्या टिळक चरित्राच्या पहिल्या भागाचा मला अत्यंत उपयोग झाला आहे. त्याचप्रमाणें श्री. लेले यांनीं केलेले टिळकांचें संपूर्ण चरित्र आणि श्री. बापटकृत लोकमान्यांच्या आख्यायिका हीं पुस्तकें मला हा पोवाडा रचण्याचें कामीं उपयोगीं पडलीं, याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहे.

हा पोवाडा रचण्याचे कामीं वांई येथील मोदवृत्त छापखान्याचे मालक श्री० रा० दामोदर लक्ष्मण लेले आणि श्री० रा० रा० मोरोपंत व्यास, या दोन सद्गृहस्थांनीं, मला जें उत्तेजन दिलें त्या-बद्दल उभयतांचा, आणि पोवाड्यांतील चालीसंबंधीं उपयुक्त सूचना वांई येथील प्राज्ञपाठशाळेचे गायनशिक्षक श्री० शंकर परशराम जोशी

मुरा यांनीं दिल्या, याबद्दल यांचाही मी अत्यंत उपकारी आहे.

सगनेशोवटीं पोवाडयाच्या निमित्तानें लोकमान्य टिळकांची सेवा माझे हातून परमेश्वरानें घडविली याबद्दल त्या परमेश्वराचे चरणीं शतशः प्रणाम करून हे शाहीराचे बोल संपवितों.

वाई
ता० २४-१-२८

रंगनाथ विष्णु खानविलकर.

२८५२

॥ श्री ॥

# लोकमान्य टिळक

यांचा

# पोवाडा.

अनु. क्र. २०२५७ दि:
क्रमांक ........ ९३२८० नों: दि:

श्री लोकमान्य जय बाळ गंगाधर । राष्ट्रीय विभूति जगद्वंद्य महिवर । या हिंदुस्थानाचा पुढारि बाणेदार । टिळक नरकेसरि मर्दशूर ॥ ध्रु० ॥

ती सिंहगर्जना स्वराज्याची घनघोर । करुनिया हिंदुस्थान जागा केला एकंदर । सोसुनी सक्तमजुरीच्या शिक्षा अघोर । नोकरशाहीच्या जन्मभर ॥ " स्वराज्य माझा जन्मसिद्ध खरोखर । हक्क असे " हा स्वराज्य मंत्रोच्चार । केला आणि करविला देशभक्तिचं वारं । खेळविलं साऱ्या देशभर ॥ तेजस्वि अमोलिक हिरा तेजाची धार । ये उदरिं जियच्या माय धन्य ती फार । ती जन्मभूमि धन्य ते पिताही पितर । केलं जन्मुनी धन्य सारं ॥ थोराचा पोवाडा गाणारा कुणि थोर । पाहिजे कुणी तरी बुद्धिवंत शाहीर । मी अल्पमती पोवाडा काय गाणार । गोड तुम्ही करून घेणार ॥ (चाल) आठवण लोकमान्यांची होतां चित्ताला । निजदेशभक्तिचा पाझर सुटे हृदयाला । होतो कोण

आहलों कसे कारण काय आला । पुढं काय करावें कार्य आत्म-
समजिला ॥ ( चाल पहिली ) यापरि लोकमान्यांची आठवण फार ।
निसीन उडवि खळबळ देशापायीं र । म्हणूनीच गातों पोवाडा
श्रवण करणारे । देशबंधुनी एका सारे ॥ १ ॥ श्री० ॥

टिळकांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांत । दापोली तालुका राहणं चिखलगांवांत । कांठ दापोलीच्या दक्षिणीं सुमारें मैल आठ । हवापाणी छान कोकणपांत ॥ टिळकांच्या पणजापूर्वी त्यांच्या वंशांत । कोणता पुरुष उदयाला आला तेथें । न कळे परि नामें केशव पणजे विख्यात । चिखलगांवींचे असती खोत ॥ त्या पेशवाइच्या शेवटें अमदानींत । केशवरावांनीं भोगिली मामलत । बुडे पेशवाई ती अठराशें अठरांत । येऊन राहिले चिखलगांवांत ॥ या केशवरावांना दोनच मुलगे होते । रामचंद्र पहिला दुसरा काशीनाथ । टिळकांचे आजे हे रामचंद्र जन्मत । सनं अठराशें दोनींत ॥ या रामचंद्राचें सुत गंगाधरपंत । जन्मले इसवि सन अठराशें वीसांत । हेच कीं लोक-मान्यांचे वडिल विख्यात । नामें तें गाजें जगतांत ॥ ( चाल ) गंगाधर पंताचा अभ्यास । झाला मराठी दाभोळास ॥ हिमतीनें आले मग पुण्यास । लागले इंग्रजी शिकण्यास ॥ रमाबाई आई ये भेटण्यास । भेटुनी निघे नाशकास ॥ मार्गांत मांय महामारीस । बळि पडलि गेली स्वर्गास ॥ पत्निचे मृत्युनें रामभाऊस । वैराग सोडी घरादारास ॥ शेवटीं जाउनी काशीस । घेतला त्यांनि संन्यास ॥ ( चाल पहिली ) देवानें तोडिला मायबाप आधार । गंगाधरपंतावरि

हें संकट घोर । येत्रोनी पडला गळ्यामध्यें संसार । पोरवय वय सतरा सारं ॥ २ ॥ श्री० ॥

सोडानी शिकणें पुण्यामधुनि ते गेले । शाळेंत नोकरी मास्तर ते मग झाले । पांच रुपड्यावरि पोरं वळूं लागले । दैवाचे खेळ बघा सारे ॥ शिक्षक हे सारे इंग्रजि अमदानिंतले । नाहिं मानमरातब हमाल हें जग बोलें । पगाराच्या काटकसरिला हेचि बळि पडले । शिक्षणखातें हें असलें ॥ चिपळूण मालवण गांवीं बदलुनि गेले । पाचाचें दाहा दाहाचे पंधरा झाले । मग रत्नागिरीला पंचवीस मिळूं लागले । पुढें मग पुण्यास बदलीलें ॥ ( चाल ) मास्तराचे झाले मग असि- स्टंट डेपुटी ॥ केवढी बघा ही कर्तबगारी मोठी ॥ जरि नव्हतं इंग्रजी तरी विद्या बहु मोठी ॥ संस्कृत आणि गणितांत पटाइत मूर्ति ॥ त्या वेळिं गंगाधरशास्त्री असें त्या वदती ॥ ( चाल प० )जे घोकंपट्टी डिग्रि पुरनी करणार । विद्यार्थी यांनीं चरित्र ऐकुन सारं । काढावें यांतुनि कांहीं बोधाचें सार । सारुनी नेकटाय कॉलर ॥ ३ ॥ श्री० ॥

नोकरींत असतां गंगाधरपंताचे । अहो झाले होते चार हात दोनींचे । पार्वतीबाइ हें नाम तया अम्तुरिचें । झालें सार्थक लग्नाचें ॥ तें सौख्य पावलें कन्यासंतानाचें । परि पुत्राविण तें दीनवदन दोघांचें । तें पुत्र हेंच साधन स्वकुलोद्धाराचें । इहपरलोकीं सौख्याचें ॥ पुत्राचे पायीं पिंपळ उवर यांचे । किती पार झिजविले अनंतशा वृक्षांचे । उपवास व्रतें सर्वदा देवधर्माचें । चालें पार्वतिबाईचें ॥ ( चाल ) जें जें कोणी पुत्रासाठीं सांगे तें ती करी ॥ होइन माता जगविख्याता आस

धरी अंतरीं ॥ सती पार्वतीबाई सगळे नेमधर्म आचरी ॥ ( चाल ) मांडली गाइची सेवा ॥ तिन्ही त्रिकाळ धरुनी भावा ॥ तेल तूप मारुती देवा ॥ वाहिला बेल महादेवा ॥ गणपतीस शेंदुर दुर्वा ॥ तुळशीची माळ केशवा ॥ तो सत्यनारायण बरवा ॥ जाखाई जोखाई अंबा ॥ खंडोबा बिरोबा देवा ॥ पूजिलें नेमानें सर्वा ॥ ( चा. प. ) पार्वतीबाइचें दैवचि बलवत्तर । सांगितलें कोणी पुजावा भास्कर । तो सूर्यनारायण धरुनिया अवतार । नांव काढील जगीं फार ॥ ४ ॥ श्री० ॥

ती त्रिकालपूजा चालु झाली बाईची । बहु भावभक्तिनें नित्य सूर्य देवाची । भक्तिचा भुकेला देव पुरवि भक्ताची । कामना पार्वतीबाईची ॥ लोटले दिवस मग त्यांच्या आनंदाची । परमावधि झाली शक्ति न वर्णायाची । या जगीं एकची गोष्ट पुत्रलाभाची । सीमा ती आनंदाची ॥ ( चाल ) ईश्वरीसूत्र हाललें । नउमहिने पुरे जाहाले ॥ आनंदें पृथ्वि ही डोले । ते स्वर्ग नाचुं लागले । पूर्वज स्वर्गिचे सगळे । हर्षानें पिटिति करताले ॥ स्वातंत्र्य गाऊं लागलें । दिक्प्रांत खुलुनिया गेले ॥ घणघणाट घंटा चाले । जगब्रह्म नादमय झालें ॥ ( चाल पहिली. ) जन्मकाल होतां सूर्याचा अवतार । पार्वतीबाइच्या उदरीं आला नरवर । त्या टाळी गर्जना करोनी जयजयकार ॥ लोकमान्यांचा एकवार ॥ ५ ॥ श्री० ॥

बंडाच्या साला अगोदरिल जें साल । त्या सालीं टिळक भगवान जन्मा आलं । भाग्यवान मातापितां आनंदें डोलं । पुत्रमुख पाहुनि मन धालं ॥ बारसें उद्यावण शेंडी जावळ झालं । हौसेनें केशव नांव

पणजाचें ठेवलं । परि सर्व म्हणति लाडानें " बाळ बाळ " । हेंचि गाजलें नांव झालं ॥ पांचव्या वर्षि दसऱ्याच्या मुहूर्ति गेलं । हें बाळ शाळेला पाटी पूजन केलं । त्या आधींच पंतांनीं फार हो शिकवीलं । तेंचि पुढं कामाला आलं ॥ संस्कृत श्लोक तर लहानपणिंच शिकवील । दर एका श्लोकाला एक पै असं ठरलं । असं लहानपणिं बाळानं बहुत कमवीलं । पयांचे ढीग बघा पडल ॥ ( चाल ) झाली मुंज आठव्या वर्षाला ॥ तिथं उपाध्याय तो आला ॥ तो शिकवुं लागला संध्येला ॥ मुंजास ब्रह्मकर्माला ॥ तो मुंजा म्हणूं लागला ॥ घडघडा स्वच्छ संध्येला ॥ वाटलें नवल तें सकला ॥ म्हणति हा बटुच कीं गमला ॥ मुंजीच्या पूर्वी बाळाला ॥ निम्मा अमरकोश पाठ त्याला ॥ रूपावली समासचक्राला ॥ पाठ ब्रह्मकर्माचा झाला ॥ ( चा० प० ) संध्येतिल चोविस नावें तरी बरोबर । येतात कितींना स्वतः ध्यावा विचार । हा दोष आईबापावरती साचार । बाप तसा बेटा व्यवहार ॥ ६ ॥ श्री० ॥

त्या लोकमान्यांना तोरा अरेरावीचा । मुळिं खपत नसे हा स्वभाव होता त्यांचा । लहानपणापासून मासला याचा । ऐकण्याजोगा गमतीचा । शाळेंत मराठी वर्गातिल पोरांचा । एकदां उडाला जलसा शेंगा खाण्याचा । वर्गातचि मास्तर नसतां फोलपटांचा । झाला केर सहज त्याचा ॥ वर्गात आल्यावर मास्तर फोलपटांचा । तो केर पाहुनी संतापे मनिं साचा । म्हणे कोणी खाल्या शेंगा बोला त्याचा । उपटतों कान एकदांचा ॥ ( चाल ) मास्तर मारकट होता ठावें

पोराला ॥ धाकानें फार पोरासी घाबरा सुटला ॥ बघनाति हळुंच मग पोरें एकमेकाला ॥ खुणविती बोलूं नको असें चमकवुनी डोळा ॥ ( चाल. ) बोलेना कुणीच मग गुरुजीला ॥ राग तो सहजची आला ॥ रागानें लाल गुरुजी झाला ॥ ह्मणे चल्हो छडचा ध्यायाला ॥ काढावा केर हा तुह्मिं सगळा ॥ नाहिंतर देतों शिक्षेला ॥ रागाच्या सपाट्यांत सर्वाला ॥ झोडपीत मास्तर सुटला ॥ आज्ञा करि गुरुजी टिळकाला ॥ ह्मणे केर काढि हा सगळा ॥ ( चाल ) मग बाळ बोलु लागला ॥ अपराध नाहिं मीं केला ॥ मग काय म्हणुनि शिक्षेला ॥ भोगावें सांगा हो मजला ॥ सांगतों स्पष्ट अपुल्याला ॥ एकता गुरूजी चिडला ॥ दांत ओठ चावुं लागला ॥ रागानें बोले बाळाला ॥ उद्धटा टवाळा बाळ्या ॥ भोगीले पाहिजे शिक्षेला ॥ नातरी आत्तां जा घरला ॥ तेंव्हांच ताडकन शाळा ॥ सोडुनी बाळ जाइ घरला ॥ मास्तर कळवि पंताला ॥ कांहीं सांगा तुमच्या पोराला ॥ विचारीत पिता पुत्राला ॥ झाला प्रकार समजुन घेतला ॥ कळविलें त्यांनीं गुरुजीला ॥ खोटें बोलणें माझ्या बाळाला ॥ नाहिं ठावें आजवरि त्याला ( चा० प० ) या धैर्याची किती सांपडतील हो पोरें । विश्वासहि इतका अपुल्या पोरावर । ठेविती असे आइबाप किती निघणार । मोजा हाताच्या बोटावर ॥ ७ ॥ श्री० ॥

सरकारी जें जें सर्वहि तें रयतेचें । हें बाळकडु या गोडशा तत्वाचें । टिळकासि पाजिलें देवानें देशाचें । वाटें भाग्याचि हें साचें ॥ ऐकावें आतां उदाहरण तें याचें । या टिळक बाळाच्या

अगदीं लहानपणिचें । परि थोरांनाहि खास लाजविण्याचें । जोगें आहे गमतीचें ॥ लोकमान्य असतां चौदा पंधरा वर्षाचे । ते गेले फिराया बाजुस त्या पर्वतीचे । संवगडी बरोबर होते त्या समयींचे । कशाला हवें नांव त्यांचें ॥ ( चाल ) लागली आंबराई ती त्यास वाटेला ॥ पाहिलें सर्व पोरांनीं अंबराईला ॥ लागले घोस कैऱ्याचे बहुत आंब्याला । सर्वांच्या तेव्हां सुटलें पाणी तोंडाला ॥ कुणि म्हणें काढू या कैऱ्या हळुच खायाला ॥ कुणि म्हणें नको पाहील कोणी अपुल्याला ॥ ( चाल. ) बाळ टिळक ह्मणे भितां कायरे हणा दगड अंब्याला ॥ स्वतः दगडाचा टोला देउनी अचुक नेम साधिला ॥ घोस कैऱ्याचे पडतां खालीं करिति पटापट गोळा ॥ कोणी घालिति खिशांत कोणी तिथंच खाउं लागला ॥ मिटक्या मारिति म्हणती वाहवा काय चव आंब्याला ॥ ( चाल ) तिथ असा डाव तो मांडिला ॥ रखवालदार मग आला ॥ हा प्रकार पाहुनिया चिडला ॥ अंतरीं फार चरफडला ॥ दरडावीत पुढती मग आला ॥ पोरासी घाबरा सुटला ॥ चोरीचा गुन्हा तुह्मी केला ॥ चला नेतों गेटीवर तुम्हाला ॥ ( चाल. ) मग बाळ पुढें तो आला ॥ साहुनी मार्गे पारांला ॥ धीरानें बोलुं लागला ॥ रखवालदारा त्या वेळां ॥ धनि कोण आंबराईला ॥ सांगरे सांग ह्मणें मजला ॥ रखवालदार बोलीला ॥ सरकार धनी ठावं सकला ॥ ( चाल ) बाळाचें भाषण या पुढचें ॥ ऐकण्याजोगें बहारीचें ॥ सरकारनें म्हणजे तें रयतेचें ॥ हो सार्वजनिक सर्वांचें ॥ ऐकुन हें रखवालदाराचें ॥ भडकलें पित्त

एकदाचें ॥ मग त्याचे हातावर चवलीचे ठेविले पैसे लाचाचे ॥ हे पैसे नव्हेत रे सरकारचे ॥ घे तूंच कांहिं तरि याचें ॥ ( चाल प० ) सरकारी जें जें सर्वही तें रयतेचें । हें बाळकडु या गोडशा तत्त्वाचें । टिळकासी पाजिलें देवानें दशाचें । वाटे भाग्यचि हें साचें ॥ ८ ॥ श्री० ॥

लहानपणींच्या किती गोष्टी सांगाव्या । पुरणार नाहिं कीं एक जन्म एकाया । असुं दहाव्या वर्षी इंग्रजि शिक्षण घ्याया । झाला आरंभ पुण्यामधिं त्या ॥ गंगाधरपंतही पुण्यामध्यें बदलुनिया । शाळेचे इन्स्पेक्टर आले होउनिया । अशि अनुकूलता टिळकासि आली त्या समया । दैवें शिक्षण कामिं या ॥ ( चाल ) सिटिस्कुलांत इंग्रजी शिक्षण ॥ झाले पास मॅट्रिक ज्ञान ॥ झालें होतें आधींच तें लग्न ॥ सत्यभामा पत्नीचें नाम ॥ ( चाल प० ) आनंद असा परि अठराशें बहात्तर । त्यासाली वारले वडील गंगाधर । पार्वती माय ही निवर्तली अगोदर । उडाला दुःखाचा कहर ॥ ९ ॥ श्री० ॥

गोविंदराव या नांवाचे एक चुलते । आणि चुलति मायाळु अडबापासम होते । यांनींच लहानाचे थोर केलं टिळकातें । नाहिं मायेचें या परतें ॥ डेक्कन कॉलेजीं अठराशें ब्याहात्तरींतें । लोकमान्य गेले पुढील अभ्यासातें । हायस्कुलाप्रमाणें अभ्यासक्रम तेथें । मासलेवाइक सर्वचि तें ॥ कॉलेजांतिल वर्ष पहिलें देवानें । टिळकांनीं दिधलें अभ्यास नाहीं तेथें । परि तालिमबाजी दंड जोर बैठकितें । काढुन शरिर कमविलं तें ॥ हे लहानपणिचे अशक्त भारिच होते । मूर्ति पण मुनी विलक्षण दिसण्यातें । पाहतांक्षणीं ये हंसून बघणाऱ्यात । पाहुनी

विचित्ररूपाते ॥ ( चाल. ) खालीं हातापायाच्या काड्या वर ढरपोट ॥ या ढरपोटावरि मस्तक लहान छोटं ॥ मिचमिचीत डोळे मानमधीं काटकुट ॥ देहाची ठेंगणी मूर्ति काळीकुट्ट ॥ जणुं अबाळलेलं मूल खुजट रोगीट ॥ ( चा० प० ) परि एक वर्षाच्या आंत बदललं सारं । तेजस्वि दिसू लागले जसे भास्कर । गुटगुटीत अंगलट दणकट बहु खंबीर । जणू बलभीम अवतार ॥ १० ॥ श्री० ॥

कॉलेजांतील बहुत मुलांचा थाट । वर्णायाला हवा कवी तो भाट । नेकटाय कॉलरची त्रिंधी गळ्यामधिं ताठ । पायिं साहेबी साक्स बूट ॥ गंजिफ्राकावर सद्रा वर शर्ट । त्यावरी असें तें फॅशनेबल जाकीट । वर कोट खालीं पाटलुण डोइला हॅट । खिशामधिं घड्याळ किटकिट ॥ हा पुरुष परि करिं छत्रि लेडिची थेट । डोइला भांग डोळ्याला आरशी ऐट । त्या मिशास फाटा निदानचा फ्रेंचकट । तोंडिं विडी सिगार चीरूट ॥ ( चाल. ) बोलता मराठी भाषा ॥ इंग्रजी शब्दाची घोषा ॥ वापरी साहेबी वेषा ॥ विसरती स्वदेशी पेशा ॥ ह्याताऱ्या वडिल माणसा ॥ धुडकावुनि करि यसफसा ॥ प्रकृतिनें तोळा मासा ॥ नाजूक बायकी ऐसा ॥ ( चा० प० ) थोडे फार हे कालेजांतिल थेर । कांहींच्या अंगिं तरी थोडबहुत असणार । अपवाद परी या असे टिळक बहाद्दर । काम हें असंच कांहिं न्यारं ॥ ११ ॥ श्री० ॥

आठशें जोर आठशें बैठकी सहज । लीलेनें काढित होते टिळक महाराज । दोनदोन तास पाण्यांत डुंबले रोज । खाते

बनले तालीमबाज ॥ पाण्यांत उनाणे पडूनीया ते सहज । दाखवीत दशमी खायाची ती मौज। असं पाण्यामध्यें पोहण्यांत तरबेज । होते कीं टिळक महाराज ॥ त्या काशीला तेराशें फुटांचें मंज । इतकें गंगापात्र रुंद बहु गाजं । एका दमांत सरळ पलिकडे जाउनी तेज । दाखवी पहा टिळकराज ॥ ( चाल ) कालेजामधिं वज्रमुष्टीचा खेळ बहु खेळती ॥ दंडावरती जोरा जोरानें मुष्टि दणकाविती ॥ येतां जातां भिंती कूबाच्या धडकानें हलविती ॥ दूध शेरच्या शेर पिऊनी ( झोकुनी ) तालमींत पचविती ॥ आचाऱ्यान्या स्वयंपाकाचें दिवाळेंच काढिती ॥ ( चा० प० ) कॉलेजामधिं पहिल्या वर्षी सारं । केलं हेंचि कमविलें शरिर जोरदार । ऐका हो अलिकडिल विद्यार्थी-वर । कांहिं घ्या यांतिल तें सार ॥ १२ ॥ श्री० ॥

संस्कृत आणि नं गणित विषय हे दोन । उत्तमची होते लहान-पणापासून । प्राविण्याचा एक दाखला छान । देतों द्यावा जरा कान॥ कालेजांतिल गणिताध्यापक नाम । हॅथॉर्नवेटसाहेब गणिति प्रवीण । एकदां बीज गणितांतिल उदाहरण । जुळेना कांहीं केल्यानं ॥ साहेब बहाद्दर दमले आंकडे मांडून। परि गणितांतिल उत्तरास उत्तर जुळे न । गणितांतिल उत्तर चूक खोडा एकदम । केला हुकूम साहेबानं ॥ मग उदाहरण तें टिळकांनिं सोडवून । गुरुजींस दिधली चूक त्यास दाख-वून । केलं थक्क सर्वांना गणीत प्राविण्यानं । प्रोफेसर थँक्स थँक्स ह्मण॥ ( चाल. ) टिळकांची अभ्यासी रीत ॥ होति विचित्र कालेजांत ॥ सारा दिवस घालविति गप्पांत ॥ काधिं कधिं जाई आळसांत ॥ रात्रीचे बारा-

(११) २०१२ काव्य
९३२७ २०१७।८८

पर्यंत ॥ मित्रांना जागविण्यांत ॥ ( चा० प० ) अभ्यासा बसती मध्यरात्रीं नंतर । तल्लिन होती लाविती तंद्री बरोबर । पहांट होतांचि कुंभकर्णां अवतार । लाविती आख्यान घोरासूर ॥ १३ ॥ श्री० ॥

ते बी. ए. झाले अठराशें शाहात्तरीं । अठराशें एकुण ऐशींत टिळकांची स्वारी । झाली कीं बी. ए. एल. एल. बी. पदव्या दरबारीं । मिळाल्या तेव्हां रीतसरी ॥ या कॉलेजामधिं सहाध्यायी टिळकांचे । कोण कोण होते असलें एकायाचें । तरि विनंति सकलां ध्यान जरा द्यायाचें । झाडावें दैन्य आळसाचें ॥ ते दादासाहेब खापर्डे कंठ मणी ॥ अप्पासाहेब अडनांव शारंगपाणी । आर. डी. सेटना दाजीसाहेब खरे आणि । श्रीधरपंत उपासनी ॥ रावसाहेब मनोहरपंत काथवटे । ते ओकशास्त्री वामनराव आपटे । रावबहादुर माधवराव चौबळ मोठे । लक्ष्मणराव देशपांडे होत ॥ न्यायमूर्ति नारायणराव चंदावरकर । गाजली जोडि ते जोडीचे आगरकर । इत्यादि प्रसिद्ध अप्रसिद्धही इतर । असतीं बहुत खरोखर ॥ ( चाल. ) झाले बडे सरकारी नोकर । कुणि ग्रंथकार कविवर ॥ कुणि नामदार कौंसीलर । कुणि लेखक वक्ता हुषार ॥ ऐश्वर्य भोगुनी हें सारं । केला सा कुणीं संसार ॥ ( प. चा. ) हा हिंददेशाचि हेंचि कीं घरदार । समजुनी हाल वनवास भोगिले फार । अशी जोडी एकाचि टिळक आगरकर । होय ना बोला हेंचि खरं ॥ १४ ॥ श्री० ॥

घेनांच नांव टिळकांचे डोळ्यासमोर । राहती उभे प्रोफेसर आगरकर । सामाजीक ती सुधारणा करणार । देशभक्तिचे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

आगर ॥ मैत्री यांची नव्हति पूर्वीपासुनची । ती कालेजामधिं जडलि एकमेकांची । आमरण राहिली हृदयांतरि जरि त्यांची । मतभिन्नता होति साची ॥ कालेजामधिं असतांना दोघांचे । ते चालायाचे विचार देशोन्नतीचे । ती करुणा आली देवाला भाग्याचे । आले दिवस हिंदभूमीचे ॥ कालेजामधिं घडतचि या दोघांचे । वादविवादचि अत्यंत कडाक्याचे । सामाजिक ती सुधारणा अगोदरचें । कार्य हें ह्मणणें आगरकरांचं ॥ टिळकांचें मत राजकीय बाबींत । ती सुधारणा हवि अगोदर सर्वांत । मग कल्याणाचा सर्व ठेवा हातांत । पडेलचि आपोआप खचित ॥ अशा तऱ्हेचीं दोघांचीं हीं दोन । सुप्रमाणिक तीं मतें होतिं हो भिन्न । त्या कालेजामधिं कितीतरी यावरुन । चाले दोघांचा वाद छान ॥ मी कांहिं मासला देतों या वादाचा । तो ऐकुन घ्यावा चतुर श्रोते हो साचा । योग्यायोग्यचि तुह्मींच निर्णय याचा । ठरवा काय ठरवायाचा ॥ ( चाल. ) अगोदर घर मग दार । असें ह्मणती आगरकर ॥ मजबूत जयाचें घर । त्याचें दार नाहिं जाणार ॥ ज्या नाहिं घरीं किंमत । पुसे कोण तया जगतांत ॥ घरीं ज्याचे बायका पोरांत । थैमान जुलुम चालींत ॥ हे घरचें दुःख कल्लोळ । उडविती दुर्दशा जाळ ॥ ( चाल. ) दुष्टरूढीच्या अग्नीनें हें घर अमुचें जाळिलें ॥ सारि दुनिया धावे पुढती घर अमुचें रेंगळें ॥ मताखेताच्या विश्वासानें घर अमुचें पच्छाडिलें ॥ कर्जबाजारी झालें घर कीं त्या कुळधर्मामुळें ॥ विधवा अबला फिरती दीना याच दुष्ट रूढीमुळें ॥ स्मशानयात्रेमधीं प्रेताची विटंबना

इजमुळें ॥ स्वेच्छास्वच्छना विचार नाहीं ह्मणति सोवळें ओवळें ॥ अशा पर्वाच्या रुढीमुळें घरदार पार नासलें । उघडच्या डोळ्यांनीं कसें बघति हे विद्वानही बावळे ॥ ( चा. प. ) जोरानें बोलले एसें आगरकर । हें घर सुधारा आधीं नाहीं तर । येईल हातामधिं तुमच्या हो खापर । घडनी फिरा दारोदार ॥ १५ ॥ श्री० ॥

टिळकांचें ऐका ओतेजन उत्तर । मी नाहीं तुमच्या विरुद्ध हो खरोखर । तें सुधारलें पाहिजे अगोदर घर । तुमचं ह्मणणं बरोबर ॥ या जगतामध्यें नको कुणाला घर । हा खटाटोप त्या घरापायीं हो सारं । या जगांत झगडा घरापायिं झुंजार । घर जरि तरीच संसार ॥ परि घराचि नाहीं अशी स्थिति मुळांत । मग काय सुधारा सांगा सत्वर येथं । या आधीं घर त्या पायिं अम्ही घडपडत । सुधारा खुशाल मग त्वरित ॥ हे इंग्रज येथें हजारों मैलावरून। ते घापा टाकित आले हावरपणानं । जगभर पसरले उलाढाली करून । घरासाठींच सत्य जाण ॥ आणीक बोलले टिळक ऐका आतां । आधीं घर मग दार हें कसें म्हणतां । दृष्टीला पडनें दार आधिं हा पुरता । करावा विचार तो आतां ॥ ( चाल. ) तें बाह्य जग या घरा नको कां सांगा ॥ या घरापायिं बाजार नको कां सांगा ॥ या घरा दार खंबीर नको कां सांगा ॥ या घरा भिंती दणकट नको कां सांगा ॥ ( प. चा ) अस्तित्व घराचें या गोष्टीवर फार । हें सत्य नसें कां सांग आगरकर । डोलवी मान मग आगरकर सत्वर । पटविलें त्यांना हें सारं ॥ १६ ॥ श्री० ॥

तात्पर्य राजकिय परिस्थितीनें घर । विध्वंस पावलें उरलें नाहीं दार । मग अंगण कुठलें घराचि गोष्ट तर दूर । समजुन घ्या अंतरिं सार ॥ ही राजकीय कीं परिस्थिती भेसुर । या घरांत शिरली अपुल्या एकंदर । व्यापून उरे ही सबाह्य अभ्यंतर । पाहतां घस्स होइ ऊर ॥ आमुच्या घरांतिल मुलें हींच कीं देव । कशि दैना त्यांची उडाली हरहर देव । हें कशापरी कोणत्या शब्दिं सांगावं । हेंचि कांहिं उमजेना राव ॥ त्या दुधातुपाची त्यासि मिळेना धार । दरवर्षी जाती विलायतेला ढोरं । अन्नाचा घासही नसे किती तरी पोरं । मरती उपाशीं हरहर ॥ धनाचा सारा वाहत नाहिं सुमार । लष्कराकडे किति तरी द्रव्य अनिवार । चालली मुलांच्या शिक्षणिं काटकसर । जाणतें अखिल जगत सारं ॥ ( चाल ) आमुच्या मुलांना शिक्षण । दिलें जातें फार नादान ॥ एकाऊ हॅज ना सोल । ही इंग्रजांची अक्कल ॥ गाईला आत्मा नाहींर । हें मुर्ख शिकविति असलं ॥ त्या शिक्षणाची ती ही रड । पोटाची तशी ओरड ॥ ( चा. प ) ही सामाजिक हो सुधारणा खरोखर । प्रत्यक्ष हानि त्या म्हणजे हें सरकार । येईल आडवें तुम्हांस त्या बरोबर । लागेल झगडावें फार ॥ १७ ॥ श्री० ॥

सामाजिक ही जखम असे हृदयाची । परी जखम ही नाहीं तलवारीची । ही जखम असे कीं मोठी मोठी भुकेची । अन्ना-विण पडली साची ॥ अन्नाविण हें हृदय अशक्तचि झालें । निर्फळ जरी तें मलम वरती चोळीलें । अन्नचि हो थोडें उदरीं पाहिजे गेलें ।

याचें औषध हें असलें ॥ या अन्नाचें तें ताट परक्याचे हातीं । तो कांजी घाली मुखीं जगविण्यापुरती । परि अन्नदाता म्हणवित आणखी वरती । उपकारी होई जगतीं ॥ ( चाल. ) हा विचार ऐसा झाला । सदुपाय एक ठरवीला ॥ शिक्षण आधि सर्वाला । देणेंच योग्य या वेळां ॥ आपणाचि अपुल्या पोराला ( देशाला ) । शिकविणें योग्य अपणाला ॥ येणेंच आर्यभूमीला । येईल खास शुभ वेळा ॥ (चा प.) ते टिळक आणि ते राव आगरकर । हे सखे जिवाचे सरसावीती म्हणुन । राष्ट्राला राष्ट्रिय शिक्षण द्याया वीर । सरकले पुढें बाणेदार ॥१८॥ श्री० ॥

येथून पुढें टिळकांचें चरित्र त्याला । जनिं सार्वजनिकसें स्वरूप आलें त्याला । न्यु स्कुल स्थापिलें १८८० ला । पुण्याला जानेवारीला ॥ श्रोतेहो करुनी विषयांतर तें आतां । बोलतों लक्ष द्या शांत करोनी चित्ता । टिळकांच्या पूर्वीचा महाराष्ट्र तो होता । कैसा ध्यानीं घ्या आतां ॥ त्या योगें अवघें रहस्य तें तुम्हांला । टिळकांच्या देशसेवेच्या स्फूर्तिचें सकला । उमजेल मागें जरा बघा भूतकाळाला । सन अठराशें अठराला ( १८१८ ) ला ॥ या योगें मर्म तें टिळक चरित्रांतील । येईल ध्यानिं तव मनीं नीट उमजल । प्रारंभ यास अठराशें अठरा साल । बाजिराव पुणें सोडुन गेल ॥ श्रीमंत पेशवे पुण्यास मग नंतर । कुणि नाहिं राहिले येऊन कायम तर । अस्तास गेलि वैभव चंद्राची कोर । नाहिं पुनः दिसली आजवर ॥ ( चाल. ) फुलगांवचा वाडा पेशव्यांचा टोलेजंग भला ॥ साडेसात हजारा लिलांव कीं हो झाला ॥ नव्या कचेऱ्यांनीं शनिवार वाडा तो भरला॥

बुधवार याव्याला लायबरीची कळा ॥ जिथं रात्रंदिन तो स्वराज्याचा गलगला ॥ तिथं हिवसा कचेऱ्या रात्रिं जागा घुबडाला ॥ जिथं स्वराज्याचा चौघडा होता घडघडला ॥ तो काळाच्या तालांत गडप कीं झाला ॥ स्वातंत्र्य देवीचा जिथं मुगुट झळझळला ॥ तिथं पारतंत्र्य अवदशा नाचे अवकळा ॥ जिथं पराक्रमाचा दिव्य ध्वज फडफडला ॥ तिथं बे हिंमतीचें काळें लागें तोंडाला ॥ गेलें तेज पुण्याचें आली त्यास प्रेतकळा ॥ ( प. चा. ) अठराशें सत्तावन सालिं बंडाची फेर । चमकली स्वातंत्र्यापायिं राष्ट्र-तलवार । श्रीमंत पेशवे नानासाहेब रणशूर । झाले नापत्ता अखेर ॥ १९ ॥ श्री० ॥

पुढें तीस वर्षांनीं सातारचे छत्रपती । झाले नामशेष गादीस मिळे मूठमाती । गेलेलें राज्य मिळवाया खटपट अती । केली परि यश नाहीं अंतीं ॥ तो रंगो बापुजी वकील विलायतेला । गेला सनदशीर ती चळवळ करावयाला । तिकडील मोठ्या साहेबांचा वशीला लावला । परि उपयोग नाहिं झाला ॥ साहेबांनीं दाविली सहानुभूति मोठी । परि खालसा केलेलें राज्य देण्याच्या गोष्टी । कुणि नाहिं बोलिले दैवाचि गति उलटी । फिरली सारिच उफराटी ॥ ज्या मराठ्यांच्या दरबारीं इंग्रज होते । नोकरी करून जे चाकर पोटापुरते । त्याकडेच जावें छत्रपतीनें उलटें । बघा हें कसें दैव खोटें ॥ ग्वाल्हेर बडोदा इंदूर म्हैसूर आदी । अशिं कांहीं राहिलीं संस्थानें शरमिंदीं । इंग्रजांच्या डोळयाच्या धाकामंदीं । बसले संभाळुन गादी ॥ सामान्य

तेव्हांचे संस्थानिक सरदार । ते इनामदार आणखि जहागिरदार । यांना तर आली वेळ बहुत खडतर । कोण तें वर्णन करणार ॥ (चाल) लष्करी पेषा आणि त्यांची मिळकत गेली ॥ जमिनीच्या उत्पन्नावरि भिस्तचि पडली ॥ नी मिजासखोरी कमी नाहीं वाढली ॥ आळस आणि अज्ञान दोन्हीं भिडलीं ॥ ( चाल. ) पहिल्या प्रथम इंग्रजी झाली । जगती ही लक्ष्मि घरीं आली ॥ पेशव्यांची ताबेदारी चुकली । घर बसल्या खाती पोळी ॥ वाढली खुशाली ख्याली । घालवी जन्म रंगलाली ॥ ( प. चा.) ना विद्या शक्ति अक्कल नाव्यवहार । एक जीव खायाला काळ धरणिला भार । सरदार कशाचे बनले हे मुडदार । पूर्वजां काळें फासणार ॥ २० ॥ श्री० ॥

ही सरदारांची स्थिति ऐशि हो झाली । परि कारकुनी पेशाच्या ब्राम्हणा आली । बरि संधि इंग्रजा त्यांची गरज लागली । चांगलिच पोळी ती पिकली ॥ कमविणें राज्य हें जगांत सोपें असतें । परि कठिणाचे पडतें चालवावयाचें तें । जरि होती कला ही अवगत साहेबाते । झालें कठिण आरंभातें ॥ तीं राज्यकारभाराचीं खातीं सर्व । सुरळीत चालण्या इकडिल कुणि तरि व्हावें । हें चतुर इंग्रजां क्षणांत पडलें ठावें । ब्राम्हणा मग आयतें फावें ॥ ते कारकुनी पेशाचे ब्राह्मण आले । र ट फ इंग्रजी भाषा क्षणांत शिकले । इंग्रजांपुढें नोकर उभे ठाकले । साहेब गुड मार्निंग बोले ॥ इंग्रजांच्या राज्यस्थापनेच्या मार्गांत । त्यांनींच काढले झाडुन काटेकट । लावोनि दिली ती जिकडे तिकडे शिस्त । राजमार्गांत दरोबस्त ॥ आपुल्याच

देशीं आपणची नोकर । परक्यासि बसविलें आणुन गादीवर । खर्चु-
निया आपुलें शहाणपण तें सारं । केलं परक्याचं बरं ॥ ( चाल. )
पहिल्या अमदानिंत राजे होते इंग्रज ते नांवाचे ॥ राज्य शिरस्तेदाराचें
कीं होतें हेडक्लार्कचें ॥ वजनदार अधिकारि सदां हे साहेबांच्या
जवळचे ॥ अधिकारानें उरले यांना स्वर्ग दोन बोटींचे ॥ आपल्या
लोकांवरि गुरगुरती कुत्रे साहेबापुढचे ॥ कुऱ्हाडीचे हे दांडे जणुं कीं
झाले काळ गोताचे ॥ ( प. चाल ) त्या काळच्या शहाण्यांनीं राहु-
निया नोकर ( घेऊनिया पगार ) । इंग्रजांस विकलें आक्कलेचें कोठार ।
बस्तान दिलें बसवून एकंदर सारं । चालवुन राज्यकारभार ॥२१ ॥श्री०॥

देशांत परिस्थिति पेशवाईनंतर । ही अशाप्रकारची होती एकंदर । सर्वत्र सांगु लागलों नाहिं पुरणार । वळ द्या अटकळिनं सारं ॥ परि सार्वजनिक कार्यांत टिळक न पडले । त्यापूर्वी महाराष्ट्रांतिल जुनि पिढि चाले । ती कशी काय हें टिळक स्वतः बोलले । तेंचि मी गातों ऐका झालें ॥ त्या पेशवाइच्या नंतर कांहीं दिवस । त्या जुन्या खानदानीच्या लोकां-नाच । अहो उरलें होतें महत्त्व सर्व परीचें । होते बरे दिवस त्यांचे ॥ ते लोक आणि सरकारहि त्या मानीत । शिक्षणही नवीन अजुनी फारसं नव्हतं । त्या वेळीं देशाचे पुढारी हेची होत । करतिल तेंचि प्रमाणांत ॥ साहेबांचें इंग्रजी भाषण मराठी करून । सांगावं देशबंधुस मराठींतुन । मोडक्या तोडक्या इंग्रजि भाषेमधुन । मराठी साहेबा-लागून ॥ साहेबाच्या अगदीं जवळ उभा जो राही । शहाण्यांत

शहाणा ठरे नोनि त्या समयीं । त्या काळिं अशा देवाच्या पेक्षांही । मानित होति लोकशाही ॥ कांहींच अशांना नव्हतं कमी त्या वेळीं । स्वर्गीचें वैभव आलें त्यांचें जवळीं । इंग्रजांची पहिली अमदानि ही असली । अशांना चांगलीच फळली ॥ ( चाल ) लाभतां धनदौलत अशांस चांग ॥ बिघडवी मागला खास जगांतिल नियम ॥ हे खानदानिचे लोक बनले श्रीमान ॥ आळसानें त्यांस घेरलें पुढें हो पूर्ण ॥ कांहींच घडेना पुढें हातुनी काम ॥ देइनासे जाहले सरकारहि त्या मान । (चाल पहिली ) काढून घरांची दार नवें नो क्रूर । सापळ्यांत करितचि वाघ उगीच गुरगुर । परि दुरुन मारिती खडे बायका पोरं । अशी गत झालि त्यांची थोर ॥ २९ ॥ श्री० ॥

एकापरी टिळक महाराज आणखी बोलले । पुढें नवीन शिक्षण इंग्रजांनीं सुरू केलें । सांपडले इंग्रजां बहुत लोक शिकलेले । लायक नोकरीलाच भले ॥ या योगें इंग्रज राज्यकारभाराची । लागली सोय बरि जुळणी जुळली त्यांची । परि कर्मदशा ओढवलि अपुल्या देशाची । हायरे हिंदनायभूमी ॥ या शिकलेल्या लोकांच्या मनाची अवस्था । झालि भयंकर शोचनीय हो सर्वथा । या हिंदिसमाजाविषयीं आदर नुसता । नाहिं उरला त्यांचे चित्ता ॥ जुन्या सामाजिक वा धार्मिक चालीरीती । तिरस्कारा करिती थोडें त्या लागती । अधिकार मदानें ( विद्येच्या घमेंडित ) टवाळि करिती भरी । समाजाची हो नसे खंती ॥ ती स्वधर्मनिष्ठा विद्या नीति आचरण । आणि गृहस्थिति ती यांचें एकीकरण । ज्याविषें पुढारीपणासही विद्वान । पात्र

जनिं होत नाहिं जाण ॥ ( चाल. ) परी इंग्रजी शिक्षणानें हे एकि-करण तोडीलें ॥ जुनें तेवढें सर्वहि वाइट यांस दिसूं लागलें ॥ नवें तेवढें सोनें म्हणती कवटाळुनिया भले ॥ आचारांत विचारांतही ना धरबंध राहिले ॥ बुद्धिवान हे खरे परंतू विद्येनें बहकले ॥ नव्या इंग्रजी शिक्षणानें हे धर्मलंड जाहले ॥ नव्या इंग्रजी शिक्षणानें हे दुराचरणि जाहले ॥ नव्या इंग्रजी शिक्षणानें हे विचाररहित बावळे ॥ नव्या इंग्रजी शिक्षणानें हे स्वार्थावरि बैसले ॥ नव्या इंग्रजी शिक्ष-णानें हे स्वदेशास विसरले ॥ ( प. चा. ) इंग्रजी विद्येनें आत्मघातकी वारं । कानांत शिरविलें बनविले पामर । अहो पराक्रमी सिंहास बनवी मेंढरं । अजीबात केलं कमजोर ॥ २३ ॥ श्री० ॥

हे जुन्या पिढीचें वर्णन एकंदरींत । तरि खरी राजनिष्ठा ती त्या लोकांत । नव्हती हें खास पूर्वींची आठवण होत । कोणाकोणाला हेंचि खचित ॥ तें गतवैभव कीं आठवणें मनुजाला । हें स्वाभाविकची असेंच माणुसकीला । तें आठवितां नव दुःख होतसें ज्याला । पाषाणाचि माणुस कसला ॥ ती स्वातंत्र्याची शुद्ध हवा जाऊन । तें परवशतेचें मलेरियाचें दुखणं । हें बरें असें म्हणणार सांगा कोण । जगीं या अज्ञानावीण ॥ तो स्वातंत्र्याचा कोकिल जाई मरून । तें परवशतेचें घुबड रडेंचि भयाण । हें बरें असें म्हणणार ० ॥ ती स्वातंत्र्याची लक्ष्मी गेलि उडोन । तिथं पारतंत्र्य अवदशा घालि थैमान । हें बरें असें ० ॥ तें स्वातंत्र्याचें नंदनवन जाऊन । निवडुंग काटे जंगल माजें रान । हें बरें असें ० ॥ तें स्वातंत्र्यावें स्वर्गभुवन

जाऊन । तिथं परत्र गतेचें नरककुंड पाहोन । हें बरें असें ० ॥ (चाल) यावरून त्याच पिढींतील कांहीं लोकांना ॥ आठवाची मराठेशाही साहजिक त्यांना ॥ कितिकांचिं मनें चवताळुन गेलीं जाणा ॥ देशास्तव फिरवुनि डोकीं देति निजप्राणा ॥ महाराष्ट्रामधली परंपरा ही जाणा ॥ ( प. चा. ) श्री वासुदेव बळवंत फडके रणधीर । जो उभारुनी बंडाचें निशाण खंबीर । या इंग्रजांच्या फासावरि चढला वीर । हिंदभूपायिं अर्पी शीर ॥ २४ ॥ श्री० ॥

हे फडके होते इंग्रजांचे नोकर । बहु चतुर तरतरित तरुण बाणेदार । उज्ज्वलसा होता स्वदेशाभिमान तर । धाडसी तसाच रणशूर ॥ दांडपट्टा बाण बोथाटि हुषार खेळणार । तसा अचुक नेम बंदुकिचा गोळीबार । ही युद्धकला गुरु लहुजिबुवा शिकविणार । झालें नांव जगीं फार ॥ ही राजकीय चळवळ करुनि सरकार । हालवून सोडावें करावें बहु जर्जर । हीं चळवळ द्रव्याविण कशी होणार । पडला विचार मनिं फार ॥ मग आडमार्गची धरावा पैशाकरितां । हा विचार ठरला फडक्यांचा हो पुरता । ते साह्यकारी योग्यचि या कामाकरितां । मांग रामोशी धरी हातां ॥ अठराशें शहात्तर सत्त्याहत्तर सालांत । दुष्काळ भयंकर पडला होता देशांत । त्या वेळिं हेचि रामोशी मांग घालीत । दरोडे हाचि कीं मुहूर्त ॥ ( चाल. ) अशि तयारि करुनि प्रचंड । ठोकुनी दंड । बंड सुरू केलें ॥ मरणाशिं बांधि बाशिंग । मग रणशिंग । जंगि फुंकीलें ॥ विजयाचे बांधुनी चंग । बनुनि रणरंग । दंगि रंगीठे ॥ इंग्रजांची तारा-

तिरपीट । करुनि मारपीट । पीव पाडीलें ॥ फडक्यांचें नांव ऐकतां । विजारि सावरिता । थोडि भुई पळतां । साहेबाला झालें ॥ परि दैव नाहिं अनुकूल । उलटलें सकल । बदलुनी गेलें ॥ ( प. चा. ) फडक्यांचा हेतु धुडकावुनीया पार । धंदाच ह्मणून ते मांगरामोशी तर । घालिती दरोडे फडके ठरले बंडखोर । फांशीला गेले हरहर ॥ २५ ॥

फडक्यांच्या वेळीं कांहीं स्वदेशभक्त । गुंतलेच होते देशहीत करण्यांत । सर्वांगसुंदर असें खास तें होतं । राहुन खास नोकरींत ॥ ते रावबहादुर रानडे माधवराव । विद्वान राजकारणी पुरुष तें नांव । गाजतें इतीहासांत जगाला ठावं । पुढारी थोर राजकीय ॥ टिळकांच्या पूर्वीच्या निकट पिढींत पुण्याचे । विख्यात पुढारी हेची होते साचे । टिळकांचे बोल ऐका त्या बद्दलचे । आदरणीय मान्यतेचे ॥ तेजस्वी महाराष्ट्रांतिल तेजचि गेलें । तें प्राण जाउनी जनीं प्रेतवत पडलें । फिरुनिया जिवंतचि होईल कां कधिं कालें । निवतिल कां बघुनी डोळे ॥ हा विचार रात्रंदिवस मनामधिं करुन । हें कठिण काम अंगावरती घेऊन । त्या कालिं देशहितकर्ता असेल जरि कोण । तरी ते माधवराव जाण ॥ यापरी रावबहादुराविषयीं उद्गार । टिळकांचे असती प्रसिद्ध या देशभर । तेंचि मी बोललों नाहिं यांत अक्षर । पदरचें शपथ खरोखर ॥ ( चाल. ) असें असुन रानडे सर्वमान्य नाहिं झाले ॥ याचें कारण ऐका काय बोलती सगळे ॥ सामाजिक धार्मिक सुधारणांचे हल्ले ॥ देशाच्या कल्याणापायीं वरती चढवीले ॥ प्रार्थना समाजाचे चालक

बनले ॥ विधवांच्या पुनर्विवाहाचे चाहते झाले ॥ या गोष्टी लोकांना अप्रिय हो त्या वेळे ॥ ( चा. प. ) परि लोकमताची पर्वा सोडुन पार । देशहित केलें यांनीं हो जन्मभर । ऐन उत्कर्षाच्या काळिं टिळक निरंतर । काढिन यांचें नांव फार ॥ २६ ॥ श्री० ॥

टिळकांच्या पूर्वि चें देशस्थिति वर्णन । लांबलेंच गेला असाल कंटाळोन । परि महिमा टिळकचरित्राचा यावरून । ध्यानीं येइल हो पूर्ण ॥ इंग्रजांची सत्ता हिंदभूमिमधिं घुसली । आणि त्यांची छाप सर्व लोकांवरि बसली । ती गोडी गुलाबी साहेबांची मनिं ठसली । फसली वेळ आली असली । देशास लाउनी आग पोट जो जाळी । तो राजनिष्ठ ठरतसे अहो ज्या वेळीं । त्या काळजाळिं उडि घाली टिळक नरसिंह । साधिलें देशकार्य दिव्य ॥ जो देशहितार्थे नुसतें काढी नांव । त्या मूर्ख असे ज्या कालिं ठरविलं जावं । त्या कालजालिं उडि घालि टिळक नरसिंह । साधिलें देशकार्य दिव्य ॥ सरकारी नोकरा राजासम समजावं । त्या विरुद्ध कांहीं ज्या कालीं न वदावं । त्या कालजालिं उडि घालि टिळक नरसिंह । साधिलें देशकार्य दिव्य ॥ जरा भुवई चढवितां घडे राजाचा द्रोह । ज्या कालिं राजद्रोहाचे कायदे नवनव । त्या कालजालिं०॥ निजदेशासाठीं कैदखान्याला भ्यावं । ज्या कालीं परकी जुलमी राज्य आवडावं । त्याकालजालिं० ॥ आगीनगाडी तार टपाल आगबोट धावं । हें बघुनं इंग्रजां म्हणनी कीं हे देव । त्याकाल० ॥ हिंदुस्थानच्या कल्याणा-पायिं घेनली धांव । साहेबांचं बोलणं खरं लोकां वाटावं । त्या

कालजालिं० ॥ तुम्हि योग्य झाल्यावर तुमचं राज्य तुम्हि घ्यावं। ज्याकालिं बोलणं हेंचि खरं वाटावं ॥ त्याकालजालिं० ॥ ( चाल ) देशांत अशी स्थिति बिकट। झाली चहुकडुन, अतीशय खट। होतीं टक्काहुन उभीं संकटं। देशकार्यांत देशभक्ताला ॥ परि टिळकसिंह घालि घाला ॥ या अशा कठिण काळांत। धाडसानें शिरुन, देशकार्यांत। जन्मभर राहुन विजयि जो झाला ॥ असा पुढारि टिळकचि झाला ॥ जगिं जिवंतपणीं ज्यावरी। जनतेच्या कडुन, जयजयकारीं। पुनळ्यामोहोरांचा वर्षावचि झाला ॥ असा पुढारि० ॥ शिवछत्रपतीचें धाडस। नानाचें चातुर्य, विद्वान सरस। सदाचरणाचा दिव्य जो पुतळा। असा पुढारि० ॥ वैरि जो नोकरशाहीचा। जिवाचा सखा लोकशाहीचा। लोकमान्यता खरी पावला ॥ असा पुढारि०॥ ( प.चा. ) अशा विभूतिचें हो चरित्र तें बहु थोर। कोणासहि ऐकुनि धन्यताच गमणार। मत्सरी व्यक्तिला नाहिंच ऐकवणार। भुताला रामनाम तें प्यारं ॥ २७ ॥ श्री० ॥

या अशा बिकट परिस्थितीमध्यें टिळकांनीं। साधिलें देशहितकार्य अतुळ धैर्यांनीं। तें कसें ऐकावें पुढें ध्यान देवोनी। अंगिचा आळस झाडोनी ॥ न्युस्कूल स्थापिलें अठराशें ऐशीला। हें सांगितलें मी मागेंच कीं अपुल्याला। विसरला नसालचि तुमच्या स्मरणशक्तीला। जाणतों खात्री आहे मजला ॥ न्युस्कुलचि हकीकत कोणिहि सांगे तर। सुप्रसिद्ध विष्णुशास्त्री चिपळुणकर। या महात्म्याचें तें थोर नांव येणार। पहिला जागृति करणार ॥ याच्याव

पासुनी थोडी फार टिळकांना । ती स्फूर्ति मिळाली देशकार्याची त्यांना । या शास्त्रिबुवानिंच जागें केलें सर्वांना । लोचनिं घालुनिया अंजना ॥ हे सहा वर्षांनीं टिळकाहून वडील । अठराशें चौऱ्याहत्तरीं मासिक तें सुरु केलं । तीं निबंधमाला नांव जगावरि झालं । नोकरशाहिला झोंबलं ॥ ( चाल. ) दणदणीत भाषा विचार-सरणी मोठी । वाचिता सोडि हलवून हृदय अशि घाटी । या निबंध-मालेवरी तरुणांची मिठी । इजमुळें शास्त्रिबोवांचि झालि प्रख्यानी । थापरी देशकार्य तें घनलें हातीं ॥ ( पहिली चाल ) परि परक्याचें तें शिक्षण सारुन दूर । राष्ट्रीय शाळा काढुनि राष्ट्र तयार । करणेंच बरें हें जाणुन चिपळुणकर । नोकरीवरी लाथ मार ॥ २८ ॥ श्री० ॥

सरकारि नोकरी सोडुन पुण्यास आले । काढणार शाळा लोक बोलुं लागले । हां हां ह्मणतां पुण्याभर जाहलें । जो तो हेचि बोल बोले ॥ जी चिपळुणकरांचि देशकार्याचि स्फूर्ति । ती टिळ-कांच्या मनिं आधिपासुनची होती । टिळक अगरकर देशभक्तिच्या ज्योती । होत्या स्वयंभून मूर्ति ॥ ते बिए. एल्. एल्. बी. झाले होते टिळक । वकिलीची परिक्षा पासहि झालि अर्णीक । आप्तेष्ट ह्मणूं लागले पुढें एकेक । सर्वहि ते प्रापंचीक ॥ टिळकांनिं वकीली करावि किंवा व्हावें । मुन्सफ पगारी या पदवीस चढावें । साधुनी नीटनेटका प्रपंच करावें । सार्थक हेंचीं साधावें ॥ ( चाल ) परी बातमी पुण्यांत पसरे टिळक आगरकर ॥ हे दोघे तसे तिसरे विष्णूशास्त्री चिपळुणकर ॥ नवी खासगी इंग्रजी शाळा काढणार लौकर ॥ गेलि

बातमी आप्तेष्टांच्या झडकरि कानावर ॥ स्नेहि मंडळी प्रमुख रावजी श्रीधर गोंधळेकर ॥ गोविंद काका आदि घराचि मंडळी करि कुरबुर ॥ ( चाल ) काय करावें या बाळाला । लागला कसा नादाला ॥ हा कसा जाउनी मिळला । त्या शास्त्र्यासारख्या दांडग्याला ॥ विक्षिप्त तरुण शास्त्र्याला । हा कसा जाउनी मिळला ॥( चाल ) तोंडानें निघे कां शाळा । किती हवा पैसा तरि याला ॥ जी शक्य गोष्ट त्या राजाला । ती काय साधे रंकाला ॥ स्वातंत्र्य कल्पना भरि भरला । अल्लडपणें करि चाळा ॥ हा पोर माणसांतुनि उठला । लावि आग घरादाराला ॥ बापानें लौकिक मिळवीला । हा पोर मिळवि मातीला ॥ आप्तेष्ट मिळुनिया टिळकाला । जाणविती या गोष्टीला ॥ ( प. चा. ) परि लोकमान्यांनीं सोसुनि हा भडिमार । ढळविला न अपुला संकल्पचि रेसभर । स्वार्थावरि मारी लाथ असा खंबीर । कोणता पुढारी दावार ॥ २९ ॥ श्री० ॥

ते टिळक आणि चिपळुणकर आगरकर । या तिघांनिं शाळा काढण्याचा विचार । केल्या वेळीं भागवत आणि करंदीकर । होते खास बरोबर ॥ विद्वान चौकशी लाभलि या कार्याला । आनंद शास्त्रिबोवास फारची झाला । म्हणे खास खास यश येईल हा आपल्याला । अपुल्या स्वदेशकार्याला ॥ ( चाल ) जानेवारी एक तारीख उघडली शाळा ॥ समारंभ रीतसर यथाविधि तो झाला ॥ डागली तोफ ही मोठी ठरल्या वेळेला ॥ ते दोनच गोलंदाज होते समयाला ॥ ( चाल ) एम् . ए. त तेव्हां नापास आगरकर झाले ॥

त्या परिक्षेपार्यी पुनः मार्गे राहिले ॥ ते करंदीकर आणि भागवत अजि गळले ॥ हे दोघे आयत्यावेळीं सोडुनी गेले ॥ कुणि फुंकर त्यांच्या उत्साहावरि घाले ॥ कीं बुद्धिच त्यांची मागाहुन ती पळे ॥ या दोघांवाचुन नाहिं कांहिं आडलें ॥ हे भागवत हायकोर्ट वकिल पुढें झाले ॥ न्यायाधिकारी इंदुरांत हे बनले ॥ पेन्शन खात हे खुशाल हल्लीं पडले ॥ ते करंदिकर हो डॉक्टर कीं पुढें झाले ॥ आगरकर मागुनी येऊनी मिळले ॥ ( प. भा. ) अशि टिळकांनीं ही तोफ डागिली घोर । निज कार्याचा उडवि गोळा बिनघोर । प्रतिपक्षि लोळविल रणांगणि हरहर । गाजवी सोडी झुंझार ॥ ३० ॥ श्री० ॥

या शाळेची भरभराटी मोठी झाली । ही धाड सरकारी हायस्कुलावरी पडली । चहुकडे शाळेची कीर्ति बहुत वाढली । सर्वतोमुखीं शाळा झाली ॥ ते शास्त्रिबुवा आणि टिळक यांच्या जोडिला । कांहीं होतकरू मंडळी होती समयाला । मुळे मांडे कृष्णराव हरी कृष्ण दामले । वासुदेव शास्त्री खरे आले ॥ ते नंदर्गी-करशास्त्री आणि माधवराव । सुप्रसिद्ध असती नामजोशि हे आडनांव । इतिहास असे हा सर्व तुम्हाला ठावं । सांगणें कशास तें व्हावं ॥ मोरोबादादा फडणिसांच्या वाड्यांत । न्यूस्कूल उघडिलें मोठ्या पुढिल चौकांत । शिक्षण ठेविलें पहिल्या इंग्रजी सात । आरंभीं या न्यूस्कूलांत ॥ या पहिल्या दिवशीं मुलें एकोणिस हजर । परि होता आकडा दीडशें पटावर । ही संख्या गेली पुढें तीनशेंवर । अठराशें ऐशीला खरं ॥ ( चाल ) ही संख्या एक्यायशी

सालीं । पाचशें एकवर आली ॥ अठराशें ब्यायशीसालीं । साहाशेंवर ही झाली ॥ अठराशें च्यायशी सालीं । एक हजारावरी गेली ॥ ( प. चा. ) त्या पहिल्या अमदानींत होते स्कालर । भास्कर विष्णु जोशी ट्रान्स्लेटर । ते शिवराम महादेव परांजपे प्रोफेसर । आर्ते पानसे महशूर ॥ ३१ ॥ श्री० ॥

टिळकांची शाळेंत शिकविण्याची हातोटी । उत्तमची होती अशी त्यांचि बहु ख्याती । आगरकरशास्त्री यांच्याहून पद्धती । वेगळी टिळकांची होती ॥ हासत खेळत शिकवित आगरकर । चिपळुणकरि शिक्षण अनंत विषयांवर । टिळकांची नेमिल्या विषयावरती भर । नाहींच कांहिं अवांतर ॥ ते टिळक कधींही विद्यार्थी वर्गाशीं । सलगीनें नव्हते वागत कधींही त्यांशी । गंभीर वृत्ति पाहुनी धाक सर्वांशीं । वाटे बघुनि तेजोराशी ॥ परि यांच्याविषयीं पूज्यबुद्धि सर्वांला । कारण कीं लाभला विद्वानचि गुरु असला । तो विद्यार्थी वर्ग हो धन्य कीं झाला । लाभे टिळक गुरू ज्याला ॥ तो गणित विषय शिकवितां फळ्याकडे धांव । घेतली नाहिं टिळकांनिं गणित सोडवावं । भराभर तोंडानेंच नीट समजुनी द्यावं । शंका समाधान व्हावं ॥ ( चाल. ) जोरानें चालली ती शाळा । बोलबाला चहुकडे झाला ॥ टिळकांनिं देह जणु वाहीला । या शिक्षणाच्या संस्थेला ॥ या कामिं गोष्ट एक आम्हाला । सांगितली बोलतों सकलां ॥ ( चाल ) कव्हां तरि गडि माणूस नसता शाळेला ॥ कांहिं दिवस म्हणे टिळकांनिं झाडिली शाळा ॥ बाक टेबल खुर्च्या मांडुनि वेळोवेळां ॥ रावले

गडद्यासारखे टिळक कांहिं वेळां ॥ ही गोष्ट बोलाया सोपी कठिण करण्याला ॥ हा देश हाचि कीं प्राण टिळकरायाला ॥ हा देश हाचि कीं ब्रह्म टिळकरायाला ॥ हा देश हाचि कीं स्वर्ग टिळकरायाला ॥ हा देश हाचि कीं देव टिळकरायाला ॥ ही धरुनि भावना सेवित जो शाळेला ॥ ( प. चा. ) असा दिव्य हिरा देशास लाभल्यावर । आनंदें नच कां येइ दाटुनी ऊर । होताचि आरत्रण टाळ्यांचा तो गजर । खास होणारची होणार ॥ ३२ ॥ श्री० ॥

स्कूल स्थापुनी वर्ष होण्याच्या आंत । अठराशें एक्यायशी पहिल्या जानेवारींत । वर्तमानपत्रें छापखाना काढण्यांत । गुंतले टिळकादि पुण्यांत ॥ या गोष्टी नव्हत्या राष्ट्राला अपरिचित । ज्ञानप्रकाश शिवाजी किरण छापखाने होत । वर्तमानपत्रेंहि याच नावानें निघत । होतीं पुण्या मुंबईंत ॥ ते विष्णुशास्त्री नामजोशी आगरकर । हे लेखक खंदे प्रसिद्ध भारी हुषार । त्यांच्याच मनीं ही आलि उसाळी फार । मागुन दिला टिळकांनीं जोर ॥ शाळेंत शिकवुनी वर्तमानपत्रांचा । सुरु करावयाचा कारखाना घडाक्याचा । या परी आर्यभुमींत लोकजगृतीचा । आणाखि एक मार्ग साचा ॥ साठ्यांचा किरण छापखाना घेतला । मोरोबा दादा यांच्या वाड्यामध्यें आणला । तो सर्व एका रात्रींत मांड मांडला । छापखान्याचा त्या वेळा ॥ त्या टाईपांच्या हो पेट्या खांद्यावरून । टिळकांनीं हौसेनें नेल्या होत्या वाहून । हें स्वतः टिळक बोलत कधीं मौजेनं । तेंचि मी गात असें गाणं ॥ ( चाल ) अशा रितीनें जन्मा आलें । भावंड

शाळेला झालें ॥ मार्तंड धाकटें असलें । परि अधिक प्रतापि निघालें ॥ नांव आर्यभूषणचि ठेवलें । आर्यांस ज्यानें भूषविलें ॥ सोहनिच्या नांवानें केलें । प्रारंभि प्रसिद्धचि झालें ॥ या छापखान्याला पहिलें । काम निबंधमालेचें आलें ॥ ( प. चा. ) तो मराठा केसरी गर्जुन पडे बाहेर । यात्र छापखान्यांतुन या देशभर । नव्हे हळू हळू गर्जना गेली बाहेर । गर्जिली सर्व जगावर ॥ ३३ ॥ श्री० ॥

अठराशें एक्यायशी जानेवारीची चार । केसरी निघाला पहिला दिवस मंगळवार । पेशव्यांच्या पुण्यामधि प्रमुखपत्र बाणेदार । हेंची जागृतीचें भांडार ॥ त्या पहिल्यावर्षी शास्त्रि टिळक आगरकर । यांचेच लेख सरमिसळ होते एकंदर । पण एक दोन वर्षांनीं हाहि प्रकार । जाहला कमी खरोखर ॥ सालाचा रुपाया केसरीची वर्गणी । आकार लहानचि होता आजच्याहूनी । अठराशें प्रतीचा खप आरंभीं जाण । हळू हळू वाढे प्रमाण ॥ अठराशें चौऱ्यायशी पंच्यायशी सालांत । त्या केसरीचा खप चारहजारावरत । आगरकर संपादक जोंपर्यंत । आकडा प्रसिद्ध हा होत ॥ अठराशें ब्यायशीला विष्णुशास्त्रि वारले । मग आगरकर संपादक तेहो झाले । टिळकांचे हातीं मराठा पत्रचि आलें । ऐसें कांहिं दिवस चालें ॥ (चाल) मराठ्याचा पहिला अंक जानेवारी दोनीला ॥ अठराशें एक्यायशी रवीवार दिवसाला ॥ दोन दिवस केसरिच्या आधीं मराठा झाला ॥ सुरवातिस वर्गणि आठ रुपये सालीना ॥ केसरीच्या इतका त्याचा खप होईना ॥ हा आंतबट्याचा व्यापारचि जाहला ॥ जाहिरातींच्या

जागा दराच्या जाहिरातीला ॥ ( प. चा. ) या रितिनें मराठा खर्चे भरुनि अंगावर । काढण्याचें कारण प्रश्न तुमचा बरोबर । या पुढेंच आहे या प्रश्नाचें उत्तर । ऐका श्रोते हो सत्वर ॥ ३४ ॥ श्री० ॥

राष्ट्रीय भावना आपुल्या देशिं लोकांला । कळविण्या केसरी मराठींत कीं झाला । त्या परी पर प्रांतीय अपुल्या लोकाला । आणखी परकि इंग्रजाला ॥ इंग्रजी लिहिण्याची हौस म्हणुन हा नव्हता । काढिला मराठा परंतु हेतु होता । सांगितला नुकता वरती जो मी आत्तां । साधन एक देशहीता ॥ देशाचिं गाऱ्हाणीं लिहिलीं मराठिंतून । त्या इंग्रज दरबारीं भाषांतर करुन । वाचणार ऐसा काळजिचा हो कोण । काढिला मराठा जाणून ॥ असा नाहिं दुभाष्या सरकाराने जवळ । जो देशाचें या मनोगत कळवील । हें सरकारासहि नको मनापासून । काढिला मराठा जाणुन ॥ सरकारि ओरिएंटल ट्रॅन्सलेटर । वाचणार किति भाषांतर तो करणार । तो देशि वर्तमानपत्राकडे पाहणार । नाहिं मुळिं सहानुभूतीर ॥ या ट्रन्स्लेटरचे रिपोर्ट हो एकांगी । संक्षिप्त तुटक भाषांतर जागोंजागीं । केलेलें खोडसाळपणाचेंच सर्वांगीं । अर्थी अनर्थ हा भरवी ॥ ( चाल. ) हीं नको भानगड म्हणुनी । ठेविला मराठा त्यांनीं ॥ इंदुप्रकाश ज्ञानप्रकाशांनीं । आणि सुबोधपत्रिका यांनीं ॥ थोडें बहुत मराठी लिहुनी ( थोडें बहुत इंग्रजी लिहुनी ) । हें काम केलें त्यांनीं ॥ ( प. चा. ) या पत्रांचा हा धेडगुजरि बाजार । या तरुणमंडळिस कैसा आवडणार । म्हणुनीच निव्वळ इंग्रजि नमुनेदार । मराठा निघे जोरदार ॥ ३५ ॥ श्री० ॥

केसरी मराठा दणक्यानें सुरू झालीं । देशांत चहुंकडे जनता बोलूं लागली । कीं न्युस्कुलचीं ही पंतोजी मंडळी । छडीबहादुराहून वेगळी ॥ याच्याही पूर्वी पुण्यांत ज्ञानप्रकाश । पाडीतच होता ज्ञानाचाच प्रकाश । परि काळोखानें भरलेलें आकाश । केसरीनेंच उजळिलें खास ॥ त्या छापखान्याला शोभा म्हणुनिच कांहीं । वर्तमानपत्रें असतिं जगावरि पाही । त्रेधाच अशांची सदां सर्व कालींही । बोलायाची सोय नाहीं ॥ अशा वर्तमानपत्राचें वर्णन कोण । करणार परी मी करितों थोडें मजेनं । हें विषयांतर होईल परी ओघानं । आलं बोलतों म्हणून ॥ ती लांबि रुंदि पुरि नाहिं मुंडया हाताची । रेलचेलहि नाहीं नुसति गटार बातम्यांची । जाहिरातिस जागा त्यांतचि कांरि असायची । गर्दी जुन्या टाइपाची ॥ साप्ताहिक परि तें निघें सहामाहीला । आंकड्यावरि आंकडे घालिति भर अंकाला । छापिलेला मजकूर बळी तो पडला । मोडक्या जुन्या टाइपाला ॥ ते संपादकही भारि जाडि विद्वान । अकटच विकटो झाली विद्या छान । कुच रोटी कुच लंगोटी करोनी जाण । भरती पोट धंदा करुन ॥ (चाल) परी भरतखंडाचें भूषण, गाजें नांव जगावरी । सर्वपरी हा जनोपकारी, असा मराठा केसरी ॥ स्वदेशाभिमानी आणखी समाजाभिमानी खरी । परंपरा संपादकांची, असा मरा० ॥ लोकशाहिचा कैवारी जो नोकरशाहीचा वैरी । जागृतिची करि सिंहगर्जना, असा मराठा० ॥ स्वदेश कार्याच्या समरांगणीं निशाण विजयाचें करी । नाचे नाचवि थयथय सकलां । असा म० ॥ स्वराज्य

(-३३) २०२८२ ३।०५ ९३७८० २०।

माझा जन्मसिद्ध हा हक्क असे हो खरोखरी । महामंत्र हा शिकवी जगता, असा मरा० ॥ ( प. चा. ) असा मराठा केसरी गर्जिलाच घनघोर । संस्थान दणक्यानें हालविलें कोल्हापूर । तो कथाभाग अद्भुत पुढें येणार । सावरुन बसा क्षणभर ॥ ३६ ॥ श्री० ॥

केसरी मराठ्यामध्यें पहिल्या सालांत । ते लेख कडाडले देशि संस्थानावरत । या ब्रिटिश सरकारालाहि वगळलं नव्हतं । त्यांनीं पहिल्या सालांत ॥ ज्या कालिं केसरी मराठा जन्मा आलीं । बहु प्रेमचि संस्थानाविषयीं त्या काळीं । पोलिटिकल एजंट रेसिडेंट याजबद्दली । लोकीं अविश्वास मूळीं ॥ यांच्याच तंत्रानें नेटिव्ह दिवाण सारे । ते कारभारि वागतात हो अविचारें । यासाठीं यांच्याबद्दल द्वेषी वारें । लोकांमध्यें सहज पसरें ॥ कसें झालें तरि हें परकि इंग्रज सरकार । मग देशी संस्थानाचा हित सुविचार । कोठुन तयांच्या ठायिं कसा असणार । सांगा तुह्मीं श्रवण करणार ॥ पण दिवाण आणि कारभारि हे आमुचे । अमच्याच रक्ताचे अमच्या हाडा-मासाचे । कां असूं नये मग संस्थानाबद्दलचें । यांना प्रेम आंतड्याचें॥ ओझीच्या ओझीं पगार संस्थानाचा । परि नोकर जणुं तो इंग्रज सर-काराचा । पुरवलाच तो एजंट परकि सरकारचा । अंमल नको दिवाणाचा ॥ एजंट किंवा तो रेसिडेंट राहि दुरी । परि दिवाणमूर्ति सबाह्य अभ्यंतरीं । यामुळें दिवाणावरी कडक लेखणी । चालविली केसरि मराठ्यांनीं ॥ ते सारेच दिवाण असेच कांहिं नसतात । जे संस्थानाचें हीत सदा पाहतात । ऐशाची जनता स्तुती सहजची गात ।



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

खासगी द्वेष नसे यांत ॥ ( चाल ) सपाट्याला बडोद्याचें राजकारण पुढें आलें ॥ महाराज मल्हारराव होते पदच्युत झाले ॥ ते राजा सर टी. माधवराव त्या वेळे ॥ बडोद्याचे होते दिवाण नावाजलेले ॥ त्या वरति ब्रिटिश सरकारची देखरेख चाले ॥ मुखत्यारी द्यावी असें हुजुरांत ठरलें ॥ ( चाल. ) कोणत्याही संस्थानिकाला । मुखत्यारि दान समयाला ॥ इंग्रज जपत स्वहिताला । मोबदला घालि आटीला॥ गरजेनें संस्थानिक अटिला । करि मान्य पहा त्या वेळां ॥ अक्कल गरजवंताला । नाहींच नियम जगताला ॥ अशा कामिं दिवाण ब्रिटिशाला । उपयोगि पडे परक्याला ॥ ( चाल. ) ही गोष्ट अनुभवा आली । बडोद्याचे मुखत्यारी वेळीं ॥ बडोद्याच्या प्रजेनें असली । ही अशी शंका घेतली ॥ त्या सर टी. माधवरावांनीं । अशि कांहिं कृती हो केली ॥ सुप्रसिद्ध दादाभाईनीं । या पायिं दिवाणगिरि सोडीली ॥ आणि सर टी. माधवरावांनीं । दिले हक्क बढती लाटीलीं ॥ ( प. चा. ) केसरी मराठा सारें आणी चवाठ्यावर । ताशेरा झाडी सर टी. माधवरावावर । ही टिका विकोपास गेलि नाहिं तोंवर । डोकावु लागे कोल्हापूर ॥ ३७ ॥ श्री०॥

या वेळीं कोल्हापुरची स्थिती भयंकर । ऐकतांच काटा येई अंगावर । हृदयांत भयाची धडकी भरे अनिवार । सांगतों ऐका हो सारं ॥ तेथील छत्रपति धनी शिवाजीराय । वेड त्यास लागे असा पसरे संशय । वेडाचें कारण दिवाण माधवराय । शंका लोकांना होय ॥ या महाराजांच्या बालपणीं दौलत । इंग्रजांच्या हातीं

ट्रस्टी ( पंच ) या नात्यांत । त्या वेळीं माधवराव बर्वे होत । दिवाण
कुलमुखत्यारींत ॥ या दिवाणांनिं निरुपयोगि भव्य उगीच । बांधुनि
इमारति केला अशा परी खर्च । त्यामुळं आलं संधान दिवाळं वाजा-
यचं । कोल्हापूर खजीन्याचं ॥ या अशा परी लोकांत गवगवा झाला॥
देशांत चहुकडे हाच विषय गाजला । त्यामधीं राजाच्या वेडाची
भर याला । पडली बोभाटा झाला ॥ त्या काळिं केसरी मराठ्याचें
धोरण । निश्चयी धाडसी असें खास पाहून । त्या कोल्हापुरच्या
लोकांना उत्तेजन । आलें पाठविति लिहुन ॥ त्या काळीं हाची विषय
सर्व पत्रांचा । त्यांतल्या त्यांत केसरी आणि मराठ्याचा । वाढलाच
नंबरहि वर्गणीदाराचा । केसरि आणि मराठ्याचा ॥ अठराशें
एक्यायशी अक्टोबर अकराला । केसरी निघाला दणदणीत समयाला ॥
त्या केसरींत मजकूर होता आला । देतों मी सारांशाला ॥ (चाल.)
कोल्हापूर छत्रपतिला । कठिण वेळा । नाहिं कुणि वाली कां ॥ भोगीत
हाल राजा । महाराजा । नाहिं कुणि वाली कां ॥ ही स्थिति ऐक-
तांना । फुटे करुणा । कठिणही पाषाणा ॥ हे आमचे लार्ड सरकार ।
जागे होणार । मेल्यावरि राजा कां ॥ महाराज छत्रपति हा । जिवा
मुकता । कलंकाचि हा बादशाहि राणीला ॥ ( प. चा. ) केसरी असा
हा कडकडला अनिवार । सणसणीत याहुनि पुढील ऐकाल तर । शिव-
छत्रपतीच्या गादिपायीं उदार । जिवावर होऊन गर्जिला र ॥३८॥श्री०॥

त्या वेळीं पत्रें मराष्ट्रांतिल सारीं । ओरडून होतीं या विषयावर भारी । ऐशांत सभा जाहीर भरलि खरोखरी । आनंदोद्भव थेटरीं ॥ त्या वेळिं सभेला हजारों जमला लोक । अध्यक्ष पेन्शनर गोपाळराव देशमुख । ते वक्ते नाना भिडे होते कीं प्रमुख । पुढारी वकिल करविरस्थ ॥ या वकिलांनीं हो बाणेदार भाषेंन । सांगितला कोल्हापूरचा सर्व वृत्तांत । ते महाराजांचे हाल ऐकुनी ढाळित । अश्रु सभेंत पुण्यांत ॥ त्या हकीकतीचें तात्पर्यचि ऐका हो । अहो जुना परी तो ऐतीहासिक टाहो । दैवाच्या घरचा खेळ विचित्र बघाहो । सारा कल्पनातींत तो ॥ श्रीमंत छत्रपति यांच्यावरती आळ । बव्यांनीं आणिला वेडयाचा हो झालं । दत्तक घराण्यांतील आइ सामीळ । होउनी रचिलं कौटाळ ॥ ( चाल. ) सभेमध्यें ते वकील नाना भिडे पुढें बोलले ॥ नाना परिचे महाराजांचे हाल अती मांडले ॥ राजाची आणि कुटुंबाचि हो ताटातुट करविले ॥ आपुलें माणुस मायेचें असें नाहिं जवळिं ठेविलें ॥ गोरा डाक्टर रखवालदारहि गोरा दिमतिला दिले ॥ वेळ प्रसंगीं फटके मारिति महाराजाला बळें ॥ ( चाल. ) किति सांगु दुःखानें नाना भिडे बोलले ॥ शरिराच्या हव्या त्या भागावर पलिस्तरें ॥ डाक्टरच्या मर्जिला येइल खाना ठरे ॥ डाक्टरची मर्जि भेटण्यास बंदि रे ॥ त्या सभेमध्यें आणखी भिडे बोलले ॥ हा डाक्टर आणि रखवालदार हो बळें ॥ करतील खुन राजाचा एखाद वेळें ॥ ( प. चा. ) हे हाल ऐकून कोणाचे अंगावर । थराखून काटा सांगा नाहिं येणार । चित्तांत कुणाच्या खळबळ ना उडणार । सांगा तुम्हीं श्रवण करणार ॥ ३९ ॥ श्री० ॥

या प्रकरणीं केसरि मराठा गर्जत होता । इतक्यांत पत्रव्यवहार आला होता । तो वाचुन खातरि करून घेउनी पुरता । गर्जे केसरी मराठा ॥ तो हाच पत्रव्यवहाराचें कारण झाला । केसरी मराठ्यावरच्या त्या खटल्याला । हा गुप्त पत्रव्यवहार कसा टिळकाला । लाभे मौज ऐकण्याला ॥ या खटल्यामध्यें शेगुणशीकर यांची । जी साक्ष झालि ती फारची महत्वाची । ती कथा पत्रव्यवहाराची यांतची । ऐकावया मिळायाची ॥ त्या बर्व्यांचा अत्यंत विश्वासाचा । ब्राह्मण ऐनापूरकर नांवाचा । खासगी कचेरींत कारकून पेशाचा । होता रामभाऊ नांवाचा ॥ कुणि ह्मणती बर्व्यांचा हा होता हेर । यासच वेड्या राजाच्या तैनातीवर । नेमीत अचुक बर्वे हे डोळ्यावर । आले संशयाला थार ॥ या कारकुनाचा शेगुणशीकर मित्र । आणीक होतें नात्याचेंही सूत्र । हा कोल्हापुर सडुन राहि अन्यत्र । कधीं काधिं येई कोल्हापुरांत ॥ ( चाल ) एक दिवशिं यापरी तो आला । ऐनापूरकराचे घरला ॥ ऐना-पुरकर हो त्या वेळां । घरिं नव्हता बाहेर गेला ॥ मग ऐनापुराचे बहिणीला । शेगुणशीकर बोलीला ॥ अहो एक पत्र मज लिहिण्याला । द्या कागद शाई लेखणिला ॥ भावाचें दप्तर त्या वेळां । बहिणिनें दिलें हो त्याला ॥ ( चाल ) शेगुणशीकर तो घेई । दप्तर उघडुनि पाही ॥ कागद घेउन लवलाही । स्वतःचें पत्र तो लीही ॥ तें पत्र पुरतें लिहिलें । दप्तर सहज चाळीलें ॥ तों त्यांत त्याला दिसलें । कागदाचेंहि गुंडाळें ॥ गुंडाळें झट सोडीलें । पाहि तों विचित्रचि सगळें ॥

ऐनापुरकरास लिहिलें । बर्व्यांनीं सही केलेलें ॥ महाराजाविषयीं सगळे । मजकूर पत्रीं भरले ॥ ( प. चा. ) या परी अचानक गवमें पत्रव्यवहार । घालुनी खिशामधिं झटपट पडे बाहेर । हातांत लोकमान्यांच्या पत्रव्यवहार । हाचि पडे एकंदर ॥ ४० ॥ श्री० ॥

हा मुद्देमाल प्रकरणाचा घावल्यावर । सरसावले थोर टिळक आगरकर । दणक्यानें काढिला मराठा केसरि तर । उतरला बर्व्याचा नूर ॥ हा सर्व पत्रव्यवहार केसरिंत आला । देशांत चहुंकडे तर कल्लोळ उडाला । बर्व्यास हा मिरच्यांचा धूर झोंबला । लागला धक्का अब्रूला ॥ ही संधि साधुनी इंग्रजांच्या पत्रांनीं । भलभलता मजकुर लिहिला द्वेषबुद्धीनीं । महाराज खरोखर वेडेची होतेनी । गेले असें लिहिलें त्यांनीं ॥ त्या इंग्रजि पत्रानेंच आणखी लिहिलें । ते लोक पुण्याचे सर्व आंतुनी काळे । आणि दिवाण माधवराव बर्वे पुतळे । सत्याचे निस्वार्थि भले ॥ यावरी केसरी देई खासा टोला । निःस्पृहीपणाचा पोकळ डौल अम्हांला । इंग्रजी पत्राचा ठावे आहे सगळा । त्यांनीं नको रडायाला ॥ ते कोल्हापुरचे दिवाण माधवराव । आमुचेच नेटिव थोर पदाला पात्र । आमुच्याच लोकां आम्हीच कां दोषावें । काय दोषुनि मिळवावें ॥ परि माधवरावाचीं पापें झालिं अघोर । त्यांचा या मुखानें करवत ना उच्चार । देहांत प्रायश्चित्ताजोगीं घोर । पापें केलिं त्यांनिं फार ॥ ( चाल ) लेखावरती लेख कडाडले । वाचून बर्वे संतापले ॥ कोल्हापूर सोडुनी गेले । झट पुण्यास बर्वे आले ॥ फिर्यादिच्या तयारिस लागले । सरकारच्या

मंजुरिस मिळवीलें ॥ झाडुन सारे फिर्यादिंत गोंवले । नाहिं एकालाहि वगळलें ॥ ( प. चा. ) जानेवारि चोत्रिसला केसरि पडे बाहेर । फिर्यादिस अनुलक्षून केलं जाहीर । आमुचा लेख आम्हिं सत्य करून दाखविणार । जनता अम्हां साह्य करणार ॥ ४१ ॥श्री०॥

फिर्याद ठोकली बर्व्यांनीं अखेरीला । अठराशें ब्यायशी आठ फेब्रुवारीला । साहेब वेब यापुढें खटला मुंबइला । चालू झाला चौकशीला ॥ इनव्हेन्यारिटी फिर्यादीचे बॅरिस्टर ॥ आरोपी तर्फे फेरोजशा मेथा हुषार । त्या काळीं बॅरिस्टरींत ते वाकबगार । नाणावलं नाणं कलदार ॥ ते भिडे रानडे बखले टिळक आगरकर । हे पांच आरोपी होते कीं एकंदर । त्या केसरिकरितां टिळक आगरकर । टिळकची मराठ्यासाठीं र ॥ एकटे रानडे ज्ञानप्रकाशाकरितां ॥ भिडे बखले दोघे स्वतंत्र अपणाकरितां । जामीन दोन हजाराचे एकेकापुरतां । दोन हजाराचाच मुचलका ॥ ती लोकप्रियता याच वेळीं टिळकांची । सर्वांसी दिसली एका गोष्टिनें साची । या खटल्यामध्यें त्यांचे जमानतीची । गोष्ट निघाली लेव्हांची ॥ होताच हुकुम कोर्टांत पांच हजाराची । एकानं गुदरली थैली जमानतीची । अहो नसतां नुसती तोंडओळख टिळकांची । साक्ष लोकप्रियतेची ॥ हे भवानि पेठेंतील उरवणे नांवचे । व्यापारी मोठे अडते होते गुळाचे । धन्य हा पुरुष सार्थक व्यापाराचें । केलें राहणें पुण्याचें ॥ ( चाल. ) अशि संधि साधिली उरवण्यांनीं हो बरी ॥ गावेंच नांव हो त्यांचें अशी कामगीरी ॥ येडंग्या कथेच्या अनुसंधानावरी ॥ केसरी मराठा ज्ञान-

प्रकाशापरी ॥ कित्येक इतर पत्रांनीं आपुल्या पत्रीं ॥ बर्व्यांचिया विरुद्ध लेख लिहिले भारी ॥ ते नेटिव्ह ओपिनियनचि मुंबइचें ॥ ठाण्याचें अरुणोदयपत्राचि फडक्याचें ॥ महाराष्ट्रमित्र साताऱ्च्या कोल्हटकरचें ॥ आणखी पुणें वैभव केळकर यांचें ॥ (प. चा.) अपखुषिनें माफि मागुन गांठलें घर । परि बाकि राहिले पांच आरोपी वीर । शाबास बहाद्दर खरे धैर्यसागर । देशाला भूषण हेचि खर ॥ ॥ ४२ ॥ श्री० ॥

भिडे बखले रानडे निकाल यांचा झाला । तारीख सहाला जुलै संध्याकाळाला । या तिघांवरति आरोप शाबित केला । केसदि मराठाच उरला ॥ त्या रात्रिं मुंबइस टिळक अगरकर । यांच्याच बिऱ्हाडीं सल्लामसलती बहर । मित्रांचे कौंसील भरून वाद चार प्रहर । ठरला पुढील विचार ॥ कांहिं मित्रमंडळी सुचवु लागली त्यांची । मोकळेंच व्हा मागुनी माफि बर्व्यांची । घेतील बर्वे खटला काढुन याची ! खात्री आहे विश्वासाची ॥ कुणि म्हणु लागले नकोच माफी आतां । एविं तेविं खटला आला हो या पंथा । आणि बर्वे तरी माघार घेतिल याचा । द्यावा भरंवसा कैचा ॥ खंबीर टिळक आणि आगरकरहि मनाचे । दोघेही काढित नव्हते नांव माफीचें । पुष्कळचि झाली भवति न भवति याचे । बहुल किती सांगण्याचे ॥ अत्यंत आग्रह दुराग्रह मित्रांचा । त्यापुढें न चाले उपायही दोघांचा । पाठविला खलिता बर्व्यांकडे माफीचा । केवळ आग्रह मित्रांचा ॥ मागताचि माफि इतर पत्रकर्त्यांनीं । फिर्याद घेतली काढुन हो बर्व्यांनीं ।

परि टिळक अगरकर यांच्या माफिस त्यांनीं । नाहीं आणियलें ध्यानीं ॥ तें कारण याचें काय ठावें देवाला । अहो किंवा दिवाण बर्वे यांच्या आत्म्याला । तो निर्णय याचा मनांत ठरवायाला । आहे मोकळीक सकला ॥ ( चाल ) टिळक अगरकर यांच्यावरचा खटला सुरू जाहला ॥ मुख्य मुद्दा या खटल्याचा हो पत्रावरि बैसला ॥ ज्या पत्राच्या आधारानें लख असे लिहीला ॥ तीं पत्रें तर कोर्टानें हो बनावट ठरविलीं ॥ वजनदार लोकांना हो जीं पत्रें खरीं वाटलीं ॥ तीं पत्रें तर कोर्टानें हो बनावट ठरविलीं ॥ सबजज्ज फाटक यांना हो जीं पत्रें खरीं वाटलीं ॥ तीं पत्रें तर कोर्टानें० ॥ न्यायमूर्ति रानडयांसही जीं पत्रें खरीं वाटलीं ॥ तीं पत्रें तर० ॥ सदर आमिन करविरचे काळ यांसहि खरीं वाटलीं ॥ तीं पत्रें तर० ॥ टेरि नांवाचा ड्राइंग मास्तर याची साक्ष काढली ॥ अक्षरशास्त्री टेरी होता त्यानं पत्रें तपासलीं ॥ टेरीलाही पत्रें सारीं खास खरीं वाटलीं ॥ तीं पत्रें तर० ॥ ( चाल ) रानडे न्यायमूर्तीला । केलि होति विनंति सकला ॥ तुम्हि यावें हो कोर्टाला । मजकुर खरा सांगायला ॥ रानडयांनीं या गोष्टीला । दिला नकार या समयाला ॥ जरि आमची साक्ष काढाल । तरि गोष्ट न बरि होईल ॥ जुलमानं कचेरिस येऊं । कानावरि हात ठेवूं ॥ त्या काळचा पुढारि असला । हें असें स्पष्ट बोलला ॥ ( प. चा. ) खटल्याचा फार्स हा असा झाला एकंदर । ठोठावली शिक्षा साधी महिने चार । धैर्यानें देशकार्याच्या रणांगणिं वीर । शिरले टिळक आगरकर ॥ ४३ ॥ श्री० ॥

आजकाल कोणी सरकारच्या तुरुंगांत । जावया सिद्ध तो ठरे हिंदभूभक्त । परि लोकजागृति इतकि नव्हति देशांत । ऐशा कठीण काळांत ॥ निज देशापायीं तुरुंगांत हो जाणें । हें म्हणजे अन्नचा नाश करुनिया घेणें । असें मोठमोठ्यांही सुशिक्षितांचें म्हणणें । होतें खरें तेंचि वदणें ॥ चार चटोरपोरें ठोरें जमती काय । अवखळपणानें शाळा काढि ती काय । वर्तमानपत्रीं लेख लिहीती काय । सारा पोरखेळ होय ॥ या अशा लिहिण्यानें अशीच हो ठोकर । सरकार येता जातां यांना देणार । हे अशानें म्हणे देशहीत करणार । बापुडे फुकट मरणार ॥ या अशा प्रकारें लोकांचा उपहास । सोसुनी टिळक आगरकर बंदीवास । भोगण्या पुढें सरसावित धन्य खास । त्यांच्या आईची कुस ॥ अस्तु शिक्षा ठोठावल्यावर माडीवरुन । आणिलें त्यांस तळमजल्यावरि रोखुन । काठडींत एका ठेवुन दोन तासानं । काढिले बाहिर झटक्यानं ॥ घोडयाच्या गाडया लगबगीनें आणून । भोंवतीं शिपाई यांचा पहारा देऊन । दोघांस खास शिस्तीनं आंत बसवून । हाणल्या गाडया तेथून ॥ ( चाल ) भरधांव गाडि ती चाले । मनिं विचार त्यांच्या आले ॥ चांगल्या हेतुनें केलें । परि काय अखेरी झालें ॥ न्यूस्कुलावरि या वेळें । संकट कसें हें आलें ॥ तें देशकार्य तें सगळें । ढासळेल कां यामुळें ॥ ( चाल ) असे कांहिं विचार । मनिं आले थोडे फार । त्या गाडया तंवर । पोचल्या डोंगरी किल्ल्याला ॥ कि० ॥ तिथं गेल्यावर । झट आला जेलर । त्यानं अगोदर । पोषाख त्यांचा काढीला । का० ॥ तपासिले रितसर । ठेउनिया

नजर । नाहिं केली कसूर । कैद्याचा वेष मग दीला ॥ दी० ॥ (चाल) ती जाडि भरडि भाकर । भा० ॥ नो कांदा लसुण तीवर । ती० ॥ जणु चोर दरोडेखोर । चोर० ॥ यापरी देशभक्तार । भ० ॥ वागवीत हें सरकार । सर० ॥ ( प. चा. ) परि देशासाठीं बंदिवास हा घोर । ते देशभक्त ठरविती स्वर्गमंदिर । पोवाडे गाती अशांचेच शाहीर । डंका झडे जगजाहीर ॥ ४४ ॥ श्री० ॥

डोंगरीं किल्ल्यामधिं शिक्षा भोगित असतां । वनवास हालाचे भोगित देशाकरितां । ते दिवसामागें दिवस निघोनी जातां । सरली मुदत अवचीता ॥ एकशेवीस दिवसांची शिक्षा होती । अहो एकोणीस दिसांची सूट मिळे ती । चांगली वर्तणुक म्हणुन शिफारस करिती । जणु हे दरोडेखोरच कीं ॥ एकशें एक दिवसांची शिक्षा भोगोनी । सरकारच्या तुरुंगामधुन हे परतोनीं । ज्या वेळीं आले वजन सोळा पौंडांनीं । अगरकराचें भरलें कमी ॥ चोवीस पौंड कमि वजन टिळकांचें भरलें । या थोड्या काळामधिं काय पहा झालें । यावरुन हाल किति असतिल हो भोगले । त्यांनीं खडतर हो सगळे ॥ डोंगरी किल्ल्यांतिल तुरुंगाचें वर्णन । आगरकरांनीं निबंध रचिलं छान । सुप्रसिद्ध पुस्तक ठावें सकला जाण । एकदा बघावें वाचुन ॥ अहु डोंगरीमधून आक्टोबर सव्विसला । सरकार सोडि देशभक्त जोडीला । दर्शनापायिं हो लोक हजारों जमला । सकाळिं डोंगरि किल्ल्याला ॥ ते दीनबंधुचे संपादक लोखंडे । दामोदर सावळाराम होते यंदे । इत्यादि ब्राह्मणेतर पुढारी खंदे । होते ब्राह्मणांच्या पुढें ॥

( चाल ) पाहूनाचि हो दोघाला । जयकार मोठा झाला ॥ पाहूनी बाळ गोपाळा । झणिं ऊर भरुनि हो आला ॥ या देशभक्त जोडीला । भेटती किती त्या वेळां ॥ आणुनी अश्रु नयनाला । म्हाणिती देशभक्ताला ॥ ( चाल ) डेक्कन कालेजांतील । मंडळी जमलि भराभर ॥ खडकी-च्या स्टेशनावर । दोघांचा सत्कार ॥ पुढें पुणें स्टेशनावर । लोकांचि गर्दि अनावर ॥ झाला मोठा जयजयकार । दुमदुमलें वर अंबर ॥ झाला हो वाद्यांचा गजर । लोटला लोकसागर ॥ घोड्याची गाडि सुंदर । बसविलें आंत नरवर ॥ अशि मिरवणूक पुण्याभर । हीच कीं पहिलि म्हणु तर ॥ सार्वजनिक सभे मार्फत । पान सुपारि दिलि जाहीर ॥ ( प ० चा ० ) नोकरशाहीचे बंदिवान हे घोर तेचि । कीं लोक-शाहीचे असे दिलदार । ऐसेची राहिले लोकमान्य जन्मभर । किर्तिस चढे पुढें भर ॥ ४५ ॥ श्री० ॥

कुरवीर प्रकरणामुळें टिळक आगरकर । पावले प्रसिद्धी चहूकडे हो फार । ती सहानुभूती सामान्यांची तर । मिळाली त्यास खरोखर ॥ ओळखीहि झाल्या तऱ्हा थोरामोठ्यांच्या । संभव आश्रयांचा हो राजलोकांच्या । इत्यादि गोष्टिनें उत्साह हो त्यांचा । आला भरतीला साचा ॥ न्यूस्कूल वाढलें लोकांच्या मनिं भरलें । कॉलेज काढावें असे बेत हो ठरले । डेक्कन एज्युकेशन सोसायटी पहिलें । काम त्यांनीं हातिं घतलें ॥ अठराशें चौऱ्यायशीं मध्यें खास नोंदीली । सोसायटी मग अठराशें पंचायशीं सालीं । तें फर्ग्युसन कॉलेज जानेवारि पहिली । झालें स्थापन त्या वेळीं ॥ सुप्रसिद्ध प्रोफे-

सर गोखले आले । याच सालिं कॉलेजास येऊन मिळले । आणी-कहि विद्वान भले नवे बहु आले । झालें नवेंजुनें सगळें ॥ कॉलेज चालले दणक्यानें हें जेव्हां । त्या सरकाराची दृष्टी गेली तेव्हां । ह्मणे चालविलें हें बेस्ट वाहवा वाहवा । होना शाबासकि र कावा ॥ मुत्सद्देगिरीनें हळुंच बोलणें लावी । कॉलेज डेक्कन संस्था तुह्मि जोडावी । सोसायटीला ग्रँट अह्मि तुह्मां द्यावी । घेऊन कीर्ति वाढ-वावी ॥ ( चाल. ) यावरी जोरानें तिथें विचार सुरु झाला ॥ कुणि ह्मणे ग्रँट द्या भोगा श्रीमंतीला ॥ कुणि ह्मणे नको ही परवशता आम्हाला ॥ ग्रँटच्या मागुनी साहेब शाळेंत शिरला ॥ घेईल खास साहेब लठ्ठ पगाराला ॥ अह्मि काम करोनी मरूं यश गोऱ्याला ॥ सरकारच्या वशिल्याचें तट्टु धरिल रिंगणाला ॥ म्हणुनिया ग्रँट ही नकोच सोसायटीला ॥ ( प. चा. ) या नको म्हणणाऱ्यापैकिं टिळक अग्रेसर । तात्पर्य कलहाचें पिल्लु शिरलें हें भेसूर ॥ यांतचि सामा-जिक सुधारणेचें मतांतर । भरिला भरले आगरकर ॥ ४६ ॥ श्री० ॥

ही धुसफुस गेली विकोपासि हो भारि । एकीच बेकि झाली हो अनिवारी । धुडगुस माजला कोणी न कुणा विचारि ॥ ऐशी आलि वेळ सारी ॥ सरकारि ग्रँटने सोसायटी श्रीमान । बहुतांची दृष्टी स्वार्थी वळली जाण । जें मूलतत्व स्वार्थत्यागाचें पूर्ण । झालें त्याचें विस्मरण ॥ या बेकीनें हो आगरकर फोडील । तें सुधारक नांवाचें पत्र काढीलें । जोडीला होते प्रोफेसर गोखले । रानडे गुरूचे हे चेले ॥ या शाळेसाठीं लोकांचा उपहास । सोशिला किती हें

नवीन येणाऱ्यास । कळणार कसे गोखले इत्यादिकांस । भोक्ते सुखाचे हे खास ॥ या नवीन येणाऱ्यांनि जुन्याला धरलें । स्वार्थाच्या मंत्रानें हो भारुनि सोडलें । निःस्वार्थी आगरकर त्याहि पछाडिलें । स्वार्थानेंच तयामुळें ॥ पोटाच्या पुरता पगार घ्यावा ठरलें । सुखा-तिस घ्यावे पाऊणशें मग आले । शंभरावरि स्वार्थाच्या मार्गी भकले ॥ यांना ह्मणुं काय नकळे ॥ गरजेच्या मानानं पगार तत्व हें पहिलें । सुटुनिया संस्थेच्या श्रीमंतीवर आलें । श्री होळकरांनीं सातशें रुपये दिले । त्यानें असेंच हो झालें ॥ ( चाल ) होळकरांनीं दिले सातशें रुपये सोसायटिला ॥ अशी देणगी सोसायटीची सोसायटी माल-किला ॥ परि मिळाले रुपये चारशें त्यांतिल आगरकराला ॥ खासगि धंदा कुणि न करावा असा रूल ठरविला ॥ बहुतेकांनीं परि स्वार्थाचा धंदा आरंभिला ॥ ( प. चा. ) निःस्वार्थि टिळकांना स्वार्थ कसा हा खपणार । मग सोयटीला कां न रामराम ठोकणार । राजहंस कधिं पाण्याचें दुध पिणार । ऐसें कुठें कसें होणार ॥ ४७ ॥ श्री० ॥

या सोसायटीला रामराम ठोकायला । कारणें अनेकचि घडलीं त्या वेळेला । हा राजीनामा स्वतः टिळकांनीं लिहिला । आहे दप्तरिं तो वहिला ॥ हा राजीनामा चाळिस कीं पानांचा । साद्यंत आहे तो बावीस कलमांचा । वाचतां उरे ना शंका होइ मनाचा । निर्णय राजीनाम्याचा ॥ हा राजीनामा स्वतः टिळकांनीं लिहिला । जनतेच्या पुढती नव्हता आजवर आला । तो जशाचा तसा टिळकचरित्रीं लिहिला । अपुल्या तात्यांनीं सगळा ॥ त्यांतील कांहिं

मजकूर नुकता वर्णीला । त्यावरून कळलें असेल कीं सक-
लाला । टिळकांनीं राजीनामा कां हो दिला । सोडिलें कां सोसा-
यटीला ॥ तत्वाचा वादचि फुटला कारण झाला । सोसायटी-
मध्यें व्यक्तिद्वेष माजला । देवानें आणली अशीच कीं हो वेळा ।
त्याला नाइलाज झाला ॥ अहो खऱ्याचें खोटें खोट्याचें खरें करून ।
वकिलींत पैसा कमविण्याचें सोडून । जी शिक्षण संस्था चालविली
नेटानं । कार्य देशाचें ह्मणून ॥ ती शिक्षणसंस्था अवघ्या आठ
वर्षांत । टिळकांना सोडुन देणें भाग पडत । त्यावेळीं झालें दुःख
मनाला बहुत । ऐसे टिळक स्वतः वदत ॥ ( चाल ) अठराशें
एक्याण्णवसालिं सोसायटी सोडली ॥ केसरी मराठा टिळकांचा त्या
कालीं ॥ सातहजाराच्या कर्जाच्या मालकी आली ॥ पत्रांची मालकी
कर्जासहित घ्या सगळी ॥ ऐकतां आगरकर स्वारि मनामधिं खचली ॥
मालकी नको कर्जाच्या छत्राखालीं ॥ आणखी बोलले आगरकर त्या
वेळीं ॥ तें ध्यान देऊनी ऐका सर्व मंडळी ॥ केसरी मराठा छापखाना
हीं सगळीं ॥ बंदच करा कर्जाची कटकट असली ॥ टिळकांना
भाषा नाहिं मुळीं ही रुचली ॥ हिंमतिनें कर्जाला टिळकांनीं ड्डइ दिली ॥
वर्तमानपत्रें छापखाना घेतलीं ॥ ( प. चा. ) ती मास्तरकीची छडी
सोडल्यावर । हातांत घेइ राजकारण समशेर । पट्टयाचे हात खेळलाच
पट्टा वीर । नोकरशाहिचा गळे धीर ॥ ४८ ॥ श्री० ॥

येथून पुढें तें राजकारण युद्ध । टिळकांचें जडलें नोकरशाहि विरुद्ध । जन्मभर झडल्या चकमाकि हो अनिरुद्ध । त्यांतिल पहिलीच प्रसिद्ध ॥ क्राफर्ड प्रकरण गाजलेंच या वेळां । टिळकांचा कर्तेपणा प्रत्यया आला । यामुळेंच सगळ्या लोकांना तो पटला । एका विलक्षण खटला ॥ क्राफर्ड साहेबाच्या दुष्ट लाचलुचपतिचे । ते प्रकार जाहिरपणें सिद्ध करण्याचे । नाकानें वांगी सोलणाऱ्या गोऱ्यांचे । वेशीवरी मांडायाचे ॥ नेटिवाहून ती नीतिमत्ता गोऱ्यांची । किति काळीकुट्ट असते दाखविण्याची । ती कामगिरी टिळकांनीं केली साची । सार्वजनीक किंमतीची ॥ यापूर्वि थोडकि क्राफर्ड साहेबाची । माहिती देत मी ऐकुन ती घ्यायाची । मनरंजन होउन त्यांत इतिहासाची । भरती पडेल हो साची ॥ क्राफर्डसाहेब हे अस्सल इंग्रज होते । कमिशनर कालिं त्या मुंबईला विख्यात । बुद्धिमान सद्गुण दुर्गुणहि असंख्यात । होते त्यांच्या अंगांत ॥ त्या आकाशांतिल बापानें हिंदुस्थान । गोऱ्यांना दिधलें कुरण चरायाला छान । चरतात मेंढरें होउनिया बेभान । त्यांतिल क्राफर्ड एक जाण ॥ हे आळशि मोठे झोपाळु कुंभकर्ण । महिनेच्या महिने ख्यालिखुशालिंत राहणं । सरकारी कामें तुंबताचि कीं यांनीं । गंमत करावि लहरींनीं ॥ रात्रीला अवशीं बाजुस टेबलावर । कामांच्या कागदांचा हो रचावा डोंगर । दारूच्या बाटल्या ठेवि दुसऱ्या बाजूवर । ठेवी तिथंच सीगार ॥ ती पहाट होतां सर्व कामें संपवुनी । बाटल्या आणि त्या सिगार फस्त करोनी । सूर्योदय होतां शिरूनिया पांघरुणीं । ताणी मध्यरात्र

म्हणुनी ॥ खर्चीक होता स्वभाव त्यांचा फार । बहुतेक युरोपीयन यांच्या बंगल्यावर । स्त्री पुरुष अवघे मजा मारिती फार । परस्पर हिंदुस्थानावर ॥ बंगल्यांत आलेल्या युरोपियन लेडयांना । या साहेबांनीं द्याव्या देणग्या त्यांना । लायकीप्रमाणें मोत्याचा हार कुणा । द्यावें जवाहीर कोणा ॥ ( चाल ) साहेबांनीं अशी नबाबी चैन भोगिली खरी ॥ या चैनीला पैसा पुरेना साहेबास भरपुरी ॥ डोळस पगार किंवा आंधळा भत्ताही आपुरी ॥ पाचविला तीं त्याच्या पुजली लाचलुचपत खरी ॥ लाचापैकीं कांहिं देणगी कांहिं कर्ज यापरी ॥ लाच खाउनी हविं तीं कामें साहेबमजकुर करी ॥ सोडवणुकि वतनाच्या देणग्या जमीनिच्या त्या परी ॥ जणू नोकऱ्या चाकऱ्यांचें तें दुकान हो खरोखरी ॥ ( प. चा. ) अति खेळिमेळिनें नेटिवांशिं वागणार । असा युरोपियन अधिकारि नाहिं घावणार । आणि लाचखाऊ साहेब असा बहाद्दर । हाची आला जनाश्मोर ॥ ४९ ॥ श्री० ॥

हें पाप लाचाचें दडोनी न राहिलें । येतांच वेळ पापास तोंड फुटलें । पापाचें माप पूर्ण शिगावरि भरलें । आलें उघडकीस सगळें ॥ या साहेबाचे मित्र झाले लोकांत । परि वैरी हे सरकार दरबारांत । शत्रु व माजलें त्यांचें खुद्द इंग्रजांत । कांहीं कांहीं कारणांत॥ कुणि म्हणे करी हा तोटा सरकाराचा । हा ऱ्हास करी गोऱ्यांच्या नीतिमत्तेचा । फाजील सलगिनें नेटिवांशिं वागल्याचा । घुस्सा कितीं साहेबांचा ॥ कुणि साहेब म्हणे माझ्या लेडिला यानं । कां मूल्यवान देणगी द्यावि लोकांनं । असे सर्वहि इंग्रज कांहिं कांहिं कारणानं ।

उखडले त्याजवरीं पूर्ण ॥ ( चाल ) या सर्व पापकर्माला तोंड हो फुटलें ॥ त्या वेळीं र नांवाचे गव्हरनर झाले ॥ हे होते बरेच सुस्वभावि चांगले ॥ क्राफर्डचें वागणें त्यांच्या कानावरि गेलें ॥ ऐकोनी त्यांना बरें नाहिं वाटलें ॥ ते क्राफर्डावरि फारच संतापले ॥ (प. चा. ) इंग्रजासि लांच्छन आणणाऱ्या क्राफर्डवर । खवळले लॉर्ड रे मुंबईचे सरकार । हात धुऊन लागले पाठिस बेदरकार । भरला खटला तयावर ॥ ५० ॥ श्री० ॥

क्राफर्डावरि त्या खटला करण्याचें ठरलें । मामलेदारांपासून लाच घतले । जबरीनें एसे पुरावे गोळा झाले । जारिनें काम सुरू केलें ॥ देवोनि लाच जे झाले मामलेदार । संक्रांत आली मोठी त्यांच्यावर । खासगी रितीनें विचारीत सरकार । बोला म्हणे खरं सारं ॥ जर लाच दिल्याचा गुन्हा कबूल कराल । वरि गुन्हा माफ सरकार तुम्हांला करिल । असं अभयवचन मामलेदारांना दिलं । ध्यानिं घ्या श्रोते हें सगळं ॥ हा मुद्दा होता महत्वाचा माफीचा । या प्रकरणांत टिळकांच्या कामगिरीचा । संबंध असे हो सार्वजनिक कार्याचा । ऐका खटला गमतीचा ॥ कुणि म्हणे बरा घावला गोरा सिव्हिलियन । लाचाच्या खटल्यामध्यें आयता छान । मरतोच गोरा मारावा सैतान । कबुली जबाब देऊन ॥ हे गोरे सारे सदां काळ्या लोकांना । लाचखाउ म्हणती निंदिती हिणविति आम्हां । या निंदकांच्या तोंडावरती टाकायला । होइल क्राफर्डचि भला ॥ कुणि म्हणे अगोदर लाच कधींहि न द्यावा । जर दिलाच तर मग कबुल कर्धं

 2852

न करावा । नामर्दपणाचा चहाडखोरीचा अथवा । दोष लावुनं कां घ्यावा ॥ सरकारदरबारिं सदां लाचलुचपत । ती चालीयाची नवल न कांहीं त्यांत । यास्तव कबुली देऊं नये हें उचित । मामलेदारांना खचित ॥ ( चाल ) केसरी आदि बहुतेक । पहिल्याच मताचे लोक॥ केसरी आणि लोकमत । पाठिंबा यांचा मिळत ॥ मामलेदार साक्षींत। भराभर कबुली देत ॥ माफीच्या विश्वासांत । दिले जबाब हो निर्धास्त ॥ ( चाल ) या प्रकर्णि गावले एजंट । क्राफर्डचे होते मोठमोठ ॥ ब्राम्हण मुसलमान मराठ । कित्येक भिक्षुक भट्ट ॥ बातमी लागता ही खष्ट । म्हणति हो आलें संकट ॥ कागद पत्र केले फस्त । चट-सारें जाळुनि झट ॥ ( प. चा. ) एजंटापैकिं हणमंतराव जहागिरदार। धडाक्यास केलें यालाच गिरफ्दार । दोन वर्षें साधी कैद रुपये दोन हजार । दंडाचि ठोठावला अनिवार ॥ ५१ ॥ श्री० ॥

सस्पेंड केल्यावर सोडनिया तो बंगला । क्राफर्ड रहाया हाटेलामधिं गेला । रात्रीचा कोठें नाहींसाहो झाला । त्यानें सूं बाल्या केला ॥ क्राफर्डच्या सहिचें पत्र एक सांपडलें । अपमान काळजी दुःसह मजला झालें । मी मुळानदीमधिं उडी घतली झालें । माझें जीवित संपविलें ॥ सापडेल माझें प्रेत नदींत तुह्मांला । हुडकितां होळकर पुलाजवळ हा लिहिला । मजकूर यावरी विश्वासचि ठविला । लागले प्रेत हुडकायाला ॥ असं आत्महत्येचें नाटक करुनी गेला । परि पोलिसांनीं कावा हा जाणीला । झट जवळपासच्या रेल्वेस्टेशनाला । केले नाकेबंदीला ॥ दुसऱ्याच दिवशीं पहाटेस

पुण्याच्या । त्या स्टेशनावरी पांढऱ्याच दाढीचा । अंगांत मळकट पायघोळ अंगरखा । हातरुमाल गळ्याभवनां ॥ डोळ्यावरि आढिन डोक्याच्या टोपीला । एक युरोपियन गाडीत चढतां दिसला । पाहोनी आला संशय पोलिसाला । झट कळविलें मुंबईला ॥ (चाल) साहेब हळुच उतरीलें । आगबोट बघुं लागले ॥ घेवोनी सोंग बावळें । बोटीच्या तिकीटास गेले ॥ हातावरि तुरि देवोनी । निसटायच्या बेताला आले ॥ यमदून पोलिस धावले । कमिशनर पळपुटे धरले ॥ लागलीच पुण्याला आणिलें । जामिनावरति खुले केलें ॥ हे होते पळुन गेलेले । परि साहेब ह्मणुनिच सुटले ॥ (चाल) तो फौजदारी करण्याचें होतें ठरलेलें ॥ पण पुढें कमीशन नेमावें असें झालें ॥ यामुळें खटलें हें बरेंच थंडावलें ॥ गोऱ्याची जात अब्रु नाहिं बघवलें ॥ युरोपियन अधिकाऱ्यानें ढिलें सोडीलें ॥ कांहिं युरोपियन खटऱ्यास विरोधी झाले ॥ कांहिं गोऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनीं टाळलें ॥ स्पेशल डयुटि कांहींनीं नाकारिलें ॥ क्राफर्ड आणि सार्थीदार यांचें सगळें ॥ खासगी पत्रव्यवहार नाहिं पकडीले ॥ पोस्टाच्या गोऱ्या हपिसरनें नाकारिलें ॥ हेंच पोस्टखातें ह्मणे मदतगार झालें ॥ पोलीस खात्याला किती ठावें हें सगळें (चा. प.) कमिशननें क्राफर्ड गोरा सुटला बिनघोर । परि काळे अदमी ह्मणुनि मामलेदार । अडकले जबानी खरी देउनी त्वर । त्यांचा टिळक घेति कैवार ॥ ५२ ॥ श्री० ॥

मामलेदारांना सरकारनें दाखविला । विश्वास माफिचा परी आयत्या वेळेला । सोडोनी गोरा गोना काळ्या अदमीला । देण्याचा प्रसंग हो आणला ॥ सरकारनें ऐशापरी मामलेदारा । फसवावें नाहिंच योग्य हें सरकारा । आलि दया हिंदुलोकांची टिळक सरदारा । घेतलें शिरिं कार्यभारा ॥ रानडे गोखले सर्व मंडळी झाली । टिळकांना अनुकूळ अशी पहा त्या वेळीं ! केसरीनें तेव्हां दणाणुन सोडिली । हिंदभू दुमदुमुनी गेली ॥ त्या वेळीं लोकमत टिळकांच्या बाजुनें । होतेंच नाहीं कारण सांगायाचें । केसरी पत्र फडकलें एकविस मे चें । ऐका लेख बहारीचे ॥ ( चाल ) सरकारानें विश्वासानें, मामलेदारांना । खरी साक्ष देण्याच्या अटीवर माफि दिली त्यांना ॥ दिली साक्ष खरी, परी पदरिं पुरी, माफि पडायाला । उशीर कां हो असा दिला हा केसरिनें टोला ॥ मामलेदारांच्या, केसालाही, धक्का लावायला । अधीकार ना सरकारला केसरी गर्जीला । भलें बुरें कांहीं, होता त्यांचें, विश्वासघाताचें । महा पाप सरकारच्या माथीं खास बसायाचें ॥ या लाचाच्या, मुद्यावर जर क्राफर्डचि सुटले । मग मामलेदार कसेहो अडकुनिया बसले ॥ ( प. चा. ) या विषयावरती केसरींत भडिमार । टिळकांनीं केला सुरू फार जोरदार । देउनी राजकिय रूप लोकमत फार । वळवुनि घेई अनिवार ॥ ५३ ॥ श्री० ॥

या कामिं टिळकांनीं चळवळ भारी केली। ती सार्वजनिक रूपास आणुन भिडवीली। जाहले टिळक एकची पहा त्या वेळीं। मामलेदारांना वाली॥ मामलेदारांविषयींची सहानुभूती। मिळविली खास जनतेची टिळकांनीं ती। चहुंकडे हाचि विषय हो लोक बोलती। चमके टिळकांची मूर्ति॥ तारीख एक सप्टेंबर बाराला। अठराशें एकुणनव्वद या सालाला। जाहीर सभा ती जंगि भरलि पुण्याला। कबूतरखाना जाग्याला॥ त्या वेळिं सभेच्या विनंतिपत्रा-वर। मोठमोठ्या लोकांच्या सह्या होत्या रीतसर। पहिलेच रानडे न्यायमूर्ति बहाद्दर। भांडारकर बेदरकर॥ श्री बाबामहाराज राजे तुळाजिराव। देशमूख अल्लीमर्दाखान नवाब। अशा प्रतिष्ठित लोकांचीं होतीं नांवें। विनंतिपत्रावर पहावें॥ चांगलाच जमला जमाव मंडप भरला। पारशी मुसलमान इंग्रजही समयाला। अशि चिकार गर्दी अध्यक्षस्थानाला। रावबहादुर नूलकराला॥ (चाल) अध्यक्ष प्रथम बोलले। घ्या ऐकुन नीट सगळें॥ नेटिवास दोषी केलें। चोराला साव ठर-वीलें॥ नेटिवांनिं साह्य केलें। म्हणुनिच हें पाप फुटलें॥ मामले-दारांना दिधलें। माफिचें वचन कुठें गेलें॥ पूर्ण तें पाहिजे केलें। सरकारानें याच वेळें॥ ( चा. प. ) यापरी ठरावही पास झाले भरा-भर। टिळकांनीं भाषण केलें फार जोरदार। हेंचि कीं पहिलें टिळ-कांचें भाषण तर। झालें मोठें जाहीर॥ ५४ ॥ ॥ श्री० ॥

अ(८९९) २०२६८ … २०१७१४२
१३२२०

टाळ्यांच्या गजरीं टिळक उठले बोलायला । दणदणुन सोडिली सभा लोक डोलवीला । विद्वान पुढारी लाभलाच देशाला । लागली सभा म्हणायला ॥ सणसणीत भाषा ऐका हो टिळकांची । जरि पाळणूक नच होय अभय वचनाची । विश्वासघात होईल मग सरकारची । किंमत काय राहण्याची ॥ मामलेदारानं पैसे भरुन अधिकार । घेतला असेलचि विकत जणू बाजार । परि तयामुळें तो नालायक ना ठर । नोकरिस ऐका हो म्हार ॥ ज्या कायद्यावरी सरकार हें नाचत । तो पिनलकोडही असेंचि कीं सांगत । या नमुन्याचाही सुटे खटला विलायतेंत । कां न सुटावा हा येथं ॥ क्राफर्ड साहेब होता कीं कमिशनर । अस्सल युरोपियन गोरा कामदार । नीतिमान अशा इंग्रजी जातिचा नर । जातिला डाग लावणार ॥ तु गरिब मामलेदार होते सगळ । द्यावया लांच हो सिद्ध झाले असतील । परि नीतिमान क्राफर्ड कसा अनुकुल । झाला पापाचें मूळ ॥ (चाल) अशा कायदेशीर भाषणीं कडकडला हो कडकडला ॥ शाबास टिळक हा ध्वनी निघाला, त्यावेळां ॥ चांगलेंच नेटास लाविलें खटल्याला हो खट० । मुंबइपासुन सिमल्यापावतर, त्या वेळां ॥ नव्या कायद्याचें बील आणायला लाविलें सरकारला हो सर० । सरकारासहि विचार पडला त्या वेळां ॥ टिळकांच्या या चळवळीमुळें चहुंबाजुला हो चहुं० । लोक पाठवी अर्ज तारा त्या वेळां ॥ मामलेदारांना दिलेलिं वचनें पाळायला हो पाळा० । कसुर नको हा झाला गलबला त्या वेळां ॥ घाइ अशी उठवून हलविलें सरकारला हो

सर० । वाचविले मामलेदार हो त्या वेळां ॥ सर्व मामलेदारांनीं त्या टिळकाला हो टिळ० । सन्मानेनीं अहेर केला त्या वेळां ॥ दिलें घडचाळचि पुरलें त्यांना जन्माला हो ज० । अंगावरि घातलें उपरणें त्या वेळां ॥ ( चा. प. ) यापरी देशकार्याच्या रणांगणावर । टिळकांच्या देशभक्तिची नाचे समशेर । कमकुवत भ्याड प्रतिपक्षि बघुन हें सार । चरफडले अंतरिं फार ॥ ५५ ॥ ॥ श्री० ॥

अठराशें नव्वद सत्त्याण्णवपर्यंत । बहु वाद माजले चहुंकडे देशांत । होतेच टिळक अग्रसर या वादांत । सर्वही लहानमोठ्यांत ॥ कोणींही कसला करो वाद उत्पन्न । त्या वादामध्यें बऱ्या हेतुनें शिरुन । यश संपादनिं करुनिया जिवाचें रान । साधिलें स्वदेशकल्याण ॥ टिळकांचें मोठेंपण असें यांतच कीं । हें सांगायाला हवें कशाला लोकीं । तें तेज धैर्य तशि बुद्धिमत्ता लौकीकीं । उपमा नाहिं ह्यावया कीं ॥ जे वादविवादचि घडले सात सालांत । त्यांतील मुख्य असती कीं साहासात । नच उरलें कांहीं त्यांनिल हो सांप्रत । गेले निमाले काळांत ॥ हा केवळ टिळकचरित्रांतिल इतिहास । यास्तवची नांवें नुसतीं देतों खास । सर्वच वर्णु लागतां महाभारत । होईल इतुकें विस्तृत ॥ ( चाल ) संमतिवयाचा कायदा कौंसिलांत आला ॥ हें कारण झालें देशामधिं वादाला ॥ किति तरी होतिं हो कलमें या कायद्याला ॥ परि पहिलें कलमची कारण तें वादाला ॥ बाराव्या वर्षि लग्न झालें त्याहि मुलिला ॥ उपभोगितांच कायद्यानें शिक्षा नवऱ्याला ॥ कांहिं सुधारक अनुकूल झाले कायद्याला ॥ टिळ-

कांचा होता पक्ष उलट बाजुला ॥ या कामिं टिळकांनीं जंगि सभा भरविल्या ॥ जनसमाज टिळकांकडे आयता वळला ॥ सरकार खात्री सुधारकपक्षाला ॥ किति सभेंत झाले दंगे हणामारीला ॥ तें सर्व लोकमत झिडकारुनि त्या वेळां ॥ नोकरशाहिनें पास कायदा केला ॥ ( प. चा. ) सरकार लोकमत बसवी तें धाब्यावर । नोकरशाहिचा कायद्याचा बाजार । टिळकांनिं मांडिला सर्व चवाठ्यावर । पटविलं जनतेला सारं ॥ ५६ ॥ ॥ श्री० ॥

जनतेवर बसली टिळकांची ती छाप । यामुळेंच चढला सुधारकां संताप । लागले बघाया टिळकांना पाण्यांत । शिरला मत्सर पोटांत ॥ ही देशामध्यें दुही झालि पाहून । ही नोकरशाही नाचे आनंदानं । कमविलं राखिलं राज्य भेद नीतीनं । शेंबडें पोर हें जाणं ॥ हातांत घेउनी सुधारकांचा हात । टिळकांवरि राही सदां डोळे फोडीत । हें असेंचि राही टिळक मरेपर्यंत । आहे अनुभव प्रख्यात ॥ नोकरशाहिच्या खोट्या जोरावरती । हे सुधारक टिळकांशिं सामना देती । हरप्रयत्निं टिळकां चीत कराया बघती । पण तो देव पाठिराखी ॥ संमती वयाच्या कायद्याच्या समयाला । टिळकांनिं हटविलें सुधारक पक्षाला । त्या सनातन धर्माभिमानि लोकांला । त्राता टिळकाचि झाला ॥ ( चाल ) कशा तरी पकडींत धरोनी ठेचण्यास टिळकाला ॥ पहात असतां संधि सुधारक समय एक पातला ॥ उभारिलें ग्रामण्यप्रकरण टिळकावरि पुण्याला ॥ ( प चा. ) तो एकसत्याला चहा गर्जिला फार । ग्रामण्य माजलें टिळकांवरि अनिवार । मौजेची हकीकत थोडक्यांत सुंदर । देतों एका हो चतुर ॥ ५७ ॥ श्री० ॥

गोपाळराव जोशी एक विचित्रचि वल्ली। कुत्सीन कुचेष्टखोर विनोदी असली। राहणार व्यक्ति पुण्यामध्यें हो भली। त्यांनीं गंमत हो केली॥ या भोंदू आणि भ्याड सुशिक्षित लोकां। फाशि पाडुनि फजित करोनी द्यावा झोका। गमतीचा आला विचार दिवशीं एका। केलें काय त्यानं ऐका॥ मिशनरी लोकांची ओळख होती त्यांची। झट गेले घेतली गाठ मिशनरी यांची। सांगुनी सर्व ही कल्पि फजित-वाड्याची। योजना केली हो पुढची॥ व्याख्यान सभेचें निमित्त त्यांनीं केलें। कांहिं कांहिं ठळक इसमांस आमंत्रण गेलें। पंचहौद मिश-नची शाळा ठिकाण नेमिलें। वेताळपेठ पुण्यामधलें॥ रानडे टिळक अशि बडी मंडळी गेली। यामुळें कुणाला शंका नाहीं आली। व्याख्यान कांहिं तरि झालें सभा संपली। येथुन गंमत हो सगळी॥ ( चाल ) मिशनऱ्यांनिं चहा केलेला। कप सर्वांपुढें ठेवीला॥ बिस्किटें होतिं जोडीला। असा थाट एकाएकीं जमला॥ मिशनरी चहा तो घ्यावा। असें वाटलें नाहिं जरि कोणाला॥ नको चहा कप हा उचला। असें कुणि न म्हणाया धजला॥ गोंधळून त्या समयाला। पाहुनी टक-मका डोळां॥ कुणि हळुच कप उचलीला। घेतला हो एकच प्याला॥ कुणिं घोट एकच घेतला। सन्मान सभेचा केला॥ कुणि नुसता हात लावीला। कुणि शुंभासारखा बसला॥ ( प. चा. ) आगलावे गोपा-ळराव उडाले झटकर। त्या पुणेवैभवामधिं केलें हो जाहीर। जे नव्हते आले त्यांचींहि नांवें एकंदर। केलीं प्रसिद्ध हो रीतसर॥ ५८॥ श्री०॥

लात्रोनी गेले आग जोशि गोपाळराव । परि इकडे झाली सारी धात्राधात्र । छापविलीं पत्रीं उगीच खोटीं नांवं । सांपडलेंच पुणेंवैभव ॥ फिर्याद झाली पुणेंवैभवावर । तें सुटे दोनशें रुपये दंडावर । धर्माभिमान्यांनीं कळविला मजकूर । शंकराचार्यांना सत्वर ॥ श्रीकडुन न्यायगुरु भिडुमाधवशास्त्री । आणखी निपाणीकर ते त्र्यंकटशास्त्री । हे दोघे आले धर्मकमीशन मंत्री । शिक्का मोर्तब आज्ञापत्रीं ॥ ज्या बेचाळिस लोकांवरि कमिशन बसलें । त्यांतील कांहिंनीं कमिशन धिःकारिलें । राहिले हजर परि नाहीं मानियेलें । कांहिंनीं निकाल अवगणिले ॥ फिर्यादी बाळासाहेब नातु झाले । धर्माभिमान्यांचे पुढारी हो त्या वेळें । प्रतिवादि रानडे टिळक आदि बडे धेंडें । आले कमिशनच्या पुढें ॥ ( चाल ) कमिशननें निकाल सांगितला । कांहिंनीं मान्य तो केला ॥ दिलं प्रायःश्चित्त कोणाला । कुणि दानें मुक्तचि झाला ॥ रानडे भटादि सकलां । या सुधारक गुरुनीला ॥ सक्षौर प्रायश्चित्ताला । दिलं बघुन हशा हो झाला ॥ टिळकांनि चहा घेतला । परि गेले मग काशीला ॥ तिथं प्रायश्चित्त विधि केला । दाखला असा कावीला ॥ पाहोनि असा दाखला । दोषमुक्तता टिळकाला ॥ ( प. चा. ) परि कमीशनचा हा निकाल धाब्यावर । बसवुनी नातुनीं टिळकास बहिष्कार । घातला म्हणनी घ्या प्रायश्चित्त समोर । आमुच्या पुण्यांत या सक्षौर ॥ ५९ ॥ ॥ श्री० ॥

प्रतिपक्षीयांचा टिळकांच्या मिशावर । अति कटाक्ष होता म्हणुं लागले वर । टिळकांच्या मिशावर फिरवुं शास्त्राचि धार । तरिच हो खरे ब्रम्हवीर ॥ काढिला प्रश्न टिळकांनीं एक खुबीचा । आं चहापानाला प्रायश्चित्तविधींचा । शास्त्रांत कुठें उल्लेख दाखवा त्याचा । प्रत्यय द्या आम्हां साचा ॥ नातूचें म्हणणें वाड-वडिल हो आमुचे । परक्याचे हातिचा चहा कधिं न घ्यायाचे । मग धर्माच्या ग्रंथांत कसे गावायचें । अक्षर प्रायश्चित्ताचें ॥ यावरी टिळक खुबिदार वचन बोलले । शास्त्रांत ज्यास प्रायश्चित्त न सांगितलें । तो दोषहि होऊं शकत नाहिं त्यामुळें । ऐका टिळक पुढें बोलले ॥ माहीत नाहिं पुर्वजा पदार्थचि ऐसा । कुणि खाता जरि तो पात्रचि होई दोषा । तरि अपराधचि होईल बटाटे खाता । ठावें पुर्वजास नव्हता ॥ ( चाल ) आणखी पुढें चतुर टिळक हो युक्तिवाद बोलले ॥ हिंदुशास्त्रकारांना माहित नव्हतें म्हणुन कुणि बळें ॥ जना-वरें तीं किंवा पक्षीं आचरटपणिं भक्षिलें ॥ तरी योग्य न होईल कांहो टिळक असें बोलले ॥ ( प. चा. ) असा ग्रामण्याचा मोठा बखेडा अनिवार । टिळकांवरि कायम केला खास बहिष्कार । परि टिळकांनीं मुळिं नाहिं घेतली माघार । होते खरेच बाणेदार ॥ ६० ॥ श्री० ॥

या बहिष्काराची आच टिळकांना लागली । लोकांची संगत पंगत त्यांना मुकली । अठराशें ब्याण्णव त्र्याण्णव इसवी सालीं । कार्यें दोन घरीं झालीं ॥ थोरल्या मुलीचें लग्न मुंज मुल-ग्याची । ब्राम्हण मिळेना दैना झाली त्यांची । त्यांतल्या त्यांत एकची

गोष्ट सौख्याची । झाली तेव्हां व्याह्याची ॥ टिळकांचा नव्हता जुन्या मतांचा व्याही । होतेच केतकर बापूसाहेब पाही ; हे स्वतः सुधारक होते म्हणून कांहीं । अडचण ती आली नाहीं ॥ या बहिष्कृत लोकांचा उपाध्या एक । तो ब्राम्हण होता रानड्यांचा आश्रीत । यानेंच भाग-विली नड बहिष्कारांत । घरीं टिळकांच्या कार्यांत ॥ भागली अशी नड उपाध्याय बोवांची । परि वाट काय त्या करावि स्वयपाकाची । आचार्य मिळे परि उणीव आचाऱ्याची । तेव्हां जाणलीच साची ॥ ( चाल ) अडथळा जेवणावळिला । टिळकांस तेव्हां आला ॥ टिळ-कांच्या धर्मपत्नीला । जाणं पडलं शेजाराला ॥ विनवूनिया शेजार-णीला । स्वयंपाक करून आणीला ॥ टिळकांच्या संस्थानिक मित्राला । कळतांच बातमी त्याला ॥ धाडिले आचारी त्या वेळां । कार्याच्या समारंभाला ॥ ( चाल ) अशि अडवणूक बहु झाली । परि नाहीं स्वारी वळली ॥ प्रायश्चित्त कर्मे केलीं । काशीस गोष्ट पटवीली । शंकराचार्यांनीं दिधली । मुक्तताच जाहिर केली ॥ टिळकांची स्वारी वदली । एकदा पुनः ना फिरली ( प. चा.) प्रतिपक्ष झगडला देऊन । ताव मिशीवर । उपटल्या मिशा त्यांच्याच अखेरी तर । परि टिळ-कांच्या त्या मिशांचे आकडे वर । राहिले नाहिं गेले हार ॥ ६२ ॥ श्री० ॥

पंडिता रमाबाईचें शारदासदन । हें आलें आतां गमतीचेंच प्रकर्ण । व्हा एकचित्त द्या कथानकाला कान । ऐका भक्ति-भावानं ॥ या रमाबाइचे वडील शास्त्री होते । कुलशीलवान संपत्तीमान मोठे । परि दुर्दैवानें ह्यातारपणीं पाठें । त्यांना दारिद्र्याचे खोटें ॥

या दारिद्र्याच्या दुःखांतचि ते मेले । आईबाप दोघे स्वर्गाला हो गेले । श्रीनिवास आणी रमाबाइ राहिले । दोनी पोरकींच बाळें ॥ या दोन मुलांनीं प्रेतयात्रा मातेची । कशि तरि उरकली । भिक्षा मागुन साची । बाहेर पडे भरण्यास गार पोटाची । जोडी बहीण भावाची ॥ (चाल) शास्त्रयांच्या दोन पोरांला । किति कठीण आली वेळा ॥ मग रमा श्रीनिवासाला । घेऊन निघे प्रवासाला ॥ मागोन भीक पोटाला ।.तुकडाच खाति वेळेला ॥ हिंडतां गांवोगांवाला । पोचलींच कलकत्त्याला ॥ (प. चा.) या हालानें श्रीनिवास मेला पोर । कोसळे रमेवर दुःखाचा डोंगर । अशि दशा न येवो कधींही वैऱ्यावर । ईश्वर करील तेंचि खरं ॥ ६२ ॥ श्री० ॥

या रमाबाइला संस्कृत शिक्षण फार । शास्त्र्यानें दिधलें होतें एकंदर । ते हजारों संस्कृत श्लोकांचें पाठांतर । झालें होतें अनिवार ॥ ती करीत होती कवितेची रचनाही । ते दुर्दैवाचे ढग विनळले वाही । प्रख्याती झाली शहरामधिं लवलाही । जो तो दर्शनास येई ॥ प्रोफेसर टॉने पंडित महेशचंद्र । इत्यादीकांनीं सन्मानावि जाहीर । करुनिया बाइला गौरविलें हो फार । घालुनी गळां पुष्पहार ॥ तेथून पुढें पंडिता रमाबाई या । आसाम प्रांतीं सिल्हट येथें गेल्या । तेथील वकिल मेधावी यांच्या झाल्या । पत्नी उजविली काया ॥ दुर्दैव लागलें बाईच्या पाठीला । एकोणिस महिन्यामधिंच पती हो गेला । होत्याच गरोदर रमाबाई या वेळां । झाली कन्या समयाला ॥ ही मनोरमा या नांवें डाउक सकलां ।

होऊन बि. ए. हिनें ख्रिस्तिधर्म पत्करिला । पुढें रमाबाई सन अठराशें व्यायशींला । एकदम आल्या पूण्याला ( चाल ) पंडिता रमाबाइचें नांव सगळ्याला ॥ जाहीर होऊन गेलें होतें पुण्याला ॥ वैधव्य तज निवृत्ता तारुण्याला ॥ पाहुनी मनावर परिणाम बहु झाला ॥ स्त्री-शिक्षणाच्या दृष्टिनें सुधारक वर्गाला ॥ लाभलें निधानचि वाटें रान-डयादींला ॥ ( चाल ) परि उलट जुनाटचि विचाराच्या लोकाला ॥ संकट पर्वतचि समाजावरी गमला ॥ ही बाई करिल खरि समाजाच्या सेवेला ॥ झट असें वाटलें सुधारक पक्षाला ॥ पण जुना लोक तो शंकित कीं मनिं झाला ॥ दिसण्यांत बाइ चांगली वरी दिसण्याला ॥ परि निघेल कैसा पुढें ठावें देवाला ॥ यापरीं मनांमधिं जुना लोक गुणगुणला ॥ ( प. चा. ) व्याख्यान पुराणें पुण्यास झालीं फार । स्थापि आर्यमहिला समाज बाई तर । अठराशें व्यायशीला पुण्या-सही महशूर । झाली बाइ थोडी फार ॥ ६३ ॥ श्री० ॥

या बाईचा हा समाज आर्यमहीला । भरभराटीस नच आला मंदावला । बाइच्या मनाला विषाद बहु वाटला । तेणें जीव चरफडला ॥ हें कारण त्यांना विलायती जाण्याला । यांतून इंग्रजी शिक्षण तें घेण्याला । जाणारचि होत्या बाई त्या वेळेला । गेल्या झालं विलायतेला ॥ निजकन्येसह त्या गेल्या विलायतेला ॥ दोघींनीं तेथें हिंदुधर्म सोडीला । बाप्तिस्मा घेउन भजति येशुख्रिस्ताला ॥ तेथें इंग्रजीही शिकल्या ॥ तेथून पंडिता रमाबाइ हो गेली । त्या अमे-रिकेला कांहिं दिवस राहिली । तेथील लोकांवरि छाप फार पाडली ।

बाईनें अमेरिकेंत मली ॥ पंडितारमाबाई ही ख्रिस्तिधर्माची । त्यामुळें मिशनरी अमेरिकन लोकांची । बाइला मिळाली सहानुभूती साची । निघाली गोष्ट फंडाची ॥ त्या अमेरिकन लोकांनिं दिला बाईला । पैशाचा मोठा फंड हवाली केला । जो होता पुरेसा दहा वर्षें खर्चाला । घेऊन आलि मुंबईला ॥ ( चाल ) अठराशें एकुण-नव्वद सालिं मुंबइला ॥ शारदासदन नांवाच्या हा संस्थेला ॥ स्थापुनी केलें जाहीर सर्व लोकाला ॥ शाळेंत उच्च वर्गांतिल विधवा बाला ॥ त्यापरी निराश्रित इतर स्त्रीवर्गाला ॥ शिक्षण द्यावया काढियली ही शाळा ॥ व्यवहारनीति मर्यादा गृहकार्याला ॥ शिकण्यास शारदा-सदन योग्य ही शाळा ॥ ( चाल ) फी नकोच मुळिं द्यायाला । केवढी सोय शिकण्याला ॥ त्या अनाथ स्त्रीवर्गाला । बोर्डिंग फुकट राहण्याला । मोठमोठ्यांचा होता सल्ला । या शारदासदनाला ॥ रानडेचि भाडांरकर । तेलंग लाल शंकर ॥ इत्यादि सुधारक झाला । अनुकूलचि या संस्थेला ॥ ( प. चाल ) सर्वांचे लागले डोळे संस्थेवर । पंडिता रमाबाई ही ख्रिस्ति मशहूर । तिच्या हेतुविषयिं साशंक लोक घरोघर । केसरी पुढें धडकला र ॥ ६४ ॥ श्री० ॥

केसरिनें तेव्हां आपुल्या एका अंकांत । जो मजकुर होताच इंग्रजी पत्रांत । छापून काढिला तोचि सर्व लोकांत । वाचुन झाला गोंगाट ॥ शारदासदनामधिं बालविधवा सात । विद्यार्थिनी शाळेंत शिकत असतांत । त्यांपैकिं दोघिंनीं ख्रिस्तीधर्माची प्रीत । केली पूर्णपणें व्यक्त ॥ आणखी एक तर आपखुशीनें पुढें । मिशनऱ्याकडून

तें शिक्षण हो लवलाही । यावरून शारदा सनद ख्रिस्तिसंस्था ही । कोणालाहि शंका नाहीं ॥ या परी केसरी बेंड फोडि सदनाचें । लोकास इषारे देइ सावधानाचे । अठराशें नव्वद जानेवारि महिन्याचे । अठ्ठावीस तारखेचे ॥ ( चाल ) सर्व स्त्रियांना, शिक्षणदाना, उपयोगी ही परी । शारदासदन ख्रिस्तिसंस्था बोले केसरी ॥ एक दिडकिही, दिल्यावीण तें शिक्षण मिळतें परी । शारदासदन ख्रिस्ति० ॥ फुकट जेवणं, फुकट राहणं, सोय दिसे बरि परी । शारदासदन० ॥ नच धर्माचें शिक्षण तेथें, गोष्ट कदाचित् खरी । शारदास० ॥ मोठे लोक या शाळेला हो, सल्लागारी परी । शारदासदन० ॥ भव्य इमारत उदंड पैका, शाळेला या परी । शारदासदन ० ॥ वेळीं सावध नच केल्याचा, दोष आमुच्या वरीं । शारदासदन० ॥ समाज कल्याणाचें कंकण बांधुनिया हो करीं । शार० ॥ ( प. चा. ) वाचून इषारा केसरिचा जोरदार । जनसमाजांत हो खळबळ उडली फार । ते सुधारक चरफडती केसरीवर । केसरी शांत दमदार ॥६५॥श्री०॥

यावरी रानडे रावबहादुर म्हणती । विधवांची शाळा मिशनरी लोकांची ती । जरि होय तरी आपणां काय हो भीती । कोठें गोष्ट कशी नडती ॥ पंडिता रमाबाईनीं धर्म सोडीला । तरि विद्या त्यांच्याकडुन ती घ्यायाला । हरकत काय हो अमुच्या स्त्रीवर्गाला । नाहीं असें गमें मजला ॥ जेवढें बरें तेवढेंचि कुणिही घ्यावें । नावडत्या मार्गी कुणी कशाला जावें । तें स्वकार्य साधुनी यश लोकांसी द्यावें । देशहित असेंच साधावें ॥ यावरी केसरी निर्भीडपणें बोले ।

ऐकतांची बोला हृदय थराहून गेलें । त्या केसरिला नच उगिच मोठे-पण आलें । पटतें मनास हें सगळें ॥ ( चाल ) करुनि टीका रानडयांच्या भाषणावरि केसरीनें । रानडयांना बजाउनिया स्पष्ट केसरि बोले ॥ तें वाईट कोणाचें शारदासदनांत झालें । रानडयावरी दोष सगळा, स्पष्ट केसरी० ॥ बुरखा स्त्रीशिक्षणाचा, घेउनी आमुच्यांत घुसले । सर्वही ते शत्रु अमुचे, स्पष्ट केसरी० ॥ खिस्ती ते आणि त्यांचे साह्यकारी होत सगळे । शत्रु अमुच्या समाजाचे, स्पष्ट केसरी० ॥ हे विद्वान आणि कितिही राजमान्यहि थोर असले । शत्रु अमुच्या हिंदुत्वाचें, स्पष्ट के० ॥ शत्रु स्त्रीशिक्षणाचे आमुच्या देशांत असले । नच कुणाची भीड धरितां स्पष्ट के० । ( प. चा. ) इतक्यांत एका बाइचि सदनामधिं तक्रार । होताचि सदन सोडिलें ढोंग्याचा बाजार । सांगत फिरूं लागली तेथिचा प्रकार । केसरिंत पत्र तिचें छानदार ॥ ६६ ॥ श्री० ॥

या बाई होत्या जेव्हां विलायतेंत । व्याख्यानें दिधलीं रमाबाईनीं बहुत । त्याबद्दल तिकडे फार प्रशंसा होत । बाईची इंग्रजि पत्रांत ॥ त्या इंग्रजि पत्राचाच उतारा आला । केसरींत वाचुन संशय मनिचा फिटला । सर्वांस इषारा केसरिचा मनिं पटला । ऐका वृत्तांतचि पुढला ॥ इंग्रजी पत्र स्तुति करून बाइची म्हणतें । पंडिता रमाबाईची इच्छा दिसते । बाटवून अवघ्या पहा हिंदु विधवांते । देउन शिक्षण हो त्यांते ॥ बाटग्या हिंदु विधवांनीं हिंदु लोकां । उपदेश करावा ख्रिस्ति धर्माचा एका । हें पुंण्य जोडुनी आकाशीच्या बापा ।

गाठावें त्या परलोका ॥ आणखी केसरी खुद्द रमाबाईचा । निश्चयाच बुकांतिल उतारा देई साक्षी । त्या अमेरिकन लोकांना या बाईचा ॥ एका अर्ज ह्मणायाचा ॥ शुभ वर्तमानाचा प्रसार तो होण्याला । हा अवघा हिंदुस्थान ख्रिस्ति बनण्याला । हिंदुचा जनांना सोपें साधन याला । आधीं फोडूं जनान्याला ॥ या हिंदु लोकांच्या जनान्याच्या कुलुपाला । तोडुन दरवाजा खुला पाहिजे केला । या हिंदु स्त्रियांनीं ख्रिस्ति धर्म पत्करिला । झालें समजा कार्याला ॥ या कामिं हवा तो पैसा धाडा मजला । पंडिता रमाबाईनें असा हा लिहिला । मजकूर मागणी अमेरिकन लोकाला । केली घावलें केसरिला ॥ हा सारा मजकुर केसरिनें छापविला । वाचिता सुधारक पक्ष मनीं हादरला । केसरिनें यावरि सिंहनाद बहु केला । सारा देश गर्जला ॥ ( चाल ) बाईचा स्त्रीशिक्षणाचा बुरखा दूर करी । खूप शारदा सदनाला देइ तडाखे केसरी ॥ हिंदु धर्मासी जाळायाची इच्छा नाहिं खरी । फक्त निखारे आणुन ओती बाई भरल्या घरावरी ॥ घरावरी ओतून निखारे येशूची प्रार्थना करी । होणें जें मजकडुन देवा, केलें मी तें या करीं॥ वाट लावण्या पुढली देवा समर्थ तूं रे श्रीहरी । अशी बाइ ही करित प्रार्थना, देइ तडाखे केसरी ॥ करीत असतां देवाची त्या बाइ प्रार्थना अशा परी । शिग तुनारी रावबहादुर वाजविती अमुचे तरी ॥ मिशनरि किंवा सरकारी ही शाळपेक्षां खरोखरी । रमाबाइचें विधवा मिशनगृह तें वाइट आसुरी ॥ धर्मशिक्षणीं हात न घाली सरकारचि हो खरोखरीं । आणि मिशनरी कधिं न लपविती हेतु आपुला

अंतरीं ॥ पण बाईच्या शाळेमध्यें शिक्षणाचें ढोंग वरी । बाटवि-ण्याचा हेतु बाइचा ढोंगि बाई अंतरीं ॥ ( प. चा. ) या पुराव्यानिशी केसरिच्या लेखांनीं । अंजन घातलें झणझणीत टिळकांनीं । मग सुधा-रकांचे डोळे उघडले झणीं । बघनी तोंड वासोनी ॥ ६७ ॥ श्री० ॥

अठराशें त्र्याण्णव अगष्टचे तेराला । रानडे भट भांडारकरांनीं अपुला । संबंध शारदासदनाचा तोडिला । झाला सदनाचा काला ॥ घेतलया मुली ठेवून घरांतचि अपुल्या । पालकांनिं नाहीं पुन्हां कधीं धाडीलया । टिळकांनिंच ह्मणती अमुच्या मुली वांचविल्या । ह्मणती धन्य टिळकराया ॥ अठराशें पंचाण्णव सालांतिल बातमी । पंडिता रमाबाईनीं शारदासदनीं । दहा बारा पोरी आणि बाया बाईनीं । हिंदुच्या बाटविलया त्यांनीं ॥ बातमी धडकता समाज खवळुनी गेला । राहणेंच मुष्किल पुण्यामधीं बाईला । शारदासदन हें नांव बदलुनी गेल्या । कायमच्याच केडगांवला ॥ ( चाल ) असं ख्रिस्ति धर्माचें वावटळ उडवीलें ॥ टिळकांनिं धैर्यानें तोंड देउनी बळें ॥ नातरी बाइच्या ढोंगाला हो सगळ ॥ विद्वान सुधारक बळी पडते बावळे ॥ हें अरिष्ट होतें हिंदुधर्मावरि आलें ॥ परि खास टिळकदेवांनीं दूर केलें ॥ ( प. चा. ) ग्रामण्य रचियलें ज्यांनीं हो टिळकांवर । धर्माभिमान टिळकांचा पाहिल्यावर । लज्जेनें माना वाकविल्या अनिवार । नाहीं केल्या पुनः वर ॥ ६८ ॥ ॥ श्री० ॥

या पुढें टिळकसूर्याचे किरण ते शिरले । नोकरशाहिच्या घरांतें हा पसरीले । चातुर्यबुद्धीचे प्रकाश हो पाडिल । राजकारणावरीं सगळे ॥ या कारण झाला हिंदुमुसलमानदंगा । दंग्यानं घातला चहूंकडे हो पिंगा । गुजराथ मुंबइ पुणें वाइ या भागा । येवलें प्रभासपट्टण गा ॥ हाणा मान्या जाळपोळ झाली घरादारांची । फोडिल्या मुर्ति कांपल्या गाइ दिवसाची । सात्वीकपणा हिंदुचा भोवला हिंदुसी । पाहिजे लाठी काठीसी ॥ या हिंदुमुसलमानांच्या वादाच्या गोष्टी । किति सांगाव्या त्या एक सांगतों छोटी । ते मिर्झा अब्बास अलिबेग प्रख्याती । स्वारी मुसलमान जाती ॥ सरकारी ओरीएंटल ट्रान्स्लेटर । टिळकांच्या खटल्यामुळें जना महशूर । आलेच असतिल ध्यानीं आपुल्या तर । यांनीं गंमत केली र ॥ ( चाल ) हे महाबळेश्वरिं असतां एका वेळें ॥ खांसाब महाबळेश्वर क्षेत्रीं गेले ॥ श्रीकृष्णाबाइचे देवळाकडे वळले ॥ देवळात जावें असें खांस वाटलें ॥ वाटतां लगिच देवाचे द्वारीं आले ॥ ( चाल ) संशय गुरवाला आला । मज्जाव त्यानें केला ॥ नको अडवुं जाउं दे मजला । बोलती खान गरवाला ॥ मी हिंदुच रे बघ मजला । जातिचा कनोजा आला ॥ बघ दाढि नाहिं हनुवटिला । जाउं दे आंत ब्राह्मणाला ॥ तो गुरव मनीं चुळबुळला । साधलें वाटे खानाला ॥ ब्राह्मण पुण्याचे कांहीं । कुंडांत करिति स्नानाला ॥ वळखिलें त्यांनिं खानाला । तिथुनीच सलाम त्यांनिं केला ॥ झाले खजिल पाय काढीला । अशि गोष्ट घडे त्या वेळां ॥ ( प. चा. ) झट त्याच ठायिं फिर्याद झालि

त्यांच्यावर । पन्नास रुपये देउनी सुटले दंडावर । त्या मुंबइच्या पत्रांनिं तापवुनी शीर । ओरड केली हो फार ॥ ६९ ॥ श्री० ॥

हे जातिजातींतिल पूर्वीचें भांडण । परि होउन बसलें पुढें राजकारण । यामधीं हात सरकारि अयोग्य रितीनं । पडला हेंची कारण ॥ सरकारी हुकुम अंम्मल बजावणींत । व्यक्तिवाच केवळ दोष त्यामधीं शिरत । मग भांडण मिटणें कुठें उलट वाढत । यापरी याही दंग्यांत ॥ सरकार धरीतें पक्ष मुसलमानांचा । या कारण प्रेमा नव्हे मशीदीवरचा । या राजकारणीं शह हिंदूंना द्यायचा । त्यांना मुसलमानांचा ॥ हा डाव राजकारणांतील टिळकांनीं । ओळखुन खेळत होते डाव धैर्यांनीं । दिलि हुलड उठवुनि जाहिर सभाची त्यांनीं । नोकरशाहिस धाक मनीं ॥ ( चाल ) जाहीर सभेंत टिळकांनीं । सांगितलें हो ठासोनी ॥ ताबुतामधीं हिंदूंनीं । सामील न व्हावें कोणी ॥ पालखीस दर्ग्यावरुनी । मज्जाव मुसलमानांनीं ॥ तर त्यांच्या डोल्याच्या पुढुनीं । अलाबिदा म्हणु नय कोणी ॥ नाचणें रडणें साडोनी। तीं सोंगें हिडीसवाणीं ॥ ताबूद पावे नवसांनीं । गणपतीच पावे त्यांनीं ॥ उत्सवाची हौसच भारी । गणपती पुजा घरींदारीं ॥ त्या गणेशोत्सवीं नाचा । ताबूद नको परकशाचा ॥ ( प. चा. ) हिंदुनी गरीबी बघुन उलट त्यांच्यावर । आरोप करीती मुसलमान व सरकार । म्हणताती हिंदुच मोडतात शिष्टाचार । ऐसी टिळकवाणी साचार ॥ ७०॥ श्री. ॥

टिळकांच्या या उपदेशानें फिरलीं । हिंदुचीं मनें तीं नाहिं पुनः हो रमलीं । ताबुतांत परि गणेशोत्सवीं गढलीं । ऐसी वार्ता चहुकडली ॥ शेकडा पंचविस हिंदुचे ताबुत । करण्यांत आले त्या सालीं पुण्यांत । ते हिंदू लेजिमवाले गेले नाहींत । ताबुताच्या मिरवणूकींत ॥ झाडुन हिंदू न्हात्वि पुण्यांतिल जमला । एकंदर सगळा ठराव त्यांनीं केला । ताबुतापुढें चौघडे न वाजविण्याला । जाणें नाहिं कोणी गेला ॥ (चाल) रेवडचा नाडापूडीला । कुणि गिऱ्हाईक ना त्याला ॥ बुधवार भररस्त्याला । लागल्या फळ्या दुकानाला ॥ घरदारचौक माडचाला । लाविला सर्वांनीं टाळा ॥ ताबूत मिरवणूकीला । अशि नव्हति कधीं अवकळा ॥ ( प. चा. ) रस्त्यांत माजिस्ट्रेटचि झाले फार । परिणाम असा टिळकांच्या भाषणाचार । जिकडे तिकडे टिळकनांवाचा गजर । झाला मोठा जयकार ॥ ७१ ॥ श्री० ॥

गणपतिचा उत्सव सार्वजनिक स्वरुपाला । टिळकांनीं खुबिनें नेउन हो पोंचविला । व्याख्यानें मेळे दणका उडुनी गेला । उत्सव चहुंकडे झाला ॥ हा धार्मिक उत्सव जुनाच होता फार । यांतची घातली भर नवीन विचार । धर्माच्या पायावरी उभारीं थोर । राष्ट्रकार्याचें मंदीर ॥ बापरो आणखी टिळकांनीं सुरु केला । तो शिवाजिउत्सव राष्ट्रकार्यजागृतिला । या कारण घडलें विचित्रचि ऐकायला । देतों मी सारांशाला ॥ टेंपल गव्हरनर रायगडावरि गेले । अठराशें पंचायशीं सालीं पाहियलें । शिवछत्रपतीचें समाधिस्थान सगळें । धन्याचि त्यांना वाटलें ॥ परि हेळसांड त्या समाधीची

झालेली । पाहोन वाटलें वाइट हो त्या वेळीं । याबद्दल त्यांनीं हजेरीच घेतली । कुलाबा कलेक्टराचि भली ॥ अठराशें पंचायशीं डिसेंबर पंधराला । याविषयिं केसरिंत मजकुर थोडा आला । सरकार सालिना पांच रुपये मंजुरिला । झालें तयार द्यायाला ॥ मग अठराशें पंचाण्णव सालिं अखेर । केसरींत झाले सुरू लेख यावर । श्रीछत्रपती शिवरायस्मारकावर । घेती टिळक मनावर ॥ (चाल) शिव छत्रपतीच्या स्मारकाच्या चळवळिला ॥ टिळकांनीं केलें सुरू सभा भरवीलया ॥ वर्गणी भराभर लोक पाठवी सगळा ॥ गोरगरीब राव राजे अनुकूळ याला ॥ परि खेडच्यापाडच्याच्या लोकामधिं जागृतिला ॥ करण्यास हो शिवजन्मोत्सव सुरू केला ॥ (प. चा.) टिळकांची होती तयारीच अगोदर । वळविला देश शिवजन्मोत्सविं सादर । ज्योतिषी महाडकर यांचें नांवें जाहीर । उत्सव रायगडावर ॥ ७२ ॥ श्री० ॥

रायगडचा उत्सव पहिला पंधरा एप्रील । अठराशें शाण्णव साल हो तें ठरलं । झालि जंगि तयारी सुरू राष्ट्र हाललं । संकट परी एक आलं ॥ उत्सवाचे चालक यांनिं बंदोबस्ताला । लिहुनिया धाडिलें मामलेदाराला । कळविलें तयानें कुलाबा कलेक्टरला । घोडा इथंच हो अडला ॥ या कलेक्टरांनीं शिवाजिमहोत्सवाला । कायद्यांतील जत्रांचा कायदा लावीला । कायदेशीर रीनीनें परवानगीला । नाहीं दिलें उत्सवाला ॥ त्या रायगडावरि खूप गर्दि तर जमली । परि कलेक्टरानें अशी मेख मारीली । होणार कसें काय

ही काळजी पडली । वार्ता चहूंकडे गेली ॥ ( चाल ) पाहुनी टिळक हे उठले । झट महाबळेश्वरिं गेले ॥ कौंसिलर नाणावलेले । टिळक हे होते त्या वेळें ॥ गव्हरनरास ते भेटले । त्या सर्वहि समजावीलें ॥ टिळकांच्या वजनामुळें । ते कबुल गव्हरनर झाले ॥ ( प. चा. ) घेउनी यशाचा बावटा टिळकनरवर । उत्सवास आले स्वतः रायगडावर । बघतांच लोकांनिं शिवाजीच्या बरोबर । केला टिळकांचा जयकार ॥ ७३ ॥ ॥ श्री० ॥

हा रायगडींचा उत्सव दणका झाला । माणसांनिं गड तो फुलुन तव्हां गेला । बाराहि मावळांतील प्रतिनिधि आला । झाडून एकंदर सगळा ॥ तो किल्ल्यावरील चौक नगरखान्याचा । कोठार दारूचें वाडा दिवाण यांचा । तो दिवाणखाना राजदरबाराचा । गेला गजबजून साचा ॥ जगदीश्वराचें शिरकाई देवीचें । देऊळ आणि अवशेष इमारतींचे । गजबजून गेले माणसांनिं हा साचे । पारणें फिटलें डोळयांचें ॥ शेंकडों वर्षांमधिं फिरलि नव्हति केरसुणी । कोळिष्टकें तेथील गेलीं झाडांनी । तुटक्या फुटक्या मूर्तच्या अंगावरुनी । हात फिर फारा दिवसांनीं ॥ (चाल ) पाणि पिण्याचा तलाव सारा स्वच्छ करुनि घतला ॥ काटे सराटे काढुन रस्ता साफाचि तो करविला ॥ मैदांनीं तट्ट्याचा मांडव अवाढव्य घातला ॥ मंडपामध्यें दोन मोठ्या गाद्या मध्यभागाला ॥ या गाद्यावरि रामदास शिव यांच्या तसबिरीला ॥ थाटानें ठेविले दर्शना लोकसमूह लोटला ॥ अंगीं नुसती बंडी किंवा लंगोटी कमरेला ॥ खांद्यावरि घोंगडें

कोंकणी मुंडासें डोइला ॥ अशा थाटाचा शिवरायाचा जमला हो मावळा ॥ ( चाल ) शिवराय पदावरि डुई ठवुन मावळे । नारळ सुपारी नजराणा त्या वेळें ॥ ठेविनी मावळे गादिपुढें हो सगळे । बघनात दृष्टि लावुनी मनीं गहिंवरले ॥ डोळयांत पाणि आणुन ह्मणूं लागले ॥ महाराज धनी शिवराय आज दीसले ॥ बोलवेना डोळयांतून अश्रु खळखळे ( प. चा. ) झाला छत्रपतीचा जन्मकाल अवतार । शिवछत्रपतींचा रायगडीं जयकार । जाहलाचि मंगल वाद्यांचा तो गजर । दुमदुमलेंच दरीखोरें ॥ ७४ ॥ श्री० ॥

त्या रायगडावर जो तो ह्मणूं लागला । महाराज टिळक दाखवा कुठें आह्माला । घेउनिया दर्शन निववूं द्या या डोळा । ऐसें बोले मावळा ॥ मग शिवरायाचा प्रसाद घ्याया बसले । मावळे हातिं घेउनी घास थांबले । दाखवा टिळक हो तरिच जेवूं बोलले । ऐका पुढें काय झालें ॥ हे वर्तमान कळतां लोकमान्य टिळकांना । लोकमान्य आले धावतची त्या स्थाना । मग स्वतः वाढुं लागले टिळक मावळयांना । धन्य ते मावळे जाणा ॥ ते इतर लोक मावळयासि हो सांगत । हे पहा टिळक महाराज तुह्मां वाढत । जय टिळकमहाराज कीं जय गर्जत । जेवले जयजयकारांत ॥ शेवटीं समारंभाच्या टिळक बोलले । शिवछत्रपती अवतारि पुरुष जाहाले । श्रीराम जणूं या भरतखंडिं अवतरले । त्यांनीं दुर्जन निर्दाळिले ॥ या उत्सवांत नाहिं राजद्रोह कसलाही । हा उत्सव करणें कर्तव्यचि अपुलेंही । जर उत्सव केला नाहिं तरी सर्व ही । हांसे दुनिया लवलाही ॥ ( चाल ) उत्सवाचि

अशि चळवळ, बघुन तळमळ, इंग्रजी पत्राला ॥ अँग्लोइंडियन बरळले, खोडसाळपणें, वात जणुं झाला ॥ मुसलमानाविषयिं दूषानं, उत्सव हे दोन, सुचले टिळकाला ॥ ते राजद्रोहाचें वळण देशाला देणं, उत्सवचि ह्मणुन, सुचले टिळकाला ॥ खुद्द राजा स्वस्थ बैसला, परी कोडावळा, पोट दुखमीला ॥ ( प चा. ) टिळकांच्या विरुद्ध ओरड उठली फार । टिळकास देशकार्यांत दुप्पट जोर । जरि मुसलमान वळवुनी घेई सरकार । भ्याला नाहिं टिळक दमदार॥७५॥श्री०॥

स्वाभिमान सोडुन खुद्द मुसलमानाशीं । तो नकोच होता लोकमान्य टिळकांसी । रानडे गोखले आदि प्रतिपक्षासी । हेंची मान्य हो त्यासी ॥ परि स्पष्टपणें मत बोलुन दाखविण्याला । छातीच नसे गोखले रानडयादींला । विनदिक्कत मत बोलणार एक निघाला । थोर टिळकचि त्या वेळां ॥ हें हिंदु मुसलमान दंग्यामधि सरकारला। चांगलेंच आलें कळून त्या समयाला । यामुळेंच नोकरशाहिस विचार पडला । झाला बाउ टिळक तिजला ॥ त्यांतुन मांडणी राजकीय पक्षाची । राष्ट्रीय सभेंतचि होउं लागली साची । या सभेंत सारी सुशिक्षीत हिंदूंची । भरती नव्हति मुसलमानांची ॥ राष्ट्रीय सभेमधिं राज्यकारभारावर । करण्यास टीका हिंदुच होते म्होर । म्हणुनीच हिंदुला पाण्यामधिं सरकार । पाही टिळकाला तर फार ॥ या हिंदुमुसलमान दंग्याचेंच निमित्त । सरकार मुसलमानास धरी हातांत । वैषम्य सहज माजलें मुसलमानांत । हिंदुविषयीं त्यांचे मनांत ॥ सरकार मुसलमान एकजीव होऊन । राष्ट्रीय सभेचे विरोधी झाले जाण ।

सरकारनें भरले मुसलमानाचे कान । म्हणती टिळक बडा सैतान ॥ (चाल) मुसलमान जातीचे इष्टे टिळकासी ठरविलें ॥ सरकारांनीं मुसलमानांना हिंदुंतून फोडलें ॥ मुसलमानांनीं राष्ट्रसभेवरि बहिष्कार घातले । परी टिळक धैर्याचा मेरू मुळींच ना डळमळे ॥ काय करावें कसें करावें मवाळांमि जाहलें ॥ परी टिळक ताराच ध्रुवाचा अढळ उभे राहिले ॥ (प. चा.) नें कसें काय तें ओघानें हो कळणार । नोकरशाहिसी टिळक सामना देणार । तो कथाभाग हळुहळु क्रमानें येणार । ऐका तुम्ही श्रवण करणार ॥ ७६ ॥ श्री० ॥

राष्ट्रीयसभेच्या पहिल्या चार बैठकिला । लोकमान्य नव्हते मुळिंच हजर त्या वेळां । राष्ट्रीय सभा त्या काळिं होति नमुन्याला । सालाबाद नियम ठरला ॥ त्या वेळीं मेथा वाच्छा रानडे याचे । हातांतचि होतें त्या राष्ट्रीयसभेचें । चालकत्व भरवें करतिल तें न्यायाचें । तेंचि लोककल्याणाचें ॥ राष्ट्रीयसभेमधिं सामाजिक परिषदही । भरवीत होते सुधारक आजवर ही । हे लोकमताला मुळींच रुचलें नाहीं । माजली मोठी बाबत ही ॥ तो बहुजनसमाज आणि सुधारकपक्ष । यांमधील तंटा गेलाच विकापास । या सामाजिक परिषदमुळें तो खास । व्यत्यय राष्ट्रीयसभेस ॥ राष्ट्रीयसभेचें महत्त्व जाणुन पुरता । टिळकांनीं बहुजनसमाज धरिला हाता । चळवळ केलि राष्ट्रीयसभेकरितां । सांगूं किती काय आतां ॥ (चाल) अकरावी राष्ट्रीयसभा ही पुण्यामधीं गाजली ॥ सुधारकांची सामाजिक ती परिषद नको मुळीं ॥ राष्ट्रसभेच्या मंडपामधीं लोकशाहि

( ७७ )२०२ काव्य
९३२७ २०१७।८८

बोलली ॥ परि हट्टाला पेटलीच ही सुधारक मंडळी ॥ लोकमताची पायमल्लि टिळकासि नाहिं बघवली ॥ ( चाल ) टिळक ते लोकशाहीचे । झाले पुढारी या समयाचे ॥ सुधारक पक्ष थट्टेचें । भाषण बोलला वाचें ॥ साळि माळि तेलि कोळयाचे । अज्ञानि दरिद्री यांचे ॥ टिळक हे पुढारि अशांचे । काय त्या हातुन व्हायाचें ॥ ( प.चा. )राष्ट्रीय सभेचा खर्च दहाहजार । मोजोन व्हा राष्ट्रीय सभेचे मुकत्यार । यापरी सुधारकपक्षानें टिळकावर । मोठं कोडं सोडलं र ॥ ७७ ॥ श्री० ॥

परि टिळकांच्या त्या जन्मकालिंचा गुण । कांहिं विशेष होता असं भाग हो म्हणणं । त्यामुळें लोकमान्यास पैशाची वाण । नाहीं पडली हो जाण ॥ राष्ट्रीयसभेस्तव रक्कम दहाहजार । कोठून मिळे आपणा कशी मिळणार । टिळकांचे अंतःकरणामधिं हा विचार । आला एक क्षणभर ॥ तों श्रीधर विठ्ठल दाते या नांवाचें । एक बडें धेंड आठवलें हो मित्राचें । हे श्रीधर विठ्ठल दाते त्या काळाचे । होते प्रसिद्ध पुण्याचे ॥ थोडक्याच शब्दामधिं दात्यांच्या कीर्तीचें । वर्णन असेलाचि जरी योग्य करण्याचें । तरि स्वारि दांडगेश्वर असेंच म्हणायचें । जशा त्या कामीं त्या वेळचे ॥ या दांडगेपणानेंच मामलेदारी । सोडावि लागली त्यास हो अखेरी । परि स्मरणशक्ति आणि कुशाग्रबुद्धि भारी । लौकिक त्यांचा अनिवारी ॥ हे अर्ज लिहिण्याचे कामीं फार हूषार । याचरीच बनले संपत्तीनें कुबेर । बेडकिहाळ गांवचे जमिनिविषयीं साधार । लिहीला अर्ज त्यांनिं एकवार ॥ साधार

अर्जानें जप्ती उठोन गेली । एक लाख रुपये फी दात्यास मिळाली । यापरी बनुन श्रीमान स्वारि राहिली । हानी पुण्यांत त्या काळीं ॥ (चाल) दात्यांची उंची सहा फुटावर होती । तें चक्रि पागोटें भलें जाड डुई वरती । उपरणें दुहेरी जाड रेशिमकांठी ॥ अंगांत पायघोळ अंगरखा आणि धाटी ॥ कापडयांचीं ठाणें चढविलेली ही मोठी ॥ जणु नालपिराची स्वारि दिसे अटोकाटी ॥ ( प. चा. ) अशि विचित्र मूर्ती खुष सदा टिळकावर । यांच्याच घरीं लोकमान्य गेले सत्वर । ते वासुदेवराव जोशी होते बरोबर । होती मध्यरात्र अंधार ॥ ७८ ॥ श्री० ॥

त्या मध्यरात्रिं हो दरवाजा ठोठावला । दात्यांना मजकुर सर्वहि विदीत केला । लोकमान्य म्हणती दात्यांना त्या वेळां ॥ राष्ट्रिय कार्य संभाळा ॥ राष्ट्रीय सभा ती दहाहजारा वीण । मोडुन कार्य देशाचें बिघडतें जाण । राष्ट्राचे करितां हात पसरितो दोन । दाते गेले गहिंवरुन ॥ तत्क्षणीं दात्यांनीं टिळकांना हो नेले । तळघरांत तें जडजवाहीर दाखविलें । त्यापैकिं सोन्यामोत्याचा डबा त्या वेळें । केला हवालीं घ्या बोले ॥ ( चाल ) दहा हजाराहुनी होते । किमतीचें जडजवाहीर तें ॥ पावतीहि ना घेतां तें । टिळकांना देती दाते ॥ घ्या रक्कम एकाहातें । राष्ट्रीय सभा सोडा तें ॥ परि सुधारक वर्गानें । मोडिलें वचन मागुतें ॥ ( चाल ) तडजोडिचे प्रकार, केले टिळकांनीं फार, परि कांहीं फेरफार, नाहिं सुधारकांनीं केला । सुधारक म्हणति टिळकाला । तुमच्या भडागि लोकमताला ! देशहीत म्हणजे काय त्याला । कळतें का कांहीं बोला ॥ राष्ट्रीयसभेच्याच मंडपीं ।

भरविणार आम्ही सभेला ॥ ही चढेल वाणी । ऐकतां कानीं । राग आला मनीं । टिळकांनि नसाच तो गिळला । मान अपमानाच्या । गोळ्याला । देशापायिं गुंडाळुनि ठेवला ॥ बोलती सुधारकपक्षाला । टिळकांच्या ऐका बोला ॥ त्या लोकमता, झिडकारु नका, अशि अरेरावि कां, राष्ट्रीसभा संभाळा ! अक्कलेचा ठेवा का तुम्हाला । देवानं एकट्यालाच दिधला ॥ राष्ट्रीयसभेच्या मंडपीं । तुम्हि नकाच भरवुं सभेला ॥ तों आले दाते । इतुक्यांत तिथें । म्हणे सुधारकातें । झिडकारून लोकमताला । भरविणार काय सभेला । असा कोण पूत मायेला । काय समजलात पुण्याला ॥ लागेल आग मंडपाला । बजावीत दाते संभाळा ॥ ( चा. प. ) असा दात्यांचा हा हिस्का पाहिल्यावर । झट पडली सामाजीक सभा बाहेर । असा हिसडा बसला त्या वेळीं जोरदार । सामाजीक सभेला र ॥ ७९ ॥ श्री० ॥

टिळकांच्या ऐशा विजयाच्या कीर्तीत । भर पडली तेव्हां पुणें म्युनिसिपालटींत । ती निवडणुक त्या परी कायदे कौंसिलांत । आले निवडून निश्चित ॥ या दोन ठिकाणीं टिळकांनीं देशाची । उत्तम प्रकारें केली सेवा साची । ही कारकीर्द तीन साडेतीन वर्षांची । गाजली फार टिळकांची ॥ कीर्ती ही असते संकटाच्या पोटांत । विजयाचे चौघडे विघ्नांच्या स्वगींत । जयकार गर्जना पूर्ण आत्मयज्ञांत । सारें घावें टिळकांत ॥ अठराशें शाण्णव सालांतिल दुष्काळ । अन्नाविण मेले लोक ते पुष्कळ । पटापट प्राण सोडिले गुरांनीं सकळ । चाऱ्याविण त्या वेळ ॥ कडब्याच्या

किमतिला गुरें विकूं लागलीं। सोन्याच्या भावानें कडबा पेंडी झाली । तीं हजारों पोरें खिस्तांनीं बाटविलीं । मोठी दंगल माजली ॥ या वेळिं टिळकांनिं दुष्काळीं कायद्यावें । भाषांतर केलें मराठींत सगळ्याचें । मोफत पुस्तकें वाटण्यास सरकारचे । केले हवालिं हो साचे ॥ कांहिं कलेक्टरांनीं पुस्तकें हो जाळीलीं । कांहींनीं फाडलीं कांहींनीं दाखविलीं । केराचि टोपली बेगुमानपणिं असली । केली वाताहत सगळी ॥ ( चाल ) परि टिळक बारसें सरकारचें जेवले ॥ जाहीरसभा भरवोनि लोकां शिकवीलें ॥ दुष्काळी कायदा सारा तहकुबि बोले ॥ हालवून सोडिलें रान चळवळिंत सगळें ॥ कलेक्टरचे खोडसाळ हुकूम हो आंतले ॥ ते चवाट्यावरी टिळकांनीं आणिले ॥ ( चाल ) महाबळेश्वरिं दुष्काळावरि गव्हरनर बोलला ॥ अर्ध्या शेराचें धान्य पुरे हो माणसाच्या पोटाला ॥ याच भाषणावरी टिळकांनीं खासा टोला दिला ॥ गव्हरनराला एक हजारचि पगार पुरे महिन्याला ॥ चैन चारा चमन खाउनी सुचतें बोलायाला ॥ ( चाल ) व्हाइसराय लॉर्ड एल्जिन । या सुमारास फिरलीला ॥ व्हाइसराय संस्थानीकाला । होते निघाले भेट द्यायाला ॥ जिथं जातिल तिथं बहारीचा । समारंभ उडे कडाक्याचा ॥ झडे थाट मेजवान्यांचा । बाटल्या रिकाम्या दारूच्या ॥ लखलखाट रोषनाईचा । भरमसाट दारुकामाचा ॥ लाखों रुपये संस्थानीकांचा । या कामिं खर्च व्हायाचा ॥ ( चाल ) बडोद्यांत समारंभाचा कडेलोट झाला ॥ तीस चाळीस लोक गर्दींत चिरडुनी मेला ॥ देशांत कहर दुष्काळाचा

हो झाला ॥ राजांनीं करावें तमाशाच्या जलशाला ॥ हा असा दिवस इंग्रजी अमदानिंत आला । लांछन खरोखर थोर इंग्रजीशाहीला ॥ ( प. चा. ) अशा कडक टिकाही केल्या सरकारावर । उघडलीं स्वस्त धान्याचीं दुकानें तर । टिळकांनिं पुणें शहरांत कामगिरि फार । केली दुष्काळीं थोर ॥ ८० ॥ ॥ श्री० ॥

या दुष्काळाच्या जोडीला हो प्लेग । कधिं कोणिं ऐकला नव्हता ऐसा रोग । अठरशें शाण्णव आक्टोबर महिन्याला । झाला सुरू मुंबईला ॥ प्लेगाचा दणका उडाला मुंबईत । माणसें पळूं लागलीं चहूं भागांत । देशांत बहुकडे कळली हो ही मात । आली विचित्र ही साथ ॥ ही वार्ता गेली विलायतीं लंडनला । ऐकतांचि तिकडे सर्व घाबरा सुटला । त्या लंडनावरी याच रोगाचा घाला । मागें होता हो पडला ॥ तत्काल आल्या विलायतेहुनि तारा । योग्य ते योजुनी उपाय प्लेग निवारा । मग हिंदुस्थान सरकारनं बांधिल्या कमरा । आला व्यवस्थेचा फेरा ॥ तें मुंबइच्या जवळचें पुणें गांठलें । त्या प्लेगानें सर्वांचे दील फाटले । घरोघर रडारड कान ऐकुनी विटले । ह्मणती संकट हें कुठलें ॥ या वेळिं टिळकांनीं केसरीच्या लेखांनीं । त्या पुणें शहरवासियां धीर देऊनी । या प्लेगावरि डाक्टरी लेख लिहवोनी । लोकां शांतविलें त्यांनीं ॥ ( चाल ) या वेळीं दोष दाखविले । टिळकांनिं सरकाराचे सगळे ॥ टिळकांचें ह्मणणें असें पडलें । सरकार स्वस्थ आधि बसलें ॥ प्लेगानें मोठें थोरलें । चहुंकडे जाळें पसरिलें ॥ सरकार आणि हो निजलें । दिले विलायतेनें टोले ॥ मग

धडपडून हें उठलें । कावरें बावरें झालें ॥ ( प. चा. ) आळसाचा वचपा अधीकारि काढणार । रोगावर योजुन उपाय ते भयंकर । त्या योगानें रयतेचे हाल होणार । बजाविन केसरीकार ॥८१॥ श्री०॥

आणखी सुचविलें टिळकांनीं सरकारला । अधिकार योग्य ते। म्युनिसिपाल कमिटीला । या कामिं देउनी हवा घ्याया सरकारला । स्थानिक पुढाऱ्यांचा सल्ला ॥ पण सरकारानें कायदा कौंसिलांत केला । एक ठराव पास त्या योगें अधिकाऱ्याला । लष्करी थाटाचे अधीकार त्या वेळां । मिळाले असा योग आला ॥ ते जिल्हा कलेक्टर साम्राज्याचा अवतार । तत्क्षणींच बनले करतिल ते मुकत्यार । त्याविरुद्ध नाहीं फिर्याद चालणार । लष्करी कायदा बेसुमार ॥ रोगाच्या संशयावरुन सर्व घरदार । उलगडून आंतिल वस्तु जाळिती पार । रोग्याला वाटेल तिथें खुशाल नेणार । असे सुलतानि अधीकार ॥ ( चाल ) यांच्याहिकडुन होणार नाहिं अंमल ॥ यासाठिं नेमिले अधीकारि स्पेशल ॥ हे अधीकारि अर्थात् गुणी अस्सल ॥ या गुणांत कडक स्वभावाचि भेसळ ॥ अरेरावि दंडुकेशाही यांची मासळ । इत्यादि गुणांचे अधीकारि सोज्वल ॥ असणार सांगणें कशास डावं सगळं ॥ ( प. चा. ) सरकारि अवकृपा विशेष ज्या गांवावर । नेमका तिथंच अधिकारि असा येणार । अधिकारि असा लाभला पुण्याला थोर । रँड दंडुकेबहाद्दर ॥ ८२ ॥ श्री० ॥

वाढला पुण्यांमधिं कारभार प्लेगाचा । अंमल सुरू जाहला रँड साबाचा । आणखी दोन लष्करी अधीकाऱ्यांचा । हुकूम झाला मदतीचा ॥ मग काय पुसावें आधींच तो उल्हास । तैशांत आला शेवट फाल्गुनमास । लष्करी शिपाई त्यायहि लष्करि खास । आली भरती अमलास ॥ दडविलेले रोगी हुडकुन काढायचे । या कामिं निघाले धिंडवडे लोकांचे । तो बरा प्लेग परि नको नको सरकारचे । उपाय असले जारीचे ॥ तरि धरला होता टिळकानीं शांतपणा ॥ केसरींत लिहुनी शांतविनी लोकांना । सरकारासहि ते सुचविन होते नाना । प्रकार कोण आणि ध्यानां ॥ वेढाच लष्करी होता पुणें शहराला । मगदूर कुणाची बिगर पास येण्याला । तो तुरुंग गमला दवाखाना रोग्याला । रोगी भिऊनच मेला ॥ रोग्यास उचलुन दवाखान्यामधिं नेती । तिथं नात्याचें ना मायेचें कुणि दिसती । ते गोरे सोजिर आसपास हिंडती । रोगी भिऊनच मरती ॥ कुणि गंध लाविता जरा अधिक डोक्याला । सुंठच थापली म्हणती अजारी झाला । ओढुनी नेति सोजीर धट्टयाकट्टयाला । रोगी म्हणून क्योंपाला ॥ तांबड्या फुलींची खूण घरावर दिसतां । सोजीर पाटि येऊन मारि लत्ता । फोडुन दार तोडन कुलुप अवचीता । शिरती घरांत ना पत्ता ॥ त्या सर्व वस्तुचा नासधूस ते करिती । लाटुन कितीकचि खिशामधिं डफरीती । देवघर सोवळं ओवळं छपरावरी ठेवती । माकडचेष्टा ते करिती ॥ ( चाल ) जें हातिं सांपडेल तें, जमा करुनिया, सर्व वस्तूंते आग लावुनी, नाचे भवतालिं । आशि रँडशाहि गाजली ॥ रोजाराचें

खुलीं घरें बघुन, सहज गमतिनं, घरामधिं शिरुन, बायका पोरांची दैना उडवीली । अशि० ॥ बेगुमान बायकाकडे बघून, हसति खिदळती, रोगिच ह्मणून, बायकांना धरती, मोंगलाई झाली । अशि० ॥ याहुनी मरण तें बरें, लोक त्रासुन, बोलती खरें, अंत कां बघसी, धाव वनमाली । अशि० ॥ ( प. चा. ) यामुळें उडाला पुण्यांत हाहाःकार । टिळकांनिं कळविला गव्हरनरासी प्रकार । रँडला लिहुन पाठवी गव्हरनर सारं । रँड आपलंच करी खरं ॥ ८३ ॥ श्री० ॥

टिळकासि हाल लोकांचे बघवेनात । वर्गणी जमविली मोठी हो लोकांत । काढियला तेव्हां दवाखाना पुण्यांत । पुण्याच्या पहिल्या प्लेगांत ॥ परवानगी नाहीं दिली प्रथम सरकारनीं । बहु प्रयत्न करुनी जिवापाड टिळकांनीं । मंजुरी मिळविली रोगी अपखुषीनीं । येती आपण होऊनी ॥ भर प्लेगामध्यें सर्व पुढारी गेले । परि लोकमान्य ते पुण्यामधिंच राहिले । त्या रँडसाहेबाबरोबर ते फिरले । लोकांसाठीं झीजले ॥ लोकांचीं मतें सुखसोयी बरें वाईट । त्या रँडसाहेबासी टिळक सुनवीत । आणि हिंदु दवाखान्याची व्यवस्था बघत । होते टिळकची भर प्लेगांत ॥ परि रँडशाहीचा अंमल कडकचि झाला । टिळक हे बजावित होते हो सरकारला । निर्भीडपणानें निषेध त्यांनीं केला । जुलमी रँडशाहीला ॥ ( चाल ) ही रँडशाहि नव्हे मोंगलाई जणु झाली ॥ ही प्रजा पुण्यांतिल गरिब किती जरि असली ॥ तरि अशा जुलमाला खास त्रासुन गेली ॥ सोल्जरांच्या अत्याचारें वेडी

झाली ॥ आंतल्या आंत करपून जाऊं लागली ॥ ( प. चा. ) लोकांचीं मनें बेहोष झालीं जर तर । तो दोष नाहिं मग गरीब रयतेवर । ही जबाबदारी सर्व सरकारावर । ऐसें गर्जे केसरीकार ॥ ८४ ॥ श्री० ॥

या प्लेगामध्यें पुण्यांत हो टिळकांनीं । जनसेवा केली अतुल अशा धैर्यानीं । नातरी पैशाला पासरिच्या भात्रांनीं । डेचाळली पुढारि जनीं ॥ गोखले प्रोफेसर प्लेगाच्या वेळेला । कामाला गेले होते विलायतेला । इकडील त्यांच्या मित्रांनीं कळविला । सारा जुलुम जो झाला ॥ या रॅन्डशाहिच्या जुलुम जबरदस्तीला । गोखल्यांनें केलें प्रसिद्ध छापुन तिजला । वाचुनि लोक त्या विलायतीं खवळला । ह्मणती करा चौकशीला ॥ मग आलें लिहुन तिकडून गव्हरनराला । हा काय धुमाकुळ तिकडे तुम्ही चालविला । या परि जोराचा सवाल मोठा आला । मुंबइच्या गव्हरनरला ॥ येतांच गोखले मुंबई सरकारांनीं । गोखल्यास लावला दट्टचा तारि देवोनी । ह्मणे तिकड तुम्ही छापविलें तें खरं करुनी । द्यावें सिद्ध पुराव्यांनीं ॥ त्या काळिं गोखले पुढारि हो घाबरले । मग न्यायमूर्ती रानडे गुरूजी आले । चेल्यासि म्हणति मागूनी माफि मोकळे । व्हावें ऐका गोखले इतुक्यांत वासुदेवराव जोशासह आले । ते लोकमान्य गोखल्यास हो बोलले । तुम्ही नकाच मागु माफि उगिच या वेळें । पुरावे देऊं आम्ही सगळे ॥ ( चाल ) विद्वान पुढारी छान बोलके गोखलेचि घाबरले । माफि मागुनी सरकाराची खुशाल घरिं गेले ॥ म्हणूनिच गोखले ते गोखले । टिळक ते टिळक जग बोलें ॥ देशबंधुनें खरें दुःख

वें सांगाया भ्याले । भीत गोखल्या धीर द्याया लोकमान्य आले ॥ ह्मणूनिच० ॥ बोललेलें खरें म्हणाया नाहिं गोखले धजले । खरा बाणि ही टिळकांची हो विचार जग बोलें ॥ म्हणु० ॥ (प. चा.) हा बाणेदार-पणाचा हो डोंगर । येवोनी पडला नोकरशाहिसमोर । मग कोठें गाडुनि कसा उडवावा बार । नोकरशाही करित विचार ॥ ८५ ॥ श्री० ॥

टिळकांची लोकप्रियता वाढत गेली ! यामुळेंच नोकरशाहि मनीं गडबडली । हा टिळक डोईजड होणारचि त्या वेळीं । नोकरशाही बोलली ॥ तेजस्वि टिळक नरवीर सिंह पकडायला । टाकावें जाळें कोणत्या समयाला । हा विचार मोठा नोकरशाहिस पडला । ईश्वर तिला साह्य झाला ॥ अठराशें सत्याण्णव जून रात्रिं बाविसला । मिस्टर रँडसाहेबांचा खून झाला । त्या गणेश खिंडिन पुण्यानजिक उडवीला । बार मध्यरात्रीला ॥ त्या गणेशखिंडित गव्हरनराचे बंगल्यांत । महाराणी विक्टोरिया यांच्या प्रीत्यर्थ । जुबि-लीचा जंगी समारंभ हो तिथं । केली आतषबाजि बहुत ॥ ( चाल ) बडाबडा लोक तिथं जमला समारंभाला ॥ चहुकडे रंगि-बेरंगि रोषणाईला ॥ भवतालच्या टेकडयावरी पेटविल्या होळया ॥ इंग्रजी बँड सुस्वर गोड कानाला ॥ बंगल्यांत बडचा खान्याचा थाट उडाला ॥ ( चाल ) खाना झाला लोक परतला । मध्यरात्रिच्या सम-याला ॥ आलि वेळ रँड साहेबाला । गांठले गणेश खिंडिला ॥ तिथं झाडितुन कुणि आला । झट चहुन गाडिवर गेला ॥ पिस्तूल बार काढीला । बेशुद्ध साहेब झाला ॥ दुसऱ्याही गाडिवर असला । लाग-

लींच गोळिबार झाला ॥ आयर्स्ट मुकले प्राणाला । पत्नित्वरि देह टाकीला ॥ ( प. चा. ) गोऱ्या हपीसरांच्या खुनांनीं हाहाःकार । तत्क्षणीं पिसळुन गेलें हो सरकार । दांत ओंठ चावुं लागलें पुढाऱ्यावर । त्यांतुन टिळकावर फार ॥ ८६ ॥ श्री० ॥

बसविले पुण्यावर तत्क्षणिं जादा पोलीस । वीस हजार जाहिर केलें हो बक्षीस । गुन्हेगार पकडणारास द्यावया खास । झाला सुरूच गुप्त तपास ॥ लँबसाब कलेक्टर यांनिं सभा बोलविली । निवुनिया रागारागानें त्वारि बोलली । खात्रिनें दुष्ट कट करणारी मंडळी। त्यांनिंच गोष्ट ही केली ॥ केसरी टिळक हीं नांवें उघड न घेतां । सरसकट सर्वांवर आरोप केला होता । या खुनावरुन राजद्रोहाचा पुरता । कांहीं विचार ना करतां ॥ राजकीय चळवळरूपि निखारे घोर । टिळक हे पसरिती खास पुणें शहरावर । तरि राजनिष्ठ लोकांनीं बांधुनी कंबर । पाणी ओतावें त्यावर ॥ ( चाल ) इंग्रजी पत्रांनीं केली । ओरड फार याच वेळीं । म्हणती ब्राम्हणांचें बंड । पुण्यामधिं होणार अखंड ॥ मारिला अधिकारी रँड । सलामी बंडाची प्रचंड ॥ खुनाशीं टिळकांचें अंग । झाली त्रिलाश्वतीं बोंब ॥ ब्राम्हणी जात ही मोंड । चढवा फांसावर धेंड ॥ ( प. चा. ) भर पार्लमेंटामधिं प्रश्न निघाला थोर । असा राजद्रोही टिळक कौंसिलर । कौंसिलांत ठेवी मुंबई गव्हरनर । कैसा काढा बाहेर ॥ ८७ ॥ श्री० ॥

ॲंडच्या खुनानें उडालि गडबड सारी । परि टिळकांची गडबडली नाहीं स्वारी । दणदणित लेखांचा निघत होता केसरी । नाहीं डरला अंतरीं ॥ केसरींत कविता प्रसिद्ध जुबिलीवर । त्यामध्यें राणिचें अभिनंदन रीतसर । परि कडक टिका त्या नोकरशाहीवर । एका ओळी दोनचार ॥

## ॥ श्लोक ॥

" आबादानी अमुचि कथिली तुजला सेवकांनीं ।
मत्स्यालागी कुशल कथिलें वृत्त जैसें बकांनीं ॥
नाहीं द्रव्य न वस्त्र नाहिं नशिबीं आरोग्य तें आमुच्या ।
बाकीं सर्व सुखें प्रजेस अमुच्या माआज्ञमा राणिच्या ॥ "

या अंकामधील अग्रलेख महशूर । " सरकारचें डोकें आहे कां ठिकाणावर । " हा मथळा घालुन कडक टिका जोरदार । केसरिंत करी केसरीकार ॥ एखादा मोठा हत्ति पिसाळुन जातो । धुळधाण करीत जिकडे तिकडे सुटतो । त्या परीच आह्मां प्रकार सारा दिसतो । सरकारचा आज तो ॥ ( चाल ) स्वतः खून तो करणाराला । चढला नसेल परि सरकारला । इतका खून चढुनी गेला । यापरी केसरी थोर गर्जीला ॥ खुनी इसम हुडकुन काढायला । वीस हजार बक्षिस लाउनिला । पुरे जरी खुनी ब्राम्हण असला । या परी० ॥ शहरावरि जादा पोलिसला । कारण कांहीं नाहिं त्याला । जादा पोलिस जरी नेमिला । तरि गुन्हा सापडेल असला । नियम सांगवत नाहिं अह्मांला ॥ यापरी० ॥

( प. चा. ) लेखांचा असा टिळकांनिं केला भडिमार । उपसलें टिळकांवर सरकारानें हत्यार । तें कलम एकशें चांविस अ चें थार । राजद्रोहाचें घोर ॥ ८८ ॥श्री० ॥

अठराशें सत्याण्णव जुलै सत्तावीसाला । सुटलेंच पकडवारंट हो टिळकाला । आणि छापखान्याचे मॅनेजर बाळाला । मालक गोखले याला ॥ त्या दिवशिं टिळक हे मुंबईमध्यें होते । टिळकांचे स्नेही दाजि अबाजी खरे ते । यांच्याच घरीं टिळक हे उतरले होते । सरकारासी ठावें तें ॥ रात्रीचे जेवणखाण झाल्यावर त ॥ साहजीक गप्पा गोष्टी करीत होते । तों युरोपियन पोलीस अधिकारि ते । आले एकदम तेथें ॥ पोलीस अधिकाऱ्यांनीं झणीं दाखविलें । वारंट तें टिळकासी पहा त्या वेळें । पाहतांक्षणींच लोकमान्य मनिं उमजले । तेथुन तसेच ते उठले ॥ घेतला बिछाना सांगितलें हो खऱ्यासी । जाऊन विचारा त्या मॅजिस्ट्रेटासी । जामिनकी बद्दल आणि गेले झटदिशीं । आले बाहेर गाडीशीं ॥ पोलिसाबरोबर टिळक बसले गाडींत । झट कमीशनरच्या आलेच कचेरींत । ठेविलें टिळकांना माडिवरिल खोलींत । बंदोबस्तानें कुलपांत ॥ ( चाल ) मॅजिस्ट्रेटाकडे दाजिसाहेब खरे गेले । निराश होऊन माघारीं त आले ॥ त्या रात्रीला साडेअकराला कचेरींत आले । विचारीत टिळकांना येथें कोठें ठेविलें ॥ त्या टिळकांना मला भेटवा खरे म्हणू लागले । पोलिसांनिं मज्जावचि केला त्यांना त्या वेळें ॥ असेर परवानगी मिळाली खोलिकडे गेले । आंत टिळक निर्धास्तपणानें होते

झोंपले । ढोढाचोनी दार खऱ्यांनीं त्यांना उठवीले । सांगितलें ऐकुनी टिळक त त्यांना बोलले ॥ सुचेल तुम्हां तेंचि करावें आंतुन सांगितलें । निरोप देउन खऱ्यास खुशाल तेथें झोंपले ॥ ( प. चा. ) सुख दुःख मानुनी समान या भूवर । कर्मवीर करिती राष्ट्राचा संसार । हें तत्व टिळकांनिं दाखविलें करून खरं । ठावें लोकांना सारं ॥ ८९ ॥ श्री० ॥

ते न्यायमूर्ति पार्सन्स आणि रानडे । न्यायासनावर असतां त्यांच्या पुढें । जामीनापुरता अपिल अर्ज तो झाला । त्यांनीं नामंजुर केला ॥ पुढें सेशन कमीट खटला झाल्यावर । न्यायमूर्ति बद्रुद्दिन तय्यबजि समोर । जामीन अर्ज हो करीत कीं दावर । तेव्हां चे बॅरिस्टर ॥ दावरनी केली थोडि फार तक्रार । तों न्यायमूर्तींनीं अर्ज केला मंजूर । जामीन दोन पंचवीस पंचवीस हजार । जात मुचलका पन्नास हजार ॥ कोर्टांत आणि त्या कोर्टाच्या बाहेर । माणसें हजारों जमलीं होतीं फार । मोकळे टिळक पाहुनी जामिनावर । झाला मोठा जयजयकार ॥ श्रीमंत अण्णासाहेब नेने आणी । द्वारकादास धरमसी शेटजी यांणीं । कोर्टांत रकमा भरल्या हो आणोनी । तावडतोब दोघांनीं ॥ या वेळिं मुसलमान लोक म्हणति जोरानें । टिळकांचा रानडे जातभाई बामण । परि नाहिं सोडिलें टिळकांना घाबरुन । ऐसें म्हणति मुसलमान ॥ परि बद्रुद्दिन तय्यबाजि गडी खंबीर । आमुचा मुसलमान टिळकांना सोडी र । रानडे आणि तय्यबजी या दोघांची । तुलना करिती धैर्याची ॥ ( चाल ) जामिनावरी सुटुनिया

टिळक घरिं आले ॥ खटल्याच्या खर्चाच्या तयारिस लागले । हा सार्वजनीकाचि खटला राष्ट्राला पटलें ॥ राष्ट्रानें डिफन्स फंड काढिता झालें ॥ फंडास भराभर पैसे येऊं लागले ॥ बंगालचे सिंह सुरेंद्र-बाबू उठले ॥ बंगालच्या तर्फें त्यांनीं जाहिर केलें ॥ बंगालच्या खर्चानें बॅरिस्टर चांगले ॥ गार्थ आणि प्यू समजा हो तिकडे आले ॥ ( प. चा. ) टिळकांच्या खटल्याकडे राष्ट्र हें सारं । त्या वेळीं बघूं लागलें हो एकंदर । या अवकाशांतचि गोष्ट एक मजेदार । घडली ऐका तींतील सार ॥ ९० ॥ श्री० ॥

रँडसाहेबांचा खुन जाहल्यावर । या घोर खुनाच्या तपास ड्युटी-वर । नेमिलेचि स्पेशल ड्यूटी आफीसर । पुण्याला ब्रुइन हुषार ॥ हे ब्रुइन गुप्त तपासाच्या कामांत । नावाजलेले डिटेक्टिव्ह विख्यात । झट पुण्यास आले मग्न झाले कामांत । आपल्या गुप्त तपासांत ॥ टिळकांना असले खुन होणं ही गोष्ट । असणार नाहीं केव्हांही ती इष्ट । त्या ब्रुइन साहेबांचें मन त्यांना स्पष्ट । सांगत होतें अटाकाट ॥ आणीक लागला नाहिं तपास खुनाचा । तर पुण्यास होईल अधिक त्रास सरकारचा । जाणुन होईल उपयोगचि टिळ-कांचा । तपास कामीं हो साचा ॥ मुक्कामचि होता पुण्यामधीं टिळकांचा । त्या अवधित त्यांच्याकडे जाण्यायेण्याचा । उपक्रम सुरू जाहला ब्रुइनसाहेबांचा । साधारणपणें रोजचा ॥ ( चाल ) बैठकीस दोघांच्या गप्पा होत होत्या वेळेला ॥ कांहिं उघड कांहिं गुप्त अशा-परि करिती हो चर्चेला ॥ ब्रुइन साहेब मतलब संभाळून करिति

गोष्टीला ॥ जशासी तसे टिळक वागले नकोच सांगायाला ॥ खुना-विषयिंची बातमि कांहीं हवी होति ब्रुइनला ॥ खटल्याविषयीं बातमि कांहीं हवी होति टिळकाला ॥ ठकास भेटे महा ठक मग काय उगे मौनेला ॥ ( चाल ) होना होना एका दिवसाला । विचारीं ब्रुईन हो टिळकाला । तुम्हि अणाल जर ध्यानाला । गुन्ह्याच्या तपासाच्या कामाला ॥ तर तुमचि मदत आम्हाला । होइल खास ब्रुइन बोलला ॥ या वरी टिळक बोलले सडेतोड उत्तर हो साहेबाला ! मजकडुन मदत तुम्हाला । होइल वाटत नाहीं मला ॥ माहिती खुनाची मला । येउन कोण देणार बोला ॥ पण तुम्हीं खुण गांठीला । बांधुन ठेवा एका गोष्टीला ॥ कळलेंच चुकुन जरि मला नाहिं सांगणार तें तुम्हांला ॥ शिक्षाच गुन्हेगाराला । व्हावी कबूल आहे मला ॥ तरि गुप्त हेर कर्माला । म्हणजे विश्वासघाताला । करणार नाहिं कधिं काळां । तुमचें काम तुम्ही संभाळा ॥ यापरी टिळक बोलले सडेतोड उत्तर हो साहेबाला ॥ ( प. चा. ) ने टिळक ब्रुइनला शेराला सवाशेर । चालली नाहिं टिळकावर ब्रुइनचि तार । असुं खटला सुरू जाहला आठ सप्टेंबर । स्ट्रॅची साहेबाम्होर ॥ ९१ ॥ श्री० ॥

युरुपियन ज्युरी पार्शि एक दोन दक्षिणी आणि । इंग्रज पांच असे नऊ पंच निवडोनी । टिळकांचा खटला सुरू झाला लोकांनीं । गेलें कोर्ट गजबजुनी ॥ कोर्टांत चालला आठ दिवस हा खटला । पाडला कीस शब्दांचा त्या वेळेला । व्याकरणासहित शब्द अर्थ भाषला । आली भरती वादाला ॥ टिळकांचीं भाषणें किंवा लेख मरा-

टींत । पण मराठी भाषा जाणणारे ज्यूरींत । होतेच अवघे दोनच बाकी सात । यांची भाषांतरी भिन्न ॥ हें भाषांतर तरि बरोबर कठं होतं । तें वादग्रस्तर्ची मुद्याच्या गोष्टींत । हें न्यायमूर्तिनिंच कबूल केलें होतं । नव्हे कांहि पदरचें यांत ॥ स्ट्रॅचीनीं एकशें चोविस अ कलमाचा । शिक्षेच्या निकालाच्याच अनुरोधाचा । ओढून ताणून अर्थचि केला त्याचा । राजद्रोही कायद्याचा ॥ ( चाल ) त साक्षि पुरावे गमतीचे जाहले ॥ वर्णितांच होतिल पोवाडे वेगळे ॥ टिळकांचा खटला पुस्तक वाचा झालें ॥ थोडेंच सांगतों टिळकांना त्या वेळें ॥ दीड वर्ष सक्त मजुरिची शिक्षा बोलले ॥ आणि न्यायमूर्ती स्ट्रॅची उठुनी गेले ॥ ( प. चा. ) झट तेथें पोलिस अधिकारी तयार । गाडींत बसवुन टिळकांना नेलं र । त्या तुरुंगाकडे इकडे लोक सारं । गेले कष्टी घरोघर ॥ ९२ ॥ श्री० ॥

त्या एतद्देशिय वर्तमानपत्रांनीं । या शिक्षेबद्दल निषेध केला त्यांनीं । पण अँग्लो इंडियन विलायती पत्रांनीं । झालें योग्य म्हटलें त्यांनीं ॥ कांहींनीं म्हटलें शिक्षा थोडी झाली । त्या अपील करुनी वाढवून चांगली । अशि इंग्रजि पत्रांची अक्कल पाजळली । कळली जगास त्या वेळीं ॥ टिळकांना शिक्षा झाली त्या दिवसाला । बहु इंग्रजांनीं हो मेजवान्या झोडिल्या । परि गिरणि मजुरापर्यंत सर्वांनीं केला । उपास खास त्या वेळां ॥ कित्येक कालेजांतिल विद्यार्थ्यांनीं । सुटयाच घेतल्या स्वतः आपण होउनी । कित्येक दंडाला काळिं फडकीं बांधुनी । हिंडत होते रस्त्यांनीं ॥

बहुतेक सर्वही वर्तमानपत्रांनीं । सर्व पत्रभर काळ्या रुळी घालोनी । तें मुद्रणस्वातंत्र्यानि गेलें संपोनी । ऐसें दर्शविलें त्यांनीं ॥ ( चाल ) टिळक तुरुंगामधिं गेल्यावर केसरी मराठ्याला । अति कठिण समय हा आला ॥ धनी आर्यभूषण प्रेसचे गोखले त्या वेळां । खटल्यानें घाबरून गेला ॥ छापखाना दुसरा तुम्ही पहा केसरीला । गोखले बोले विध्वंसाला ॥ ऐकतांच विध्वंस यांना विचार हो पडला । पारि जगदीश्वर पावीला ॥ रवीवार पेठेंत भिड्यांचा होता छापखाना । श्री विठ्ठल नामें जाणा ॥ भिडे यांनि केसरी मराठा दोन्ही पत्राला । छापायचा हिय्या केला ॥ ( प. चा. ) संपादक जोडी केळकर खाडिलकर । केसरी मराठा निघनि अधिक जोरदार । लोकांसहि तो टिळकांचा सुरु होणार । जाहिर करिती केळकर ॥ ९३ ॥ श्री० ॥

तुरुंगाच्या शिस्तिनें हाल झाले टिळकांचे । भाकरी पाण्यामधिं कुसकरून खायाचे । काबाडकष्ट तुरुंगामधिं सक्त करायचे । ज्याचें त्यास ठावें साचें ॥ या योगानें टिळकांचें वजन कमि झालें । तोंडास कोरड ओठ काळे पडले । बोलताहि त्यांना येईनासें झालें । येरवड्यास पाठविलें ॥ गवगवाच झाला टिळकांच्या प्रकृतिचा । देशांत बहुकडे विलायतेंतहि साचा । परिणाम कदाचित असेल झाला याचा । ऐका प्रकार गमतीचा ॥ तुरुंगाचा डॉक्टर अकस्मात हो आला । टिळकांचे पुढती उभा राहुनी वदला । हलिचें अन्न जरि मानवे न तम्हांला । पूर्वीच बोलणें अम्हांला ॥ ऐकुन टिळक तें डॉक्टरासि बोलले । तुरुंगांत माझें वजन किती कमि झालें । यावरून तुम्हांला कळाया हवें

सगळें । ऐकुन डाक्टर लाजले ॥ ( चाल ) टिळक हे या वेळीं होत । खास मुंबइच्या तुरुंगांत । तुरुंगीं प्लेग फैलावत । झाली त्या वेळीं गम्मत ॥ प्लेगाचें टोचुन घेण्यास । सारे कैदी नाखुष ॥ सुचली युक्ति डाक्टरास । येउनि विनवी टिळकांस ॥ ह्मणे तुह्मि टोचुन जरि घ्याल । तरी कैदीही घेतील ॥ विनंति डाक्टराची ऐकून । घेतलें टिळकांनीं टोचून ॥ म्हणती कैदी टिळक देव । टोचुन घेति आपण घ्यावं ॥ असा टिळकावरती भाव । सर्व कैद्यांचा होता हा ॥ किती गमतीला सांगावं । सांगतां कसं पुरं व्हावं ॥ (प. चा. ) परि येरवडयाच्या तुरुंगामधिं चाफेकर । भेटला लोकमान्यास खुनी दामोदर । तो प्रसंग ऐका सावधान व्हा क्षणभर । श्रोते सकल नारिनर ॥ ९४ ॥ श्री ० ॥

पुं डच्या खूनप्रकरणीं चौकशी झाली । दामोदर चाफेकरास शिक्षा दिधलि । फाशीची तेव्हां दामोदराची स्वारी । होती येरवड्यांत भली ॥ सांगतात कोणी येरवडयाच्या तुरुंगांत । समजले चाफेकर यांस टिळक आहेत । ह्मणुनि तो विनंति सरकारासी करीत । तेव्हां ऐका हो पुढतं ॥ टिळकांची एक-वार भेट घेउं द्या मजला । घेणार त्यांच्याकडुन लिहुन अर्जाला । ही विनंति मंजुर होऊन चाफेकर याला । सत्वर टिळ-कांकडे नेला ॥ टिळकांच्या आणि चाफेकराच्या भेटींत । निष्पन्न कांहिं झालें तर झालें गोष्टींत । हा हेतुहि असेल भेटीचे मंजुरींत । नोकरशाहीचा कदाचित् ॥ असु भेटविला टिळकास चाफेकर याला । चाफेकर यांचे ह्मणण्याप्रमाणें लिहिला । टिळकांनीं त्याचा अपिल

अर्ज हो सगळा । नाहीं उपयोगीं पडला ॥ आणखी फाशिच्या आधीं कांहीं दिवस । भेटवा म्हणाला मजला हो टिळकास । शेवटची इच्छा म्हणून दामोदरास । नेले भेटविलें टिळकांस ॥ ( चाल ) फाशि जाणारा, त्या दामोदरा टिळकांकडे नेला । पाहुनांचि टिळकांच्या मूर्तिला नमस्कार केला ॥ हात जोडुनि हर्दि गहिंवरुनी उभाच राहीला । टिळकांसी बघुनी दामोदर ढाळित अश्रूला ॥ कांहिं वेळानीं गुडघे टेकुनी दामोदर बसला । अंतकाळिं तव प्रसाद म्हणुनी द्यावी गीतेला ॥ फासावरुनी मला उतरता माझे प्रेताला । मलत्यांनीं लावुं नये अशी पुरवा हेतुला ॥ ( चाल ) अधिकाऱ्याची मंजुरी घेउनी । दिली गिता त्यास टिळकांनीं ॥ दामोदरपंत चाफेकरांनीं । हातांत गीता घेवोनी ॥ फासावरी गेले हो चढुनी ॥ श्रीकृष्णनाममनिं जपुनी ॥ ( प. चा. ) कर्मधर्मसंयोगानें टिळकांचे म्होर । विध्वंस धोंडोपंत दिसल्यावर । टिळकांनिं करविली त्यांचेकडुन एकंदर । त्या प्रेताचि व्यवस्था र ॥ ९५ ॥ श्री० ॥

असु टिळकांना त्या येरवड्याच्या तुरुंगांत । जेवण्यास मिळुं लागला दूध आणि भात । काबाडकष्ट कामि करून रंगकामांत । घातलें टिळकांना तेथं ॥ परवाना मिळतां पायिं घालण्या जोडा । टिळकांनिं आणविला लाल भडक तांबडा । परि अधिकाऱ्यानें रंग फासुनी काळा । स्वाधिन टिळकांच्या केला ॥ लागतां खुनाचा तपास सरकाराला । मग रागहि टिळकावरील तो कमि झाला । इंग्रजी पत्रेंही सुचवीतीं सरकाराला । सोडा म्हणुनी टिळकाला ॥

घातल्या अटी हो सरकारानें दोन । टिळकांच्या सुटकेनंतर हो टिळकांन । सत्कारसमारंभांत भाग ना घणं । केली टिळकांनीं मान्य ॥ पण राजकारणामधिं मुळिं न पडण्याची । हीच दुष्ट अट मान्य नव्हति टिळकांसी । या खटाघाटिंत ब्रुईन सरकारपक्षी । खरे ते टिळकपक्षासी ॥ ( चाल ) या कामिं ब्रुइनसाहेबांनीं. बघितली करुनी, खुबी त्या वेळां । परि गेलि ब्रुईनचीं बोटं, त्याच्याच डोक्यांत, एका गोष्टीला ॥ एके दिवशिं याच कामांत, ब्रुइन घाइघाइंत, टिळकांकडे आला । रितिप्रमाणें कुशल बोलणं, टिळकांसीं केलं, तया समयाला ॥ बोलतां बोलतां हळुंच, कागदाचि कोरा, टिळकांपुढं केला । कोऱ्याच कागदावरी, सहि करा तुम्ही, साहेब बोलला ॥ मी तुमच्या अटी जुळवितों, मुक्तता करितों, तुमची या वेळां । सहि करा खुशाल तुम्हि चला, गाडितुन माझ्या, तुमच्या घराला ॥ मी स्वतः बरोबर येतों, खास पोंचवितों, घरीं तुम्हांला । अशि ब्रुइन करी चपळाई, परी टिळकांनिं डाव वळखीला ॥ ( चाल ) परि टिळक नव्हते झुकणारे या झुकांडीला ॥ ब्रुइनची गाडि आणि टिळकांचें घर टिळकाला ॥ ठाऊक नव्हतं असं नव्हतं हो त्या वेळां ॥ नको तसदि कशाला टिळक बोलले साहेबाला ॥ दिला कोरा कागद साहेबा । साहेबाला ॥ ( चाल ) टिळक खरे या दोघांनीं अट एक नवी सुचविली ॥ आतांचे सुटकेनें शिक्षा सहा महिने उरलेली ॥ पुन्हा राजद्रोहाचा खटला होऊन शिक्षा झाली ॥ ही शिक्षा भोगून पुरी टिळकांनीं द्यावि त्या वेळीं ॥ ( प. चा. ) या अटीवर टिळकांस सोडि

सरकार । तारीख सहा सप्टेंबर मंगळवार । रात्रीचे साडे दहा वाजतां सुमार । आले टिळक घरीं अखेर ॥ ९६ ॥ श्री० ॥

वार्तमी पसरली चहुंकडे सुटकेची । अभिनंदनपर पत्रांची आणि तारांची । जणु वृष्टिच झाली निमंत्रणें लोकांचीं । आलीं फार दर्शनाचीं ॥ टिळकांचें दर्शना लोक हजारों आले । त्या पुण्यांत दीपोत्साह अनेक जहाले । लोकांना पेढे नवसाचे वाटले । अंबर जयकारें भरलें ॥ ( चाल ) पुढें सिंहगडावरी गेले । सहा महिने तिथें राहीले ॥ परतून पुण्याला आले ॥ देशकार्य आरंभीलें ॥ गंडांतर परि हो आलें । द्रविडाचे खूनचि झाले ॥ पुण्यांत वावटळ उठलें । धरपकड काम सुरु झालें ॥ ( चाल ) हीच संधि घावली भली त्या इंग्रजी पत्रांला । ओरडा त्यांनिं हो केला ॥ विलायतेंतिल ग्लोब पत्रानें पत्रामधिं लिहिला । मजकूर धरून टिळकाला ॥ मुंबई इलाख्यांत खात्रिनें राजद्रोहाचें । जाळेंच कटवाल्यांचें ॥ टिळक पुढारी ब्राह्मण खास या कटवालयांचा । बीमोड करा टिळकांचा ॥ धरित्रीवरी पुनः मराठी राज्य स्थापण्याची । इच्छा ती ब्राह्मण यांची ॥ गोडबोल्या ब्राह्मणावरि तुम्ही नका ठेवूं विश्वास । ठेवाव नजर परि खास ॥ हाच उतारा मुंबई टाइम्सामध्यें आला । चहुंकडे गलवला झाला ॥ ( प. न्वा. ) टिळकांनिं ठोकली दोनी पत्रावर । फिर्याद माफि मागली होउन लाचार । पन्नास पौंडांचा दंड ग्लोबानें हजर । केला टिळक पायावर ॥ ९७ ॥ श्री ० ॥

अनुक्रम (९९) २०२८२ 
क्रमांक ....७३२८   ३०५ २०१७

पुनश्च हरिः ॐ म्हणुन टिळकांनीं । केसरी घेतला पुनः हातिं धैर्यानीं । अठराशें नव्याण्णव जुलै चारचे दिनीं । केसरी फडके जोरानीं ॥ केसरीवरी लोकांनीं प्रेम दाखविलें । आभार केसरिंत सर्वांचे मानियले । देशाचें कार्य हातिं पुनः घेतलें । दुप्पट जोरानें चालें ॥ दुष्काळ प्लेगाचे कहर पुनः सुरु झाले । जनसमाज कल्याणार्थ टिळक ते झटले । बहु जंगी सभा भरवून लोकमत सगळें । सरकारासी कळवीलें ॥ मध्यंतरिं राष्ट्रिय सभा झाल्या वेळेला । राष्ट्राचें आलें निमंत्रण टिळकाला । लोकमान्य गेले होते लाहोराला । त्यापरि त्या मद्रासेला ॥ ( चाल ) पाहुनी लोक टिळकांना । धन्यवाद देती त्यांना ॥ आयुष्य आमुचें यांना । दे ऐसें विनविती देवांना ॥ मानपत्रें तीं टिळकांना । जनतेनं दिधलीं तेव्हां ॥ वाटलें प्रेम लोकांला । चरफड नोकरशाहीला ॥ ( प. चा. ) तों प्रकरण ताई महाराजांचें थोर । येवोन राहिलें पुढतीं संकट घोर । सत्याचा वाली परि तो परमेश्वर । ऐका थोडा प्रकार ॥ ९८ ॥ ॥ श्री० ॥

श्रीमंत बाबामहाराज नांवाचे । स्नेही ते जिवलग होते हो टिळकांचे । त्या महाराजांनीं मृत्युपत्र स्वतःचें । केलें मरणसमयिं साचें ॥ त्या समयीं इस्टेटीचे पंच थोर । खापर्डे कुंभोजकर नागपुरकर । यापरी पंच टिळकही होते खरोखर । निस्वार्थी बाणेदार ॥ पुढें अंत झाल्यावर बाबा महाराजांचा । मग मृत्युपत्राचे प्रमाणें कोणी दुरचा । औरंगाबादिचा भाऊचंद घराण्याचा । दत्तक मुलगा घ्यायाचा ॥ त्याप्रमाणें बाबामहाराजांच्या पत्नी । श्रीमती

ताइमहाराज मंडळी आणी । खापर्डे टिळक आदिकरुनि सर्वांनीं । केलें कूच पुण्याहुनी ॥ औरंगाबादीं सर्व मिळुनिया गेले । तें यथाविधी हा दत्तविधानाचि झालें । श्री जगन्नाथमहाराज नांव ठेवीलें । आले पुण्यास मग झालें ॥ ( चाल ) परि कोल्हापुरच्या बाळामहाराजाला ॥ दत्तक घेण्याचा मनसुबा सुरु झाला ॥ अनुकूल ताई महाराज हो याला ॥ त्या दत्तविधानाचाहि दिवस तो ठरला ॥ कळतांचि टिळकांनीं बेत हाणुन पाडीला ॥ ठोकलें कुलुप टिळकांनीं त्या वाड्याला ॥ ( चाल ) ज्यांच्या सल्लयानें ही बाई अशापरि वागली ॥ त्यांच्याच प्रेरणेनें बाई पुढेंहि सरसावली ॥ जज्ज पुण्याचे ॲस्टन साहेब यांचेकडे ती गेली ॥ जाउन बाई साहेबाला विनवुन हो बोलली ॥ टिळकांनीं निवडीला मुलगा पसंत नाहिं मुळीं ॥ पंचांनीं केलली व्यवस्था रद्द व्हावी या वेळीं ॥ टिळक दुराग्रहि साहेबाविण नाहिं कोणि मज वाली ॥ अशी बाईनीं साहेबापढें रडकथाच गाईली ॥ ( प. चा. ) कोर्टांत बाईनीं दावा लावल्यावर । खोटि साक्ष दस्तहि खोटा एकंदर । आरोप ठेविले लोकमान्य टिळकांवर । केली फौजदारि त्यांवर ॥ ९९ ॥ ॥ श्री० ॥

या प्रकरणिंची ताइमहाराजांना । कोंडून ठेविलें टिळकांनीं हो त्यांना । वाईट हेतुनें वगैरे गोष्टी नाना । यांनाचि उद्भवल्या तेव्हां ॥ क्लेमंट्स नांवाच्या त्या मॅजिस्ट्रेटांनीं । खटल्यांत टिळकांना पूर्ण दोषी ठरवोनी । दिलि शिक्षा अठरा महिने सक्तमजुरी । आणी हजार दंड वरी ॥ या शिक्षेनें चहूंकडे देश गडबडला । हे न्यायाचे

२८५२

धिंडवडे लोक बोलला । राजकिय मत्राळे सर्वांहि प्रतिपक्षाला । वाटे वाईट त्या वेळा ॥ ते टिळकांचे गोविंद काका यांना । कळतांच खिळले दुःखानें अंथरुणा ॥ बहु हाय हाय करितची अखेर तयांना । आलें मरण काकांना ॥ ( चाल ) डिस्ट्रिक्ट जज्ज ल्यूकस यापुढें लगबगिनें । अपील केलें टिळकांनीं हो धैर्यानें ॥ टिळकांविरुद्ध कुणि तरि काहुर उठवीले । ल्यूकसला लागली वदंता त्या वेळें ॥ दोष-मुक्त नच करितां शिक्षा बारा महिने केली कमी । दंड हजाराचे कायम केला या कामीं ॥ निकाल ऐसा झाल्यावरती टिळकांना । हातीं बेड्या घालुनि नेलें हो त्यांना ॥ असभ्य हलकट खुनी टिळक हें नाहित ठावें दुनियेला । काय म्हणुनि घालाव्या बेड्या ऐशाला ॥ टिळकांचा अपमान करायची हौसच नोकरशाहीला । भागवून घेतली हौसची संधीला ॥ ( प. चा. ) तपासणी अर्ज हायकोर्टा-कडे केल्यावर । पारडेंच अन्यायाचें गेलें वर । दोषमुक्त ठरुनी टिळक आले बाहेर । पाठीराखा ईश्वर ॥ १०० ॥ ॥ श्री० ॥

या खटल्यापायीं रुपये तीस हजार । लागला खर्च टिळकासी एकंदर । तें शरीर मन त्रासून गेली फार । ज्याचा तो सोशी हा भार ॥ या खटल्यामधील गुंतागुंती पाहोनी । टिळकांच्या कांहीं हितचिंतक मित्रांनीं । टिळकांसी केला बोध प्रेमभावांनीं । केवळ सहानुभूतींनीं ॥ (चाल) घेवोनि विकत आखाडा । तर्पण करित बैसला । बोलती स्नेहभावानें सर्व टिळकाला ॥ जाउं द्या ताईबाईला । जाउं द्याच एस्टेटीला । बोलती स्नेहभावानें सर्व टिळकाला ॥ उत्तर असा

मित्राला । टिळकांनिं दिलें त्या वेळां । ऐकाया चतुर श्रोते हो द्यावें ध्यानाला ॥ ( चाल ) बाबा महाराजांचा म्हणवुन मित्राचे विश्वासाचा । अंतकालिं मीं हात दिला ज्या घात कसा करु त्यांचा ॥ वाहवा धन्य धन्य टिळकांचा । महिमा थोर किती साचा ॥ मित्राला जें वचन दिलें तें खरें करून दावायचा । बाणा हा माझा टिळकाचा नाहिं ढळायाचा ॥ वाहवा धन्य धन्य टिळकांचा महिमा० ॥ विश्वासघातकीं निंद्य बोल हा घेउनि जगताचा । जगांत वावरण्याहुन बरवा मार्ग मरणाचा ॥ वाहवा धन्य धन्य० ॥ या खटल्यामधिं मृत्यु येइ तरि येऊं एकदांचा । कीर्तिपुढें तुच्छ हा देह मज कधिंतरि जायाचा ॥ वाहवा धन्य धन्य० ॥ ( प. चा. ) या खटल्यानें टिळकाचें तेज फार । वाढलें चहुंकडे तळपति जणु भास्कर । जगतांत टिळक टिळक हा ध्वनि अनिवार । झाला त्यास अंत ना पार ॥ १०१ ॥ श्री० ॥

टिळकांच्या वाढत्या अशा किर्तिबरोबर । त्या केसरिचा खप वाढलाच हो फार । एकोणिसशें दोनिला झाला पंधरा हजार । वाढला केसरिचा आकार ॥ यासाठीं यंत्रें विलायतेहुन आणिलीं । तीं आर्यभूषणचे जाग्यांत उभीं केलीं । रक्कम बारा हजारांची लागली । झाली सोय फार चांगली ॥ मग गायकवाडांचा वाडा खरेदी केला । तिथं फाउंडरी आणि छापखानाही नेला । केसरी नांव ठेविलें छापखान्याला । खाडिलकर एडिटरिला ॥ मग तात्यासाहेब केळकरांचे हातीं । केसरिचीं सूत्रें आलिं विजयशालीं तीं । राखली बाणि टिळकांचि आजपावतर ती । गाजे चहूंकडे कीर्ती ॥ एकोणिसशें तीनचे

युगामधिं टिळकांचा । विश्वनाथ नामें वडील मुलगा त्यांचा । झालाच अंत हा कहर हो दुःखाचा । झाला टिळकांना साचा ॥ वृद्धापकाळिं हा आपल्यामार्गे अपुला । चालवील केसरि करिल देशसेवेला । देशभक्त म्हणवुनि गाजवील नांवाला । आशा होती टिळकाला ॥ (चाल) हीं सर्व संकटें घरचीं । परि काळजीच देशाची ॥ थोरवी लोकमान्यांची । यांतच होति हो साची ॥ आर्यभूत निःस्वार्थाची । मूर्ति ही लोकमान्यांची ॥ चातुर्य धैर्य विद्येची । मूर्ति ही० ॥ प्रवृत्ती निवृत्तीची । मूर्ति ही० ॥ सात्वीक सदाचरणाची । मूर्ति ही० ॥ पूर्णशा देशभक्तीची । मूर्ति ही० ॥ ही कीर्ति यशबल यांची । मूर्ति ही० ॥ ( प. चा. ) वर्णावें तितुकें सर्व थोडें होणार । वर्णितां उरेना भान जाग्यावर । देशभक्त ऐसा नाहिंच हो आजवर । झाला क्वचित् पुढें होणार ॥ १०२ ॥ श्री० ॥

टिळकांच्या देशकार्याचा सूर्य प्रखर । यापुढें येइ मध्यान्हिस डोईवर । आपलेपणाचा अज्ञानांधःकार । गेला निघोन हो पार॥ देशाच्या हिताचा विचार तो करण्याला । दरवर्षि होतसे राष्ट्रसभा सोहाळा । विद्वान पुढारी याचा मोठा मेळा । जमे त्या राष्ट्रीय सभेला॥ परि गोखले मेथा रानडे आदि मवाळ । यांच्याच हातीं राष्ट्रसभेची कळ । बहु मंदगतीनें राजकीय चळवळ । चालत होती त्या वेळां ॥ राष्ट्रीय सभेच्या एकंदर कार्याला । जर दिलें असेलचि कोणि योग्य वळणाला । तर लोकमान्य टिळकांनिंच या म्हणण्याला । पुरावा इतिहास सगळा ॥ राष्ट्रीय सभेमधिं राजकीय चळवळिची । ती लाट

उसळविली टिळकांनिंच हो साची । यासही मिळाली खरी मदत सरकारची । बंगालचे फाळणीची ( चाल ) इंग्रजी ग्रंथवाचन आणि शिक्षण ॥ बंगाल जागा झाला सारा यानं ॥ त्यांतच टिळकांनिं केलेल्या चळवळिनं ॥ टिळकांचें देशापायीं तुरुंगांत जाणं ॥ या गोष्टींचा बंगाल्यावरि परिणाम ॥ स्वातंत्र्य कल्पना आलि खुप जोरानं ॥ बंगालि तरुण पिढि हलुन गेलि चळवळिनं ॥ ( प. चा. ) यांतची पडे कर्झनशाहिची भर । जणुं प्रचंड होमाग्नींत तुपाची धार । तो कथाभाग या पुढेंच कीं येणार । सारांशानें मी देणार ॥ १०३ ॥ श्री० ॥

ही बंगाल्याची परिस्थिति ओळखुनी । शक्कल काढिली कर्झनसाहेबांनीं । तें फोडा आणि झोडा या मार्गांनीं । हाणिलें राज्यशकट त्यांनीं ॥ बंगाल आहे फारच मोठा प्रांत । एकच गव्हर्नर एवढ्या इलाख्यावरतं । यामुळें राज्यकारभार नाहीं होत । सुखसोईच्या शिस्तींत ॥ बंगालप्रांतभर राज्यकारभाराचें । सुरळीत यंत्र चालोनी सर्व प्रजेचें । कल्याण व्हावें म्हणून बंगाल्याचे । करणें दोन भाग साचे ॥ त्यापैकिं एक तो भाग मुसलमानांचा । उरलेला दुसरा बंगाली हिंदूंचा । यापरी मार्ग काढिला भेदनीतीचा । दिसण्याला कल्याणाचा ॥ परि कर्झनसाहेबांच्या या युक्तीला । ओळखुनी बंगाल्यानें गलबला केला । बंगालची फाळणी नको नको आम्हांला । सारा देश ओरडला ॥ ( चाल ) बंगाल हवालदिल झाला ॥ असंतोषवणवाज्वाला ॥ देशास लागे आग चहुभागाला ॥ जें दुःख बंगाल्याचें । तें सर्व या देशाचें । गर्जे पुढारी टिळक त्या वेळेला ॥ केसरींत

लिहिलें लेख । भरविल्या सभाहि अनेक । जाहीर केलें लोकमन सरकारला ॥ हजारों सह्यांचा गेला । अर्जही पार्लमेंटाला । परी कर्झनानीं वंगभंग केला ॥ ( प. चा. ) टिळकांनीं सुरु केलेला स्वदेशि बहिष्कार । रंगाला चढला कर्झनशाहीनें फार । एकोणिसशें सहाच्या राष्ट्रिय सभेंत सार । ठराव झालेचि पसार ॥ १०४ ॥

अरविंद घोष आणखी पाल बाबूजी । ते सुरेंद्रनाथ बंगालचे बानर्जी । इत्यादि पुढारि बंगाल्यांतील गाजी । मानित होते टिळकांजी ॥ तें वंदेमातरम् पत्रचि अरविंदांचें । त्यापरीच न्यू इंडिया पालबाबूंचें । आणखीहि तिसरें सुरेंद्रनाथ यांचें । बंगाली या नांवाचें॥ या पत्रद्वारें टिळकांच्या चळवळिचें । योग्य तें महत्वचि लोकां शिकवा-याचें । हें काम सर्वथा स्वदेशकल्याणाचें। चालें फारच जोराचें ॥ त्या पूर्ण स्वदेशी बहिष्कार चळवळिनीं । परदेशीं कापड जळलें होळ्यां-मधुनी । परदेशी साखर सोडलीच केकांनीं । स्वदेशीं संघ स्थापोनी ॥ राष्ट्रीय सभेमधिं ठराव पास झाले । अमलांत यापरी टिळकांनीं आणियलें । यामुळें टिळक प्रतिपक्षि भिऊं लागले । कांहीं सुचेनासें झालें ॥ ( चाल ) लोकमान्य टिळकांच्या शब्दावरी देश झुडला ॥ राष्ट्रीय सभा जाईल हातिंचि भीतीच मवाळाला ॥ मवाळ कंपुत्रा खलबतखाना तेव्हां सुरू जाहला । टिळकांसी नच खरें लोकमत पुकाराच हो केला ॥ परि पुकाऱ्यानेंच लोकमत अधिक मिळे टिळकांला॥ मवाळांच्या त्या काल्हेकुईला देश मात्र हांसला ॥ स्वार्थ साधुनी राष्ट्रप्रपंचचि मवाळांनीं त्या केला ॥ तळहातावरि शिर घउ-

निया टिळक पुढें जाहला ॥ नोकरशाहिस जपुन देशहित मवाळांनिं त्या केलें ॥ परि टिळकांनीं देशासाठीं तिलाच धिःकारिलें ॥ ( प चा. ) अस्तु राष्ट्रसभा आपुल्या हातुनी दूर । टिळकांचे हातीं जाव्वि न ह्मणुनी फार । ते प्रयत्न कले मवाळांनिं अनिवार । फसले सुरतेला पार ॥ १०५ ॥ श्री० ॥

सुरतेची राष्ट्रिय सभा फार नांवाजली । थोडक्यांत देतों तिची माहिती सगळी । सुरतेस जन्मला जहालपक्ष त्या काळीं । एकोणिसशें सात सालीं ॥ राष्ट्रीय सभेचें एकवीस वर्षांचें । धोरण तें नव्हनें कांहीं निश्चित साचें । जणु वार्षिक उत्सव दरबारी थाटाचे । एसें घडें आजवरिचें ॥ ही गोष्ट नाहीं रुचलि खास टिळकांना । बनविलें लोकमत उपदेशोनी त्यांना । केसरींत लेखावरी लेख ते नाना । शेंकडों जाहीर सभांना ॥ एकोणीसशें साहाच्या राष्ट्रीय सभेकरितां । बंगालच्या पाल बाबूंचा हेतू होता । अध्यक्ष करुनि टिळकांसी राष्ट्रिय सभा । करावी जिवंत झडकरि गा ॥ पण मवाळांनिं त्या डाव करून मोडाले । अध्यक्षपदावरि दादाभाई बसविलें । परि दादांनीं लोकमतासी पाहिलें । त्यांनीं स्वराज्य उच्चारिलें ॥ राष्ट्रीय सभेनें साध्य ( क्रीड ) स्वराज्यचि ठरलें । साधनें स्वदेशी बहिष्कार आणि भलें । तें राष्ट्रिय शिक्षण ठराव करून घेतले । पास टिळकांनीं सगळे ॥ पण मवाळासि हें बरें नाहिं वाटलें । हे टिळक नव्या पक्षाचे पुढें सरसावले । राष्ट्रीय सभा हातांत घेउं लागले । संकट मवाळांसि पडलें ॥ ( चाल ) राष्ट्रीय सभा टिळकांच्या हातिं जर गेली॥

तर मवाळांची किंमत काय राहिली ॥ मवाळांनिं जारिनें खटपट सुरु हो केली ॥ एकोणीसशें सातची सभा नागपुरिं ठरली ॥ तिथं टिळक पक्षाची सरशि होणार सगळी ॥ म्हणुनीच मवाळांनिं सभा सुरतेला आणिली ॥ ( प. चा. ) यानेंच खवळला लोकमताचा सागर । देशांत उडाली खळबळ ती एकंदर । पुढं सुरतेला राष्ट्रीय सभेमधिं कहर । उडाली दंगल हो फार ॥ १०६ ॥ श्री० ॥

त्या लोकमनाला धाब्यावर बसवून । फेरोजशहा गोखले मेथा हे कोण । नेणार सभा सुरतेस अरेरावीनं । बोले देश खवळून ॥ मवाळांनिं निवडले राषबिहारी घोष । निवडले नागपुरकरांनिं हो टिळकांस । टिळकांनिं निवडीले पंचाबचे सिंहास । लाला लजपतरायास । परि नकोच कांहिं पक्षभेद देशांत । म्हणुनीच लालाजी ते हो नाकारीत । सुरतेला जमले पुढारी ऐशा स्थितिंत । जो तो साशंक वृत्तींत ॥ अरविंद घोष आणि लोकमान्य टिळकांनीं । राष्ट्रीय सभेच्या अगोदर दोघांनीं । ती सभा पाचशें प्रतिनिधींची भरवोनी । केलें भाषण जोरानीं ॥ राष्ट्रीय शिक्षण स्वराज्य आणि बहिष्कार । आणखी स्वदेशी चतुःसूत्रीचो माघार । जर मवाळांनिं घेतला तर आह्मी करणार । निषेध सभेंत धडकविणार ॥ टिळकांनिं बजावुन सांगितलें त्या काळीं । अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या वेळीं । ते खास लोकमत हरकत घेइल समुळीं । वेळीं इषारत केली ॥ टिळकांनीं आणखी बजावून सांगितलें । कीं स्वराज्याच्या ठरावांत शब्द बदलीले । गोखल्यांनीं कां लोकमता बसवीलें । धाब्यावरती हो

सगळें ॥ तो स्वराज्याचा हा ठराव बदलणार कोण । गोखले एकटे मिरविति शहाणपण । असा टिळकपक्ष बोलला हो चवताळून । दोनी पक्ष गेले खवळून ॥ (चाल) अरविंद बाबु खापर्डे, वगैरे फर्डे पुढारी जाडे, संगें घेतले । ते टिळक तडजोडिस गेले ॥ गेले जी ॥ ते सुरेंद्रनाथापुढें, बोलले खडे, टिळक त्या वेळें । मवाळांनिं काय मांडीले ॥ मांडिले जी ॥ जर ठरावाच्या भाषेंत, कांहिं कमजास्त, मवाळांनिं केलें । तर खाल गाते झाले ॥ झाले जी ॥ अध्यक्ष लोकांच्या मतें, लालाजी खरं, खरे ठरलेलें । सांगावं असें मग झालें ॥ झालें जी० ॥ असं कांहिं नाहिं जर घडे, लोकमत खडें, अडवणूकीला । अध्यक्ष निवडणूकीला ॥ संभाळा ॥ (प. चा.) परि मवाळांनिं हें थोर लोकमत सारं । फेटाळुन लावलें केलं आपलेंच खरं । हम करेसो कायदा लोकमताच्या म्होर । कांहें कसा चालणार ॥ १०७ ॥ ओ० ॥

तडजोड होईना कांहींही केल्यानं । जनसमाज गेला अत्यंतचि खवळून । राष्ट्रीय सभा सुरतची पार पडणं । म्हणती कठीण हां कठिण ॥ अध्यक्ष निवडणूकीच्या ठरावावर । भाषण सुरू असतांच टिळकांनीं तर । मागितली आज्ञा शब्द बोलाया चार । नाहीं कोणि एकलं र ॥ अध्यक्ष निवडणुक हाती न होती तोंच । तो लोकमताचा पुढारि टिळक तसाच । सरसावुनि गाठें ठाणें व्यासपिठावं । केले यत्न बोलायाच ॥ टिळकांच्या अंगावरति अरेरावीनं । ते राषबिहारी ओरडले रागानं । बेशिस्त म्हणती चला निघा येथून । तुम्हां नो परमीशन ॥ टिळकांनीं तेव्हां चोख उत्तर दिधलें । अध्यक्ष तुम्हांला

अजुन नाहिं निवडीलें । अधिकार तुम्हाला अध्यक्षाचे कुठले । नाहिंत मुळिंच अजुन कसले ॥ (चाल) मग टिळक गर्जना करी, जणु केसरी, नाद गडगडला । कडकडाट झाला जणुं, विजेचा म्हणूं काय गगनाला ॥ हलणार नाहिं जाग्याचा, कोण यायाचा, येउंद्या त्याला । बोलणार लोकमत खरं, ऐकवीणार देशबंधूला ॥ राष्ट्रीय सभा राष्ट्राची, नव्हे एकटयाची, ठावे दुनियेला । अंगेरावि कशी चालेल, लगिच मारील, राष्ट्र थपडीला ॥ जिथं लोकमताला मान, अशिच हवि जाण, सभा राष्ट्राला । नातरी कशाला फार्स, उगिच दरवर्ष, खर्च पेशाला ॥ ( चाल ) टिळकांचा पट्टा सुरू झाला ॥ अहो झा० ॥ संताप मवाळा आला ॥ अहो आ० ॥ ते म्हणूं लागले टिळकांला । टिळका० ॥ पुरे करा बसा जाग्याला ॥ परि टिळक नाहिं हालला ॥ हाल० ॥ ओरडा सुरू मग झाला ॥ अहो० ॥ हादरून सभागृह गेला ॥ अहो० ॥ हाणामारा शब्द नीघाला ॥ नीघाला० खुर्च्यांच्या फेकाफेकीला ॥ फेंकी० ॥ दंगाच दंगा झाला ॥ अहो० ॥ ( प. चा. ) राष्ट्रीय सभा सुरतेचि अशी मोडल्यावर । अहो मवाळ जहाल दोघांनीं दोन जाग्यावर । भरविल्या सभा हो तिथंच टिळकांना खरं । लोकमत मिळालं हो सारं ॥ १०८ ॥ ॥ श्री० ॥

टिळकांच्या कर्तबगारीनें कॉंग्रेस । लागली इंग्रजा स्वराज्य मागायास । निर्भीडपणानें स्वदेशहित कार्यास । लागे खास कांग्रेस ॥ जोडणी स्वदेशी चळवळित बहिष्कार । टिळकांनि ठेविली रण माजे तें यावर । ती बहिष्कार चळवळ स्वदेशिस नडणार । अप्रा-

माणिक हो ठरणार ॥ पण ज्या अर्थी परदेशामधिं कोठेंही । उत्तेजन देशी उद्योगाला पाही । देण्यासी आयातीवर जकात कांहीं । ठेविति ठाऊक सकलां ही ॥ मग हेंचि तत्व या हिंदुस्थान देशांत । सरकार लागूं कां नाहींच करीत । ह्मणुनीच उद्योगाचे उत्तेजनार्थ । आम्ही बहिष्कार योजीत ॥ आणखी राज्यकारभार हा ब्रिटिशांचा । चाललाच व्यापाराच्या अनुरोधाचा । तोंवरी स्वदेशिस जोड बहिष्काराचा । देणें योग्य तो साचा ॥ या परि लोकमान्यांचें ह्मणणें होतें । हें त्यांच्या प्रतिपक्षास रुचताचि नव्हतें । आणखी एक गोष्टची बोलणें येथें । होइल योग्य मज गमतें ॥ हल्लिंचे आपुले पुढारि जगविख्यात । भगवान महात्मा गांधीजी सांप्रत । यांनींच स्वदेशी चळवळ ती जोरांत । आणिली हिंदुस्थानांत । जो चरका काढिल अस्सल वस्त्र स्वदेशी । चरकाच साधन मुख्य त्या स्वराज्यासी । या पदविस नेली ती चळवळ स्वदेशी । आहे यथायोग्य खाशी ॥ ( चाल ) पण बहिष्कार हा पूर्वी महात्माजींना । नव्हताच मान्य हो खास तेव्हां त्यांना ॥ परदेशि त्यांतल्या त्यांत ब्रिटिश मालाला । बहिष्कार पापचि वाटे महात्माजींना ॥ द्वेषबुद्धिची दुर्गंधी बहिष्काराला । त्या वेळीं भासत होती महात्माजीला । प्रेमाची हिंसा खास बहिष्कारांत । त्या वेळीं भासत होती महात्माजींला ॥ ह्मणुनीच आजपर्यंत बहिष्काराला । अवगणिलें महात्माजींनीं दर वेळेला ॥ ( चाल ) परी लोकमान्यांचें धोरण पटे महात्माजींला । साधुत्वयें गांधीजींला ॥ दिसे महात्मा मूर्तिमंत कीं बहिष्कार पुतळा । जणु

बहिष्काराची ज्वाला ॥ लोकमान्य स्वर्गांतून देतच असतिल या वेळां । धन्यता महात्माजींला ॥ आज राजकारण जें सुत्रें थोगमोठ्याला । पूर्वींच सुत्रे टिळकांला ॥ ( प. चा. ) असु टिळकांनीं या देशीं लहान थोर । चळवळींनीं केलें राष्ट्र जागें सारं । अपुलें परकें जाणुं लागलें घर । गेली राष्ट्रनिद्रा घोर ॥ १०९ ॥ श्री० ॥

प्रांतिकसभा आणि जिल्हासभा ही दोनी । यानंतर केल्या सुरू लोकमान्यांनीं । तीं खेडींपाडीं सर्वहि झोपेंतुनी । तेव्हां उठलीं खडबडुनी ॥ त्या विभागणी कमिशन पुढिल साक्षींत । टिळकांनीं काय सांगितलें थोडक्यांत । जर सांगायाचें अचुक एका शब्दांत । स्वराज्य मागितलें तेथं ॥ मग केली चळवळ मद्यपान निषेधाची । पहिल्याच जिल्हा सभेंत चर्चा याची । जोरानें करून टिळकांनीं लोकांची । खात्री पटविली चळवळिची ॥ गोखल्यांच्या अध्यक्षतेखालिं पुर्वीं ही । यापरिचा प्रयत्न झाला होता कांहीं । पण कागदि घोडे नाचविण्यापेक्षां ही । तेव्हां कांहिं झालं नाहीं ॥ यास्तव टिळकांनीं कार्यक्रम ठरवीला । तो पिकेटिंगचा पटवीला लोकाला । गुत्यावरि जाउनिया दारूबाजाला । तेथुन परतविणें त्याला ॥ ही चर्चा जिल्हा सभेंत जेव्हां झाली । लोकांस उठावणि देण्याला त्या वेळीं । टिळकांची स्वारी सभेमधीं खणाणली । एका दोन चार ओळी ॥ ( चाल ) या आपल्या हिंदुस्थानांत पुण्यभूमिंत दारुबाजिला । किति लोक रोज बळि पडति आणा ध्यानाला ॥ सरकार इंग्रज माबाप करिंत डोळेझाक गुत्ते काढित खेडोपाडयाला । पुढं करून व्यक्तिस्वातं-

च्याच्या सांगाला ॥ मग शहाणे म्हणविणाऱ्यांनीं डोळे उघडुनी देशबंधुसी नको कां पहायला । तुम्हांवीण कोण सोडविना या वेळेला ॥ ( चाल ) आणखी टिळक बोलले । जोरानें हा त्या वेळें ॥ शरिराचि झीज सोसून । सरकारचा रोष पत्करुन ॥ सरकारची शिक्षा भोगून । जर माझ्याबरोबर कोण ॥ प्राणाचि पर्वा नच करून । जर माझ्या बरोबर कोण ॥ येईल तरी महिन्यांत । दारुविक्रि बंद पाडीन ॥ छातिला हात लावून । पुढं यावं मायेच्या पूतानं ॥ ( प. चा. ) टिळकांची बाणेदार भाषा एकल्यावर । त्या सभेंनची सरसावले तरणे बांड वीर । महाराष्ट्रपत्राचे संपादक आदिर । होते प्रमुख धुरंधर ॥ ११० ॥ श्री० ॥

या पिकेटिंगच्या स्वयंसेवकांवर । नोकरशाहिनें खटले केले भराभर । ठेवावले दंड शिक्षा कायदेशीर । दंगल झालि पुण्याभर ॥ या स्वयंसेवकां टिळक पाठराखीला । टिळकांनीं भरले किलिकांच्या दंडाला । ती पिकेटिंग चळवळ आलि रंगाला । नव्हता दम त्या टिळकाला ॥ आतांच्या प्रमाणें लोक ब्राम्हणेतर । त्या वेळीं नव्हत इतके जागुन सार । वास्तव ती चळवळ ब्राह्मणवर्गावर । होती त्या वेळीं फार ॥ आणि ब्राह्मणाविषयिं चित्पावन त्यांतून । सरकारच्या डोळ्यामध्यें राहिले खुपुन । कारण सरकारी दारूचें उत्पन्न । झालें कमी चळवळीनं ॥ आजकाल सर्वहि जातिंत थोडे फार । चळवळींत पडले असती एकंदर । त्यांतुन आज अबकारी खातें सार ॥ लोकांचें हातीं पार ॥ ( चाल ) तात्पर्य पिकेटिंग पूर्वी । अवघड

आजच्याहूनी ॥ परि उत्साही तरुणांनीं । धुमधडाका केला त्यांनीं ॥ ते लवाटे पांगारकर । गोखले वकिल केळकर ॥ बापट आणि केतकर । इत्यादि तरुण खंबीर ॥ ( प. चा. ) चळवळिचा धागा गेला सर्व देशभर । तो इतीहास आपणां ठावं महशूर । या सुमारास तीं राष्ट्रिय कार्यें थोर । केलीं टिळकांनीं फार ॥ १११ ॥ श्री० ॥

टिळकांनीं राष्ट्रिय शिक्षणाची चळवळ । घेतली. हातिं एकोणिसशें आठ साल । ते विजापूरकर प्रोफेसर मिळाल । या कार्याला चांगल ॥ त्यांच्याच साह्यानें तेव्हां तळेगांवाला । सुप्रसिद्ध समर्थ विद्यालय त्या वेळां । स्थापिलें स्वतः टिळकानीं फिरुन जमविला । हजारों रुपये फंडाला ॥ यापरीच दुसरी लहान दिसावयाला । पण गोष्ट अतीशय महत्वाचि त्या वेळां । महशूर राष्ट्रमत नांवाच्या पत्राला । काढिलें दैनिक मुंबइला ॥ सध्याचें राजकारणाचे संपादक । दामले सिताराम पंत फर्डे लेखक । त्या राष्ट्रमताचे संपादक प्रमुख । फेकित लेखांची फेक ॥ ( चाल ) वरिल चळवळी टिळकांच्या देशांत चहूं भागाला । गेल्या तयांचा बोलबाला झाला ॥ गोरगरिब श्रीमंताला । लहान थोर नरनारीला । या भूवरीं तो टिळक देवचि गमला ॥ आर्यभूमि उद्धाराया टिळकरूपिं प्रभु अवतरला । दीर्घायु चिंती राष्ट्र त्या टिळकाला ॥ देश टिळकप्रेमीं बनला हीच भीति सरकाराला ; संधि शोधि टिळकासि त्या ओढायाला ॥ ( प. चा. ) तों खुदीराम बोसनें उडविला बार । बंगाल्यामध्यें गांव मुझफरपूर । झाल्याच दोन युरोपियन लेडच्या हो ठार । मिस आणि मिसेस केनेडी गार ॥ ११२ ॥ श्री० ॥

एकोणिसशें आठ तारीख तीस एप्रिल । खुदिराम बोसनें असे दोन खुन केले । हे खुन त्याच्या हातुन चुकुन हो झाले । त्याचे डाव होते वेगळे ॥ किंग्जफर्ड मॅजिस्ट्रेटाच्या गाडीवर । टाकून बांब त्या ठार करायाचा विचार । त्याचीच गाडि समजून बांबचा मार । परी दोन बायाच मेल्या र ॥ हा खुदीरामानें अविचारचि हो केला । देशांत चहुंकडे निषेध याचा झाला । वर्तमानपत्रीं लिहून मजकूर आला । निषेधपर त्या समयाला ॥ परि याच निषेधाबरोबर सरकारला । सरकारच्या हिताचे दोन शब्द समयाला । केसरिनें लिहिले होते दोन लेखाला । नडले हेचि टिळकाला ॥ "हे उपाय टिकाउ नव्हेत" या मथळ्याचा । आणि "देशाचें दुर्दैव" या मथळ्याचा । या दोन लेखांनीं सरकारच्या अंगाचा । भडका उडाला हो साचा ॥ हे खून असले होणें हें वाईट । पण असे घोरतर प्रकार कां व्हावेत । तर राष्ट्रिय आकांक्षांना विरोध करीत । परकी सरकाराचि येथ ॥ या असल्या खुनांचा दोष खुन्यावर जितका । त्या दडपशाहिवरि सरकारच्या हो तितका । हें साम्राज्याच्या कल्याणास्तव एका । आह्मीं सांगतों ऐका ॥ यापरी केसरींतील दोन लेखांचा । सरकारनें केला अनर्थ हो अर्थाचा । टिळकावरि डोळा होताच अगोदरचा । घतला फायदा संधीचा ॥ वारंट अखेरिस सरकारनें सोडीलें । एकोणिसशें आठ जून चोविसला पकडीलें । मुंबइला सरदारगृहांत हो बसलेले । होते टिळक तया वेळें ॥ (चाल) पकडायच्या आधींच्या ऐका थोड्या गमतीला ॥ या सालिं प्रोफेसर परांजप्यावरि खटला ॥ मुंबईला चालायाचा होता ठरला ॥ म्हणुनिया

टिळक आणि परांजपे मुंबइला ॥ जाण्यास निघाले आले पुणें स्टेशनला ॥ ते बापुसाहेब गांधी होते वेळेला ॥ या गांधींचा विश्वासु सि० आय० डी० मधला ॥ एक मोठा ऑफीसर येउन बोले गांधीला ॥ वारंट सुटलें आहे हो टिळकाला ॥ तुम्हि आज न जातां उद्यां जावें मुंबइला ॥ घाबरून गांधी सांगत हो टिळकाला ॥ तुम्हि आज न जावें खरोखर मुंबइला ॥ घरिं जाऊन कांहीं तरी करु तयारीला ॥ पण संकटकालीं चढें स्फुरण टिळकाला ॥ बेपर्वा मुद्रेनें हसुन बोलले गांधीला ॥ ( चाल ) घरीं जाउनीया जमविण्याचा काय फौजफाटा । शत्रुहल्ला किल्यावरी येई ह्मणुनि कां ॥ जी० ॥ किंवा हत्ति घोडे घरीं जाऊन शृंगारावयाचे । लोकमान्य म्हणती पुढें काय आयका ॥ ॥ जी० ॥ देश सर्व जेथें सरकारांनीं तुरुंगची केला । मग घर आणि तुरुंग भेद राहि कां ॥ जी० ॥ फार तर मोठ्या दालनांतून छोट्या दालनांत । ठेवितील मजला आतां हेंचि नाहीं कां ॥ जी० ॥ देशकार्य समरां जो निघाला भ्याड तो नसावा । मातृभूमिसाठीं सुखें देतसें जिवा ॥ जी० ॥ ( प. चा. ) असं बोलुन झटकर चढले टिळक गाडीवर । मुंबईला आले सर्व मंडळींबरोबर । सरदारगृहामधिं उतरले रीतसर ॥ एका तेथील प्रकार ॥ ११३ श्री० ॥

रीतिप्रमाणें खटला टिळकांवरि सुरु झाला । अन्याय न व्हावा ह्मणून त्या वेळेला । नेमिले पंच ते नऊ होते संख्येला । सगळा परभाषी मामला ॥ या नऊंत होते युरोपियन ते सात । आणखी बाकिचे दोन पार्शी होत । ज्या लेखावरि या खटल्याची इमारत । लेख ते मराठि भाषेंत ॥ आरंभीं केला अर्ज तेव्हां कोर्टाला ।

अहो जामीनावरि सोडण्यास टिळकाला । परि टिळकावाणी राजकीय पुरुषाला । नाहीं कोर्टानें सोडिला ॥ ( चाल ) एक प्रसंगीं ज्या दावरनीं बॅरिस्टरनीं खटला चालविला । तेचि दावर न्यायाधिश कीं होते त्या वेळां ॥ खटल्या वेळीं कोर्टामध्यें खेचाखेच झाली । कडेकोट बंदोबस्तचि तो होता त्या वेळीं ॥ खटला चालु असतां पोलिस आणि लोक यांचे । खटके उडाले प्रसंग झाले मारामारीचे ॥ साक्षिपुरावे झाले सगळे जें जें व्हायाचें । सर्व वार्णतां रामायणची मोठें व्हायाचें ॥ ( प चा. ) टिळकांनिं आपुल्या स्वतः डिफेन्सावर । भाषणची केलें एकवीस तासावर । एकनां थक्काचि बडे बडे बॅरिस्टर । बघनी वेड्यावाणी सार ॥ ११४ ॥ ॥ श्री० ॥

कोर्टांत शेवटीं दोन पार्शि पंचांगीं । टिळकांसि ठरविलें निर्दोषी हो त्यांनीं । बाकिच्या सातहीं युरोपियन पंचांनीं । ठरविलें पूर्ण दोषि ह्मणुनी ॥ ज्यूरिनें टिळकांसि राजद्रोहि ठरविलें । मग न्यायाधीशांनीं टिळकांसि विचारीलें । कांहिं सांगायाचें आहे कां या वेळें । टिळकांनीं मग सांगितलें ॥ ( चाल ) कसाही दिला निकाल ज्यूरिनें तरि मी पूर्ण निर्दोषी । मनोदेवता माझी अझुनी सांगत मज एसी ॥ ऐका टिळकांचा संदेश । साऱ्या जगताला आदेश ॥ या कोर्टाहुनि वरिष्ठ ऐशा परमेश्वरि सत्तेचें । जगताच्या भवितव्यतेवरि प्रभुत्व असनें साचें ॥ ऐका टि० ॥ माझ्या स्वातंत्र्याहुनि माझ्या हालअपेष्टांनीं । अंगीकृत राष्ट्रकार्य माझें येणारचि घडुनी ॥ ऐका टि० ॥ संकेत असा असेल प्रभुचा अशा परी संदेश । सांगितला टिळकांनीं साऱ्या जगताला आदेश ॥ ऐका टि० ॥ ( प. चा. ) सहा वर्षें काळें

पाणी दंड हजार । सांगितली शिक्षा कोर्टानें ही घोर । नेऊन ठेविलें मंडाल्यांत अखेर । इकडे झाला हाहाःकार ॥ ११८ ॥ ॥ श्री० ॥

सहा वर्षांच्या कैदेंत मंडालेला । तो गीतारहस्य ग्रंथ टिळकांनीं लिहिला । निज कीर्तिमंदिरावरी कळस चढविला । तेजें अखिल लोक दिपला ॥ लोकमान्य आले सुटुनि सहा वर्षांनीं । हिंदुस्थान गेला आनंदानें फुलुनी । जणु प्राणचि आला देहामधिं परतोनी । ऐसें झालें त्या क्षणीं ॥ या वेळीं होती जहाल मवाळ बेकी । परि लोकमान्यांनीं झटकन केली एकी । आणि हिंदुमुसलमानांच्या बेकिची बाकी । त्यांनीं नाहिं ठेविली कीं ॥ तो स्वराज्यसंघ स्थापन त्यांनीं केला । त्यासाठिं लोकमान्यांनीं दौरा काढिला । व्याख्यानें दिधलीं बहुत त्या समयाला । सारा देश हालविला ॥ त्या दौऱ्यामध्यें हजारों गोष्टी घडल्या । ऐकतां मनाला आश्चर्यानें जडल्या । त्यांतील छोटिशी सांगत मी नमुन्याला । द्यावें क्षणभर ध्यानाला ॥ ( चाल ) नाशकाहून संगमनेरच्या रस्त्याला ॥ मार्गांत आडवाटेला सूर्य मावळला ॥ टिळकांची स्वारी थोडी हवा खाण्याला ॥ मोटारिमधुन उतरली होति त्या वेळां ॥ इतक्यांत घाटाखालुन कोणि वर आला ॥ तो मांग बेरड असावा अदमासाला ॥ टिळकांसह मंडळि चालत होति वाटेला ॥ तो बेरड येतां येतां जवळ कीं आला ॥ केळकर तात्यासाहेब होते समयाला ॥ तो बेरड हळुंच विचारी तात्यासाहेबाला ॥ ( चाल ) कां हो दादा टिळकदेव ते यांतचि आहेत कां ॥ असत्याल तर ते कोनच त्राइच मजला दावाल कां ॥ केळकरांनीं दाखविल्यावर टिळकांच्या पायाला ॥ घट्ट मारुनी मिठी मोठ्यानें

जयकाराचे हो केला ॥ ( चाल ) कोण काय कुठला प्रश्न केला टिळकांनीं तयाला ॥ टिळकवाणी ऐकुनिया तो गहिंवरुनि गेला ॥ आज आपण महाराज खास येणार संगमनेरला ॥ म्हणुन जात होतों तिकडे धूळभेटीला ॥ परी भाग्य माझें खास मोठें वाटेत भेटला ॥ जन्म आज वाटे माझा धन्य जाहला ॥ मोठें काम हातीं घतल्यासी आठवण ठेवा ॥ गरीबाचि माझी महाराज टिळकदेवा ॥ ( प. चा. ) असं बोलुन आणखी डुई ठेवि पायावर । आणि गेला, मंडळिंहि चढली मोटारीवर । दौऱ्यांत हजारों अशा गोष्टी घडल्या र । सांगतां वेळ नाहिं पुरणार ॥ ११६ ॥ ॥ श्री० ॥

तेवीस जुलै एकोणिसशें सोळा सालीं । वाढदिवस एकसष्टावा झाली ज्युबिली । त्या गायकवाडवाड्यांत गर्दि उसळली । समारंभाची त्या वेळीं ॥ हा एकसष्टावा वाढदिवस टिळकांचा । थाटांत होइ जणु राजा महाराजाचा । बहु समाज जमला थोर थोर मंडळिचा । सर्वहि त्या आप्तेष्टांचा ॥ टिळकांच्या पत्नि नव्हत्या या समयाला । सोडोनी गेल्या होत्या इहलोकाला । कैदेंतचि होते टिळक मंडालेला । साध्वी गेली त्या वेळां ॥ निज देशासाठीं पती जातां कैदेंत । त्या वेळेपासुन साध्वी होति घरांत । बाहेर जाणें वर्जचि केलं होतं । अगदीं शेवटपर्यंत ॥ काळेंच जाडेंभरडें वस्त्र नेसुनिया । काळ्याच बांगड्या हातीं लेवूनीया । दागीना मंगलसूत्रचि गळिं घालुनिया । होत्या घरांत साध्वी या ॥ पक्वान्नें सेवन कधिंहि नाहिंत केलीं । ते पदार्थ उपवासाचे खाउन वेळीं । ती पोथि भक्त-विजयाची हो प्रेमळ । ऐकण्यामधीं घालवी काळ ॥ औषध मुळिंच

कसोंहि घेतलें नाहीं । ती साध्वी निशिदिनिं मग्न असे पतिपायीं ।
अस्तु नमस्कार हो अशा साध्विच्या पायीं । देशाची देविच कीं ही ॥
तात्पर्य साध्वि ही नव्हति समारंभाला । परि समारंभ हा अपूर्व ऐसा
झाला । लाखाची थैली लोकमान्य टिळकाला । केली अर्पण या वेळां ॥
( चाल ) परी अशा या आनंदाचा नोकरशाही विरस करी । खट-
ल्याची नोटीस बजावी त्याच दिनीं टिळकावरी ॥ स्वराज्यावरिल
व्याख्यानें तीं राजद्रोही कीं सारीं । एक वर्ष भाषणबंदीचा जामिन
द्यावा लौकरी ॥ मॅजिस्ट्रेटापुढें चालला खटला न्यायाची भेरी ।
वाजविली मॅजिस्ट्रेटानें जामिन मागे रीतसरी ॥ ( चाल ) राजश्री
हॅच मॅजिस्ट्रेट । बोले शेवट । ऐका हो नीट । लोकमान्याला ॥
समजा ही खैर सरकारची । तुह्मावरि साची । नुसता जामिनची ।
घेइ या वेळां ॥ नाहितर राजद्रोहाचा । खटला जोराचा । तुह्मांवर
व्हायचा । खास या वेळां ॥ ( प. चा. ) टिळकांनीं केलें अपील
झटकन यावर । निर्दोषि भाषणें ठरलीं एकंदर । हायकोर्टाचा हा
निकाल ऐकल्यावर । झाला टिळकांचा जयकार ॥ ११७ ॥ ॥ श्री० ॥

पुढें स्वराज्य मागणिविषयीं इंग्लंडांत । जाऊन लोकमत तयार
करणें तथं । या कामिं शिष्टमंडळ तें विलायेंतत । इकडुन
पाठविणें होतं ॥ या कामीं पैसा जमविण्यास त्या वेळां । टिळकांनीं
दौरा देशामधीं काढीला । व्याख्यानद्वारें सर्व खेड्यापाड्याला ।
दिधलें स्वराज्यमंत्राला ॥ या वेळीं देशानें मानपत्रें देऊन । रकमांच्या
थैलच्या केल्या हो अर्पण । चहुंकडे मिरवणुकि टिळकांच्या थाटानं ।
निघाल्या देशामधिं जाण ॥ खापर्डे करंदीकर आणि केळकर । ते

टिळक आणि बॅप्टिस्टा अशि थोर । माणसें शिष्टमंडळामधुन जाणार । बॅप्टिस्टा अध्यक्षाचि र ॥ बॅप्टिस्टा गेले दोन महिने आधीं । अध्यक्ष नात्यानें पुढील कार्य साधी । मागून मंडळी थोडयाच दिसामधीं । निघाली सर्वहि टिळकादी ॥ ( चाल ) विलायती जायासी लोक-मान्य नीघाले ॥ थाटानं मानपत्रची पुण्यानें दिलें ॥ रे मार्केटाच्या पटांगणांमधिं सगळे ॥ द्यावया निरोपचि सर्व पुणें लोटलें ॥ पन्नास हजारावरी लोक हो जमले ॥ पाहती सर्व टिळकांसी भक्तीभावें ॥ गहिंवरले लोक नेत्रीं अश्रू आले ॥ लोकमान्यही गहिंवरून बोलते झाले ॥ ( चाल ) अहो पुणेंकरांनो, माझ्या देशबंधुंनो, सर्व लहान थोरांनो, मजवरिल तुमच्या प्रेमाला । नाहिं कांहिं उपमा द्यायाला । पाहुनी गहींवर आला । बोलवेन या वेळेला ॥ जात मी देशकार्याला । द्यावें हो आशीर्वादाला ॥ परदेशावरी, मी कुठंहि जरी, गेलोंहि तरी । नाहिं विसरणार या पुण्याला । नका विसरूं तुह्मींही मजला । प्रार्थना तुम्हां सकलांला ॥ जात मी देशकार्याला । द्यावें हो आशीर्वादाला ॥ चाळीस वर्षं, बागेदार असं, देशकार्य खासं, कर-विलें तुह्मिच मजकडुनी । करविणार पुढती आणि, मज निमि-त्ताला पुढं करुनी । श्रेय हें तुम्हा लागोनी । अश्रुनें भरल्या डोळ्यांनीं । कृपादृष्टि मजवरी करुनी । द्या निरोप आतां क्षणीं ॥ जात मी देश-कार्याला । द्यावें हो आशिर्वादाला ॥ ( प. चा. ) राजाचिही नाहिं मिरवणुक अशि थोर । थाटाची जंगी निघालि टिळकांची र । लोकांनीं करीत थोर जयजयकार । पोंचविलं पुणें स्टेशनावर ॥ ११८ ॥ श्री० ॥

हें डेप्युटेशन मुंबइहून निघालें । तेथून पुढें तें मद्रासेला आलें । बझंटबाइच्या हस्तें मानपत्र तें । मिळालें त्यांना हो तेथें ॥ एप्रील दोनिला आलें कोलंबोला । निघणार तेथुनी तोंच अडथळा आला । परदेशीं जाण्याचा परवाना त्या वेळां । सरकारानें रद्द केला ॥ टिळकांनीं तावडतोब व्हाइसरायाला । तारेनं कळविलं चिरोलच्या खटल्याला । मज जाणें आहे खास विलायतेला । द्यावें झट परवान्याला ॥ ( चाल ) मग सरकाराकडुन तें लिहुनिया आलें ॥ कीं स्टेट सेक्रेटरि हल्लिं स्वतः या वेळें ॥ या हिंदुस्थानामधीं फिरत राहीले ॥ त्या स्वराज्याच्या वाटाघाटिस लागले ॥ हें शिष्टमंडळाचि तिकड जाई या वेळें ॥ या वेळिं विलायतिं जाणं नाहिं चांगलें ॥ याकरितां ते परवाने रद्द केले ॥ ( पहिली चाल ) पण एकोणिसशें अठरांतिल आक्टोबर । लोकमान्य गेले विलायतेस अखेर । तिथं कामगिरी देशाची केली हो फार । रात्रंदिवस ती अनिवार ॥ ११९ ॥ श्री० ॥

जातांच विलायतिं चिरोलचा तो खटला । घेतला हातिं टिळकांनीं त्या वेळेला । सर्वही प्रकारें प्रयत्न सारा केला । परंतु निर्फल तो झाला ॥ प्रतिकूल झाला खटला म्हणुन कांहीं । धैर्य रेसभरही त्यांचें खचलें नाहिं । लागले देशकार्यास ते लवलाही । तेव्हां विलायतीं पाही ॥ तिथं एक ब्रिटिश कांग्रेस कमीटी होती । राष्ट्रीयसभेच्या पैशावर चाले ती । परि राष्ट्रसभेचें धोरण मानित नव्हती । ऐसी विचित्र हो रीती ॥ ही कमिटी चालविणारी ती मंडळी । अस्सल मवाळचि होती हो तीं सगळी । यासाठिं सभा करुनिया स्थिती पालटली । तेथिल कमीटीची सगळी ॥ या कमिटीनें राष्ट्रीय सभेचें मत ।

आणिलें पाहिजे तत्वतः अंमलांत । हा ठराव पास होतांच कमीटींत। राहिले मत्राळ नाहींत ॥ ( चाल ) हीच ब्रिटिश कांग्रेस कमीटी जहालांनीं घेतली ॥ साप्ताहिक इंडिया पत्रही घेति जहाल मंडळी ॥ तात्यासाहेब केळकर आणी मिस हेलेना भली ॥ दोघे मिळून पत्र इंडिया छान चालवूं लागली ॥ स्वराज्य मागणिची चळवळ ती रंगाला आणली ॥ वीस हजार मजुरांचि सभाहो टिळकांनीं भरविली ॥ स्वराज्य मागणिची चळवळ ती इंग्रजांस पटविली ॥ हजारों हजार हस्तपत्रिका गांवोगांव. वाटविली ॥ अनेक शहरीं व्याख्यानें हो टिळकांनीं तीं दिलीं ॥ ( चाल ) मजुरांची सभा मोठी ग्लासगो शहरांत भरली । त्या वेळी टिळक महाराज स्वारि दणाणुन बोलली ॥ तुमची ती सहानुभूती आमुच्या कार्यि अह्मांला । ह्मणिं मिळावी हीच विनंती आमुची तुह्मांला ॥ या वेळीं साह्य द्यावें योग्य तें जाणून आह्मां ॥ नच दिलें तरी अडत नाहीं टिळक बजावी तुह्मां ॥ स्वतःच्या पायावरि तो हिंद देशाचि राहि ऊभा । हिंदुस्थान समर्थचि हा टिळक बजावी तुह्मां ॥ ( प. चा. ) टिळकांची भाषा ऐकन बाणेदार । टाळ्यांचा उडाला कडकडाट हो फार । टिळकांचें तेजें दिपले लहान थोर । ह्मणती थोर पुरुष हा थोर ॥ १२० ॥ श्री० ॥

हिंदुस्थानच्या स्वराज्यापायिं लोकमान्यांनीं । अविश्रांत खटपट विलायतेमधिं करुनी । स्वतःच्या कल्पना त्यांच्या मनिं भरवोनी । केली जागृति हो त्यांनीं ॥ त्या विलायतेंतिल एक वर्ष चळवळिचा । वेगळाच होईल पोवाडा हो त्याचा । असु लोकमान्य ते नोव्हेंबर महिन्याला । आले परत स्वदेशाला ॥ मुंबई पुण्याला अत्यं-

तोचि थाटाचें । जनतेनें केलें स्वागत हो टिळकांचें । जरि दृष्टमणी कांहिं विरोधि होते साचे । बारा वाजले त्यांचे ।। केळकर आणी टिळक या दोघांसी । त्या म्युनिसिपालिटिनं मानपत्र दिलं खाशी । तो अन्यानंदचि झाला हो देशासी । पाहुन टिळक पुढाऱ्यासी ॥ ( चाल ) देशांत या वेळेला । क्षुब्धता चहूंभागाला । रौलेट कायदा सरकारानें केला ।। सुप्रसिद्ध पंजाबाचें । प्रकरणिं सर्व देशाचें । हृदय तें दुभंगें होइ जखमचि त्याला ।। खिलापतीच्या प्रश्नानें । मुसलमान अंतःकरणें । रुष्ट होतिं सरकारावरी त्या वेळां ॥ ( प चा. ) या सुमारास राष्ट्रीय सभा ती थोर । अमृतसर येथें झालि फार जोरदार । " डायरला शिक्षा करा " या ठरावावर । भाषण टिळकाचें भर-दार ॥ १२१ ॥ श्री० ॥

त्या विलायतेहुनि आल्यावर टिळकांची । प्रकृती चांगलीच होती तव्हां त्यांची । परि विश्रांती नच घेतां देशकार्याची । घाई केलि त्यांनि साची ॥ या परी त्रास देहाचे तसेच मनाचे । टिळ-कांच्या मागें सर्वदां असायाचे । उद्भवलं अशामधिं संदेश कर्त्याचें । प्रकर्ण फारच त्रासाचें ॥ टिळकांचा चिरोल खर्च तीन लाखांचा । राष्ट्रानें इकडुन पाठविला तव्हांचा । या फंडांतिल पैशांच्या अफरा-तफरीचा । आरोप कोल्हटकरांचा ॥ मोठमोठ्या लोकांनीं यांतिल पैसे खाल्ले । म्हणतांच राष्ट्रामधीं कलह सुरू झाले । मग विलायते-हुन लोकमान्य ते आले । भांडण मिटवूं लागले ॥ पण संदेशकार ह्मणजे फार हुशार । माणुस पण माणुस एकंदर । तोंडसुख घेइ लोकमान्य टिळकांवर । अद्वातद्वा बोलुन र ॥ संदेशकारांनीं टिळ-

कोना अपशब्द । कोणने योजले करीन नाहीं नोंद । परि त्रास पावले लोकमान्य गुणवृंद । ऐसें ज्ञानी हो विबुध ॥ ( चाल ) यांनच ताइ-महाराजांचा तो खटला ॥ अवशेष राहिला होता तो उद्भवला ॥ त्यासाठिं लोकमान्य ते गेले मुंबइला ॥ सन एकोणीसशें वीस जुलै बाराला ॥ गेले ते नाहीं आले परत पूण्याला ॥ ( प. चा. ) कांहींहि झालें तरी सृष्टीचा व्यवहार । चालला रीतसर चालवीत ईश्वर । त्यापुढें आपण मानव काय पामर । त्याची इच्छा बलवत्तर ॥१२२॥श्री०॥

अत्यंत श्रमानें महाराजांचा खटला । टिळकांनीं जिंकिला यश आलें कार्याला । तारीख एकविस जुलैच्या बुधवारला । खटला टिळकासारखा झाला ॥ तारीख वीस जुलईच्या मंगळवारीं । त्या संध्याकाळीं सहज टिळकांचि स्वारि । मोटारीमधुन हो हवा खावया दूरी । गेली होती बाहेरी ॥ लागलाच वारा मोटारींतुन बहुत । आधींच प्रकृति थोडीशी अस्वस्थ । त्यामुळें तापहि थोडासा अंगांत । भरला हो त्या रात्रींत ॥ बुधवारपासुनी आंथरूण जें धरिलें । तें अखेर पावतर त्यांना नाहीं सुटलें । एक दोन दिवसांनीं नवज्वरावरि गेलें । दुखणें डाक्टर बोलले ॥ पण आला घाम उतार पडला ऐसी । वाटलीच आशा त्या वेळीं सर्वांसी । पण हा ज्वर होता उगीच हो नांवासी । आलें कळुन डाक्टरासी ॥ मुख्यतः विकारचि होता लोकमान्यांचा । शक्तिपात हाची ठरला हो शेवटचा । तो नाहीं हटला अखेर पावतर टिकला । सगळा उपाय हो थकला ॥ ( चाल ) डाक्टर वैद्यांचा तांडा धावुन आला ॥ किनिकांचीं त्यांचीं नांवें तीं यादीला ॥ दहा दिवस एका पायावर शुश्रूषेला ॥ परिचारक

होते हजारों त्या समयाला । टिळकांच्या सेवेचा मान मिळे कां मजला ॥ ही आशा धरुनी उभे सदा सेवेला ॥ सरदारगृहाच्या अगदीं चौथ्या मजल्याला ॥ टिळकांची खोली होती वर उंचीला ॥ त्या खोलीपासुन खाली दरवाजाला । रांग ती स्वयंसेवकांची त्या वेळेला ॥ शुश्रूषा दुर्मिळ राजा महाराजाला ॥ अशि मिळालि या लोकशाहिच्या राजाला ॥ ( प. चा. ) सरदारगृहाचे मालक साळवेकर । यांची ती सेवा अमूल्य हो ठरणार । सरदारगृह अर्पण टिळक चरणावर । केलें दहा दिवसांवर ॥ १२३ ॥ श्री० ॥

या आजाराच्या वार्तेनं हिंदुस्थान । हालून गेलें नाहीं उरलें अवसान । तारांची उडाली गर्दी दाणादाण । देश झाला हो बेभान ॥ मोठमोठी मंडळी येउ लागली धावुन । लाविती नशीबा हात टिळकांना पाहून । अहो टिळका देवा आह्मालागीं तुम्हि सोडुन । जातां कुठें असें बोलुन ॥ ते थोर महात्मा गांधीजी हो आले । बघुनिया लोकमान्यांस मनीं गहिंवरले । हा हा रे चालला पुढारी दुःखें वदले । नेत्रीं अश्रुबिंदु आले ॥ ( चाल ) वैद्य डाक्टरांनीं अहो क्षणोक्षणीं मत जुळवोनी, औषधें दिलीं टिळकांना । परि यश नाहिं त्यांना ॥ जप अनुष्टान नशि होमहवनं करुनिया जाण, अंगारे तीर्थ टिळकांना । परि यश० ॥ ज्योतिषी जमुन कुंडली मांडुन किंवा प्रश्नांवरुन, आरोग्य चिंती टिळकांना । परि यश० ॥ टिळकांचे हातुन दानधर्म करवुन हरि मुखें म्हणुन, आरोग्य चिंति टिळकांना । परि यश० ॥ ( प. चा. ) क्षणोक्षणीं प्रकृतिचं मान देशावर । तारांनिं कळविलं जात होतं सारं । मुंबइला सरदारगृहाचे दरवाजावर । लिहीत होते फळयावर ॥ १२४ ॥ श्री० ॥

एकोणिसशें वीस आगष्टचे पहिलीला । शनिवारीं उत्तर रात्रीं बारा चाळिसला । लोकमान्य आत्मा देवमान्य हो झाला । पावला कैवल्य पदाला ॥ चाळीस वर्षें सरकारासि झगडविला । या हिंदुस्थानापायिं देह झिजवीला । लोकमान्य आत्मा० ॥ शत्रुही गात वीं ज्याच्या गुणवृंदाला । जो निजप्रतापें नरका नारायण झाला ॥ लोकमान्य आत्मा० ॥ निर्धार धैर्य निःस्वार्थ देशभक्तिला । निज-देशकार्यीं लावुनि या चार गुणाला । लोक० ॥ श्री महात्मा गांधी आदि पुढारि ज्याला । गुरुवर्य म्हणोनी वंदीती चरणाला । लोक-मान्य० । सरकारच्या शत्रुगणिं घेई अग्रपूजेला । जनताजनार्दन हृदूसिंहासनिं बसला । लोक० ॥ वर्णिता जयाच्या शब्द नाहिं काशाला । असा देह लोकमान्यांचा भूमिवर पडला । लोकमा० ॥ ( चाल ) देहचि पडला आत्मा गेला देवलोकाला । वणव्यावाणी पसरे बातमी त्याच रात्रीला ॥ गेला गेला पुढारि गेला लोकमान्य गेला । हा हा देवा कसा घातला काळानें घाला ॥ हिंदमातेच्या अंकावरुनी बाळ टिळकाला । ओढोनी नेलेंसि कसें रे निर्दया काळा ॥ तारा गळाला हिरा हरपला देशदीप विझला । स्वराज्यआशा-मंदिरावरिल दिव्य कळस ढळला ॥ ( चाल ) दुःखानें लोक सारा, पिटित हृदया, फार त्या वेळेला ॥ महाराज लोकमान्या, सोडुनीया, जासि कां आह्मांला ॥ रोंवशील स्वराज्याचा झेंडा खासा, अशीं आशा, होति रे देशाला ॥ आवडति हिंदभूमी, आज त्यजुनी, जाशि कां वेल्हाळा ॥ हा देश होइरे दीन, आज तुज-विण, हायरे देवा ॥ तव स्वराज्याचे रे बोल, फार बिनमोल, एकदां

तरि बोल, बोलरे बोला ॥ केसरीवाणीं गंभीर, वृत्तिचा धीर, बोलरे बोला ॥ तव मूर्ति कुठें आतां, दिसेलचि कां, वेडा जिव झाला ॥(प.चा.) या परी शोकानें विव्हल होउन सारं । सरदारगृहाकडे लोटलं मुंबइ-शहर । चहूंकडून आल्या स्पेशल गाड्या भराभर । तोबा सरदार-गृहावर ॥ १२५ ॥ श्री ० ॥

सरदारगृहाच्या दुसऱ्या मजल्यावरती । सर्वांस दिसेशी प्रशस्त खुर्चीवरती । घालुनिया मांडी लोकमान्याची मूर्ती । ऐसी बस-वीली होती ॥ घातलीच होती अंगावरती शाल । गळिं पुष्पहार आणखी तुळशिची माळ । भस्माचे पट्टे शोभति भालिं विशाल । दर्शन थोर दिव्यतेजाळ ॥ हाताशिं केसरी गीतारहस्य गीता । श्री सच्चित्घन-आनंदरूपिं ऐक्यता । ध्यानस्थ योगिच दिसे जणु पाहतां । शांति ब्रह्माचि अवस्था ॥ ( चाल ) हें शेवटचें दर्शन घ्यावया जमला ॥ लक्षावधि लोक सरदारगृहभोंवनाला । जन बालतरुण वृद्धही नारिनर सगळा ॥ बहु भावभक्तिनें करिति नमस्काराला ॥ ( चाल ) आलि पुणेंकरमंडळी, प्रेमभावानं बोलु लागली, मुंबईकरास त्या सम-याला ॥ द्या टिळक आमुचे आम्हांला ॥ लोकमान्य हे रहिवासी, पुण्याचे असें ठावें दुनियेसी, म्हणुन आमुची विनंति अशी, मुंबइकराला ॥ द्या टिळक० ॥ आमुच्या लोकमान्यांची, आमुच्या हातुन सेवा शेवटची, यावी घडून, आस पुणेकरांची, पुरवा हेतुला ॥ द्या टिळक० ॥ ( चाल ) मग त्या नंतर ते मुंबईकर, बोलले उत्तर, पुणेंकरासि हो प्रेमाचें ॥ प्रेमा० ॥ ते टिळक जरी, पुण्यामधिल तरि, लोकमान्यावरी, प्रेम या सर्व देशाचें ॥ देशा० ॥ टिळक ही व्यक्ति, नाहिं खासगी

ती, सार्वजनीकची, दैवत सर्व देशाचें ॥ देशा० ॥ तुम्हि आम्हि मिळुन, देशबंधू जमुन, करु अखेरचें, कार्य हें स्मशानयात्रेचें ॥ यात्रे० ॥ ( चाल ) समजुन हो झालि तेव्हां त्या पुणेकर मंडळींची । मग पुण्याच्या रिवाजाची केलि पालखी साची ॥ पालखि ही उचलण्याचा सर्व जनतेच्या आधींचा । मान ठरला पुणेकरांचा शेवटच्या सेवेचा ॥ देहचि लोकमान्यांचा पालखीमधिं ठेवियेला । हां म्हणती चला उचला लोकमान्य मुखिं बोला ॥ ( चाल ) हा वेळ होता, दोनप्रहर दोनीचा, परि तहानभुकेचा । विसरची पडला सर्वांला । लहान थोर नारि नर याला । अठराहि पगड जातीला । एकच ध्यान त्या वेळां, दर्शन लोकमान्यांचें । घेति हो जणूं देवाचें ॥ चार पाच लाख, जमला हो लोक, जमत होता आणिक । सरदारगृहाच्या आजुबाजूला । लोकांचा समुद्रचि झाला । ट्रामगाड्या बंद कि हो पडल्या । रिघाव तो नव्हता मुंगीला । करुनिया धक्काबुक्कीला ॥ दर्शन लोकमान्यांचें । घेति हो जणू देवाचें ॥ स्वयंसेवकांनीं, बहु चतुराइनी, व्यवस्थाहि करुनी । उचलिलें जेव्हां पालखीला । जयकार मोठा झाला । पोंचला शब्द गगनाला । पाहती लोकमान्याला । टपटपा ढाळि अश्रूला । जोडुनी हात समयाला ॥ दर्शन० ॥ ( चाल ) चालले हजारों मेळे पुढें भजनाचे ॥ टाळमृदंग तालावरी जणुं नाचे ॥ विद्वान राव रंकही सर्व जातीचे सर्व धर्माचे ॥ अनवाणी बोडके खिन्न भक्त टिळकांचे ॥ गच्चया माड्या खिडक्या छपरें फुलुन गेलीं हो । माणसांनीं दर्शन घ्याया टिळकांचें हो ॥ जस्मा मशीदिच्या गच्चींत मुसलमान सारे । स्त्रीपुरुष डुबकती

फुटे जयजयकारें ॥ मिरवणूक गेली जेव्हां सोनें बाजारीं । किमतिचीं नाणीं उधळलीं पुष्पाबरोबरी ॥ ( चाल ) महात्मा गांधी जमनादास खत्री शौकतअल्ली । मियामहमद छोटानी किश्लू आदि मंडळी ॥ ऐसा स्मशानयात्रेचा । सोहाळा अपूर्व टिळकांचा ॥ गांधीजीसह सर्व मंडळी टिळकांच्या पालखीला । भक्तिभावानें खांदा देत होती त्या समयाला ॥ ऐसा० ॥ मिरवत मिरवत मिरवणूक ही आली चौपाटीला । सायंकाळीं सात वाजतां सूर्य अस्ता गेला ॥ ऐसा ० ॥ गणपति विसर्जनाच्या पवित्र जाग्यावरती रचिली । थोर चिता चंदनाचि केवळ पहा तया वेळीं ॥ ऐसा ० ॥ लाला लजपतराय आले धावतची आले । लोकमान्य जय ह्मणूनि त्यांनीं नमस्कार केले ॥ ऐसा०॥ प्रेत चितेवरि ठेवुनिया मग दहनविधी झाला । लोकमान्य महाराज कीं जयजयकार झाला ॥ ऐसा० ॥ या कल्लोळामध्येंच एका मुसलमान छात्यानें । उडी घेतली चितेंत तेव्हां अति दुःखभरानें ॥ ऐसा० ॥ याच दिवशीं पुण्यामधीं हो अशिच मिरवणूक झाली । दहाव्या दिवशीं सर्व देशानें त्यांस तिलांजलि दिधलि ॥ ऐसा ० ॥ लोकमान्य ते गेले परि हो कीर्तिरूपि उरले खास । आत्मोन्नतिचें स्मरण द्यावया घडिघडि या जगतास ॥ जय जय टिळक लोकमान्या । शरटि प्रणाम तव पाया ॥ ( ओवी ) मुंबईत समुद्रकाठीं । चौपाटीच वाळवंटी । टिळकभक्त लहानमोठी । मंडळी तेथें जमताती ॥ दहनविधी झाल्या स्थलाची । नित्य पूजा करिती साची । भक्तियुक्त अंतःकरणाची । सर्व देशाची साक्ष ही ॥

हीं जागा कठडा बांधून । एखाद्या पवित्र भूमीसमान । वेगळी राखावी हा ठराव जाण । मुंबई म्युनिसिपालटीचा ॥ ठराव सरकाराकडे गेला । सरकारानें मान्य केला । लोखंडी कठडा त्या जाग्याला । बांधणें योजी सरकार ॥ व्यक्ति विभूति विशेष । सरकारनें जाणून समयास । केलें तें योग्यचि खास । अभिनंदन असो तयांचें ॥ मागें कधींही न घडलें । ऐसें तें हें घडो आलें । यांतच थोरपण भरलें । लोकमान्य टिळकांचें ॥ असो लोकमान्यांची देशभक्ति । लोकमान्यांची निःस्वार्थी वृत्ति । अनुपमेय निश्चय धृति । आणा अंगीं आपुल्या ॥ लोकमान्यांस आठवावें । कांहीं देशकार्य करावें । अधिक काय सांगावें । सूज्ञ तुम्हीं सर्व कीं ॥ न्यूनाधिक शब्दाची । क्षमा असावी सकलांची । हीच विनंति शाहीराची । देशबंधुंनो तुम्हांसी ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु हें म्हणोनि अखेर । लोकमान्य चरणीं मस्तक ठेवि त्रिवार । दीर्घायु चिंतितों तुम्हां श्रवण करणार । बंधुभगिनीं लहान थोर ॥ १२६ ॥

श्री लोकमान्य जय बाळ गंगाधर । राष्ट्रीय विभूति जगद्वंद्य महिवर । या हिंदुस्थानाचा पुढारि बाणेदार । टिळक नरकेसरि महशूर ॥

समाप्त.

REFBK-0002852